University of Mumbai

शीलवृत्तफला विद्या

# संभाषित

मुंबई विद्यापीठाची महाजालावरील आंतरविद्याशाखीय तज्ज्ञपरीक्षित संशोधनपत्रिका

(Peer-Reviewed Research Journal)

वर्ष ०१ ❖ अंक ०३

नोव्हेंबर २०२०

# संभाषित

मुंबई विद्यापीठाची महाजालावरील आंतरविद्याशाखीय तज्ज्ञपरीक्षित संशोधनपत्रिका (Peer-Reviewed Research Journal)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२९व्या जयंतीचे (१४ एप्रिल २०२०) औचित्य साधून अधिष्ठाता, मानव्यविद्याशाखा, मुंबई विद्यापीठ यांच्या कल्पनेतून 'संभाषण' या द्विभाषिक (इंग्रजी आणि मराठी) ऑनलाईन संशोधनपत्रिकेचा जन्म झाला. विभिन्न विद्याशाखांमध्ये समकालीन प्रश्नांबाबतच्या चिकित्सक चर्चेला गतिमान करणे आणि विचारमंथनाद्वारे संवाद प्रस्थापित करणे या भूमिकेचे अधिष्ठान 'संभाषण' संशोधनपत्रिकेच्या मुळाशी कार्यरत असलेले दिसते.

'कोरोना' हा विषय केंद्रस्थानी असलेले 'संभाषण'चे तीन अंक प्रकाशित झाले आहेत. तसेच अण्णा भाऊ साठे जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून 'संभाषण'चा ऑगस्ट महिन्याचा अंक 'अण्णा भाऊ साठे विशेषांक' म्हणून प्रकाशित करण्यात आला आहे. केवळ महाराष्ट्रातूनच नव्हे तर संपूर्ण देशातून या विशेषांकाचे भरभरून स्वागत झाले. तसेच विविध अभ्यासशाखेतील अभ्यासकांनीही सदर विशेषांकाचे संदर्भमूल्य मान्य केले, ही अत्यंत आश्वासक बाब आहे.

'संभाषण'च्या माध्यमातून इंग्रजी आणि मराठी असा द्विभाषिक संशोधनपत्रिकेचा एकत्रित सुरू झालेला प्रवास अत्यंत आनंददायी आणि प्रेरणादायी होता. मात्र काही तांत्रिक कारणांसाठी मराठी आणि इंग्रजी भाषेतील संशोधनपत्रिका स्वतंत्रपणे प्रकाशित होणे अपरिहार्य ठरले. तसेच मुंबई विद्यापीठ हे महाराष्ट्रातील सर्वात जुने विद्यापीठ असल्यामुळे राज्यभाषेतून ज्ञानव्यवहार आणि संशोधनव्यवहाराला चालना देण्याचा मुद्दाही अग्रक्रमाने पुढे आला. याला अनुसरूनच मराठी भाषेतील आंतरविद्याशाखीय संशोधनपत्रिका स्वतंत्रपणे प्रकाशित व्हावी असा प्रस्ताव विद्यापीठाने ठेवला. हा प्रस्ताव अनेक अर्थांनी महत्त्वाचा असल्यामुळे सप्टेंबर २०२०पासून 'संभाषित' या नावाने मराठी संशोधनपत्रिकेची स्वतंत्र वाटचाल सुरू झाली आहे.

# ‘संभाषित’ची रूपरेषा

- सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक अशा विविध स्तरांतील महत्त्वपूर्ण प्रश्न आणि घडामोडींविषयी आंतरज्ञानशाखीय दृष्टिकोणातून सिद्ध होणारी मांडणी पुढे येण्यासाठी अभ्यासक/ संशोधकांना खुला मंच उपलब्ध करून देणे ही ‘संभाषित’ची मूलभूत भूमिका आहे.

- संशोधन आणि संशोधनात्मक लेखन हे अंतिमत: समाजासाठीच आहे. त्यामुळे या लेखनाचा एक गृहीत पैलू हा सामाजिकता आहे, या बांधिलकीतून सैद्धांतिक आणि कृतिशील अशा दोन्ही स्तरांवर काम करणाऱ्या अभ्यासक / संशोधकांचे लेखन समाजाच्या विविध स्तरापर्यंत पोहोचविण्याचा हा प्रयत्न आहे. तसेच विविध सामाजिक स्तरांमधील वाचकाची अभिरुची आणि वैचारिक जडणघडण सकस होण्यासाठी आवश्यक असणारा अवकाश सिद्ध करण्याची प्रेरणा ‘संभाषित’च्या मुळाशी कृतिशील आहे.

- भारताच्या बरोबरीने भारताबाहेरील मराठी भाषिक अभ्यासक / संशोधकाच्या परिदृष्टीतून जागतिक आणि भारतीय अवकाशातील विविध प्रश्नांविषयीची विश्लेषक मांडणी समाविष्ट करून घेण्यासाठी प्रयत्न करणे, हे ‘संभाषित’चे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

- संशोधनपर, भाष्यपर आणि पुस्तक परीक्षणपर असे तीन विभाग ‘संभाषित’मध्ये अंतर्भूत आहेत. या विभागांत समाविष्ट होणारे लेख सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक इत्यादी विविध क्षेत्रांशी संबंधित असल्यामुळे ही संशोधनपत्रिका समाजाच्या विविध स्तरांशी आपला वैचारिक अन्वय जोडेल, असा विश्वास आहे.

- मानव्यविद्याशाखेतील विविध अभ्यासविषयांशी निगडित सैद्धांतिक विवेचन करणाऱ्या लेखांच्या बरोबरीने समाजजीवनातील अनेकस्तरीय संदर्भांचे अभ्यासपूर्ण विश्लेषण करणाऱ्या लेखांचाही समावेश सदर संशोधनपत्रिकेत केला जाणार आहे. स्वाभाविकच, विविध अभ्यासविषयांशी संबंधित नवनवी सिद्धांतने मराठी भाषेतून पुढे आणणारा हा अतिशय महत्त्वाचा अकादमिक मंच ठरू शकेल.

# शोधनिबंधांसंदर्भातील मार्गदर्शक सूचना

- लेख स्वतंत्र संशोधनावर आधारित असावेत.

- लेखांची शब्दमर्यादा साधारण पुढीलप्रमाणे असेल.
  शोधनिबंध - ३५००-४००० शब्द
  भाष्य - १५००-२००० शब्द
  ग्रंथपरीक्षण - १०००-१२०० शब्द

- शोधनिबंध देवनागरी लिपीमध्ये युनिकोड फॉन्टमध्ये असावेत. फॉन्टचा आकार साधारणपणे १२ ते १४ बिंदूमध्ये (point) असावा.

- संदर्भ देण्याविषयीच्या मार्गदर्शक सूचना अंकाच्या शेवटी नोंदविल्या आहेत. लेखात संदर्भ देताना या सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे.

- संशोधनपर लेख विषयतज्ज्ञांच्या सकारात्मक अभिप्रायानंतरच अंकात समाविष्ट केले जातात.

- लेख editorinchief.sambhashit@mu.ac.in व editor.sambhashit@mu.ac.in या दोन्ही मेलवर पाठवावेत.

## प्रकाशक

*अधिष्ठाता, मानव्यविद्याशाखा यांचे कार्यालय, मुंबई विद्यापीठ, आंबेडकर भवन, कलिना कॅम्पस, विद्यानगरी, मुंबई – ४०००९८.*

ही संशोधनपत्रिका समाजविज्ञान, मानव्यविद्याशाखा आणि विधी या विद्याशाखांमधील सद्य:कालीन प्रश्नांना आंतरविद्याशाखीय दृष्टिकोणातून भिडणाऱ्या अभिनव आणि टीकात्मक निबंधांचा स्वीकार करते.

“In an ideal society there should be many interests consciously communicated and shared... In other words there must be social endosmosis.”

*Dr. B.R. Ambedkar*

# संपादकीय मंडळ

मुंबई विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. सुहास पेडणेकर आणि प्र-कुलगुरू प्रा. रविंद्र कुलकर्णी यांचा '**संभाषित**' ई- नियतकालिकाला असलेला आश्वासक पाठिंबा आणि सहकार्य यासाठी आम्ही आदरपूर्वक आभार मानतो.

**मुख्य संपादक** : **डॉ. राजेश खरात**
अधिष्ठाता, मानव्यविद्या शाखा
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**सल्लागार संपादक** : **डॉ. नीतिन आरेकर**
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख
श्रीमती चांदीबाई हिम्मतलाल मनसुखानी महाविद्यालय,
उल्हासनगर.

**संपादक** : **डॉ. शीतल पावसकर-भोसले**
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख
सेवा सदनचे आर. के. तलरेजा महाविद्यालय, उल्हासनगर.

**सहसंपादक** : **डॉ. नीतीन रिंढे**
साहाय्यक प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख
चेतनाचे श्रीमती कुसुमताई चौधरी कला महाविद्यालय,
वांद्रे (पूर्व), मुंबई.

**डॉ. मंगेश बनसोड**
वरिष्ठ साहाय्यक प्राध्यापक, अकॅडमी ऑफ थिएटर आर्ट्स
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**परीक्षण संपादक** : **डॉ. अश्विनी तोरणे**
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख
डॉ. टी. के. टोपे रात्र महाविद्यालय, परळ, मुंबई.

**साहाय्यक संपादक** : **डॉ. अनंत लोखंडे**
सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभागप्रमुख
एस.एम.आर. महाविद्यालय, कुडाळ, जि. सिंधुदुर्ग.

**प्रा. आशा हुंबे-पडळकर**
व्याख्याता, मराठी विभाग
भवन्स (कनिष्ठ) महाविद्यालय, अंधेरी, मुंबई.

**डॉ. नारायण गडदे**
साहाय्यक प्राध्यापक, तत्त्वज्ञान विभाग
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**डॉ. नारायण भोसले**
साहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**डॉ. प्रतिभा टेंबे**
अभ्यागत व्याख्याता व मुक्त संशोधन-अभ्यासक
बदलापूर, जि. ठाणे.

**डॉ. माधुरी पाथरकर**
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग
सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे.

**डॉ. लता पांचाळ**
अभ्यागत व्याख्याता व मुक्त संशोधन-अभ्यासक
कल्याण, जि. ठाणे.

**प्रा. संजय इंगोले**
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख
एल.जी.एम. महाविद्यालय, मंडणगड, जि. रत्नागिरी.

**डॉ. सुनील अभिमान अवचार**
साहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**डॉ. सोनाली वाखरडे**
साहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रा. विवेक कुडू**
साहाय्यक प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख
सोनोपंत दांडेकर कला महाविद्यालय, पालघर

मांडणी व सजावट : **प्रशांत पांचाळ**
ग्राफिक डिजायनर, कल्याण, जि. ठाणे.

तांत्रिक साहाय्य : **डॉ. लता पांचाळ**

या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी मुंबई विद्यापीठ, संपादक, संपादकीय मंडळ सहमत असेलच असे नाही.

# संपादकीय

गेल्या काही महिन्यांपासून महाराष्ट्राच्याच नव्हे तर संपूर्ण भारताच्या सामाजिक चर्चाविश्वात 'लोकशाही' हा कळीचा शब्द ठरला आहे. विविध भाषांमधील वर्तमानपत्रं, नियतकालिकं, विविध वाहिन्यांवरील परिसंवाद तसंच फेसबुक, व्हॉट्सॲप इत्यादी समाजमाध्यमांमधून, एका बाजूला 'लोकशाही' या संकल्पनेशी 'तत्त्वतः' संलग्न असलेला मूल्यात्मक आशय खणून काढला जातोय. तर दुसऱ्या बाजूला जात, धर्म, वर्ग, लिंग, प्रदेश, भाषा इत्यादी संदर्भांशी निगडित हितसंबंधांच्या दलदलीतील लोकशाही मूल्यांची दडपणूक पृष्ठपातळीवर आणली जातेय...

वास्तविक पाहता, लोकशाही मूल्यांचा अवकाश सर्वव्यापी आहे. मात्र ही मूल्यं प्रत्यक्षात आणणाऱ्या विविध संस्थात्मक यंत्रणा हितसंबंधांच्या राजकीय हेतूंनी भारलेल्या आहेत. समाजातील विविध श्रेणीबद्ध विभाजनमार्गांनी माणसांचं वेगवेगळ्या समूहात वर्गीकरण केलं आहे, अजूनही केलं जात आहे. अर्थात यातील कोणताही एक समूह पूर्णतः एकसंध नाही. त्यामुळे विशिष्ट समूहातील अनेक माणसांचं सामाजिक स्थानही एकरेषीय नाही. अत्यंत गुंतागुंतीच्या सामाजिक ओळखी घेऊन जगणारे हे समूह विविध प्रकारच्या अंतर्विरोधांसह स्वतःच्या सुरक्षिततेचा अवकाश शोधत आहेत. खरं तर सामाजिक रचितांनी घडविल्या जाणाऱ्या या ओळखी सांधता येणार नाहीत इतक्या सुट्या-सुट्या घटकांमध्ये माणसांना बंदिस्त करत आहेत. आर्थिक, राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक पातळीवरील अनेकस्तरीय ध्रुवीकरणाची प्रक्रिया याच विखंडीकरणाच्या गतिशास्त्राचं द्योतक आहे. 'सामाजिक न्याय', 'सहभाव', 'स्वातंत्र्य' आणि 'सहिष्णुता' या सगळ्या मूल्यांना पोखरणारी यंत्रणा मूर्त -अमूर्त स्तरावर समाजात अस्तित्वात आहे. परिणामी, संशय, भीती, अस्थिरता, अविश्वास आणि हितसंबंधी राजकारणातून सिद्ध झालेली सामाजिक गतिकी बहुतांश माणसांच्या जगण्याची संदर्भचौकट झाली आहे.

'बहुमता'चा आदर ही व्यापक संकल्पना लोकशाही मूल्यांचं अधिष्ठान आहे. परंतु विविध प्रकारच्या शोषणशासनयंत्रणांनी दुभंगलेल्या भारतीय समाजात 'बहुमता'ऐवजी 'बहुसंख्याकां'च्या मताला प्रमाण मानण्याची संस्कृती स्थिरावली आहे. 'लोकशाही'तील सर्वव्यापी मूल्यात्मक आशय सापेक्ष करण्याची तसंच या आशयाचं सुलभीकरण करण्याची राजकीय शक्ती या प्रक्रियेत कृतिशील आहे. प्रस्थापित

विकासाची प्रारूपं, 'लोकशाही' किंवा 'देशप्रेम' या संकल्पनांना दिली जाणारी प्रतीकात्मकता, लोकशाही राजकीय कार्यप्रणालीच्या संकेतांना दिला जाणारा सोयीस्कर छेद हे आणि असे अनेक संदर्भ याच अधिसत्तावादी राजकीय मानसिकतेची मूर्त रूपं आहेत.

लोकशाहीला नख लावण्याचा प्रयत्न करणाऱ्या या दमनकारी यंत्रणांना नकार देणाऱ्यांचे, त्याविरुद्ध विद्रोह पुकारणाऱ्यांचे, विविध मार्गांनी आंदोलन करणाऱ्यांचे आवाज अर्थातच आहेत. मात्र हे आवाज क्षीण करणाऱ्या राजकीय यंत्रणाही समाजात बहुसंख्येनं अस्तित्वात आहेत. संख्यात्मक पातळीवर कमी होत असलेल्या बंडखोर आवाजांना सत्तेची गाजरं दाखवणं किंवा वैचारिक दिशाभूल करून त्यांचा आवाज स्वतःच्या आवाजात जिरवून घेणं इत्यादी संदर्भ यादृष्टीने विचारात घेता येतील. इथे सावधपणे लक्षात घेण्याजोगा मुद्दा असाही आहे की, प्रस्थापितांच्या आवाजात सामावून जाणारे हे आवाज उलट्या बाजूने घडणाऱ्या तडजोडवादी राजकीय खेळीकडे अपरिहार्यपणे निर्देश करणारे आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर सुट्या-सुट्या समूहांच्या सुट्या-सुट्या प्रश्नांना भिडणारी एककेंद्री आंदोलनं लोकशाही चेहरा असलेल्या भांडवली समाजव्यवस्थेच्या विरोधाचं प्रारूप म्हणून पुढे येत आहेत. चळवळी, आंदोलनांची चौकट अशी एककलमी होणं हे एका बाजूनं भांडवली व्यवस्थेचं अपत्य आहे तर दुसऱ्या बाजूनं ते प्रस्थापित व्यवस्था अधिक बळकट करण्यास पूरक ठरणारंही आहे. लोकशाही मूल्यचौकटीचा सोयीस्कर अर्थ स्वीकारलेल्या समाजातील नागरिकांसमोर या सर्वंकष पेचाचं मोठं आव्हान आहे. लोकशाही मूल्यांचा 'जीवनशैली' म्हणून स्वीकार करण्यातील अपरिहार्यता आणि आग्रह ही या पेचाला भिडण्याची संभाव्य दिशा असू शकते. परंतु या कृतिशील दिशेचा अंकुरही सहभाव, सामाजिक न्याय आणि विवेकाची भूमी असलेल्या 'स्वप्नलोका'तच उगवण्याची दाट शक्यता आहे!

- डॉ. शीतल पावसकर-भोसले

# शोधनिबंध, भाष्य, आणि पुस्तक परीक्षण

# संभाषित

## अनुक्रम...


### शोधनिबंध

**हिंदुस्थानी संगीताचे प्रवाही स्वरूप** १४
साधना शिलेदार

**श्री.दा.पानवलकर यांच्या कस्टमविषयक कथांमधील पात्रचित्रण आणि वातावरणनिर्मिती यांतील परस्परपूरकत्व** २६
स्नेहा देऊस्कर

**अंतर, पृष्ठभाग आणि कोव्हीड-१९: एक भौगोलिक दृष्टिकोण** ४१
दीपेश करमरकर

### भाष्य

**तरीही पेपर निघत राहिला....** ६०
श्रीकांत बोजेवार

**कोरोना, टाळेबंदी आणि ग्रंथव्यवसाय** ६८
संजय भास्कर जोशी

**पुस्तक-व्यवहारावर लॉकडाऊनचे परिणाम काही नकारात्मक, काही सकारात्मकही...** ७५
प्रदीप चंपानेरकर

### पुस्तक परीक्षण

**ब्लॉगच्या आरशापल्याड : समकालाला थेटपणे भिडणाऱ्या कथा** ८४
सुजाता औटी

**थेरीगाथा-स्त्रीमुक्ती, समाज आणि तत्त्वज्ञान: स्त्रीमुक्तीच्या प्राचीन तत्त्वज्ञानाचे उत्खनन** ९१
सोमनाथ कदम

**बंजर धरती के बीज : मुक्ती आणि सामर्थ्याची दिशा ठरवणारी कविता** ९८
अरविंद सुरवाडे

### आदरांजली

**शाहिरीचा झंजावात - शाहीर अमरशेख** १०५
प्रकाश खांडगे

# शोधनिबंध

# हिंदुस्थानी संगीताचे प्रवाही स्वरूप

**साधना शिलेदार**

सहयोगी प्राध्यापक
संगीत विभाग
वसंतराव नाईक शासकीय कला व समाज विज्ञान संस्था, नागपूर
sadhanashiledar@gmail.com

भारतीय संस्कृती ही जगातल्या अतिशय प्राचीन संस्कृतींपैकी एक आहे. संस्कृतीचे जतन आणि संवर्धन शतकानुशतके आणि पिढ्यानपिढ्या अनेक माध्यमातून होत असते. संस्कृतीचे दर्शन अशा अनेक माध्यमातून घडत असले तरी एखाद्या संस्कृतीचे प्रतिनिधित्व करणारे सशक्त व चिरकालीन माध्यम म्हणजे त्या संस्कृतीतल्या कला होत. 'सत्य', 'शिव', 'सुंदर' ही भारतीय संस्कृतीची मूल्ये आहेत. यापैकी 'सौंदर्य' या मूल्याचे दर्शन कलांमधून घडते. कला संस्कृतीची जोपासना करतात. काळानुरूप कला स्वतःचे स्वरूप काही प्रमाणात बदलतात. काळाचे संस्कार व प्रभाव स्वीकारत कला नित्यनूतन परिवेशात वावरते. तिची काही अविभाज्य आणि शाश्वत मूल्येही असतात. स्थलकालानुरूप बदलणारी मूल्ये आणि चिरकाल टिकून राहणारी शाश्वत मूल्ये यांच्या संकरामुळे कला संस्कृतीचे प्रतिनिधित्व करण्यास सक्षम बनते.

संगीत ही हिंदुस्थानच्या संस्कृतीचे प्रतिनिधित्व करणारी अतिशय प्राचीन कला आहे. संस्कृतीच्या बरोबर संगीत कलाही विकसित होत गेलेली दिसते. विविध काळात विविध प्रसंगी संगीताशी संबंधित उल्लेख सापडतात. वीणापुस्तकधारिणी वागेश्वरी सरस्वती, सकल कलांचा अधिनायक नृत्यविशारद गणपती, बासुरीवाला कान्हा, हातात डमरू असलेले शंकर, तांडव नृत्य करणारे नटराज, हातात चिपळ्या आणि तंबोरी असणारे नारद असे देवदेवतांशी संबंधित संगीतविषयक उल्लेख जुळलेले आहेत. वाईट शक्तींचे प्रतीक म्हणून दसऱ्याला रावणाचे दहन केले जात असले तरी रावण हा संगीत कलेचा उपासक म्हणून प्रसिद्ध आहे. हिंदुस्थानचा गेल्या काही शतकांचा इतिहास आणि हिंदुस्थानी संगीताचा गेल्या काही शतकांचा इतिहास यामध्ये बरीच साम्यस्थळे आढळतात. या दोन्हीत परकीय राज्यकर्त्यांनी केलेल्या आक्रमणांचा इतिहास आहे. विविध काळातील ही आक्रमणे इतिहासाला नवनवी वळणे देतात. ही आक्रमणे केवळ राजकीय किंवा धार्मिक स्वरूपाची नव्हती. सत्ता काबीज करणे, गादी बळकावणे, आपल्या राज्याच्या सीमा विस्तारणे अशासारख्या राजकीय कारणांसाठी किंवा कट्टर धार्मिक भावनेने प्रेरित होऊनच ही आक्रमणे होत होती असेही नाही. दरबारी गायकांमध्ये चुरस लावणे, संगीताच्या क्षेत्रातील प्रतिस्पर्ध्याला कट करून पराभूत करणे, पराभूत राज्याच्या दरबार गायकाला आपल्या राज्यात आणून त्याला सन्मानाचे पद बहाल करणे असे सांगीतिक प्रेमाखातर केलेल्या आक्रमणांचे किस्सेही संगीतक्षेत्रात आवर्जून सांगितले जातात. परकीय आक्रमणांमुळे जे प्रभाव पडले त्यापैकी काही वरवरचे व तात्कालिक ठरले तर काही प्रभाव खोलवरचे

संगीतविश्व

व चिरकालीन ठरले. हे सर्व प्रभाव सहेतुक नव्हते. त्यापैकी कित्येक प्रभाव तर नकळत अजाणतेपणेही घडले होते. ते सर्वच जबरदस्तीने केले गेले असेही नाही. काहींसाठी तर इथले मूळ रहिवासी उत्सुकही होते. हे सर्व प्रभाव अयोग्य होते किंवा त्यामुळे मूळ संस्कृती नेहमी भ्रष्ट होत गेली असेही नाही. काही प्रभाव तर हिंदुस्थानला संपन्नही करून गेले. हे प्रभाव केवळ राज्यकर्त्यांकडून जनतेवर असे एकतर्फी लादले होते असे नव्हे. कित्येक प्रभाव तर 'आदान-प्रदान' या स्वरूपात एकमेकांवर परिणाम करून गेले; आणि त्याद्वारे दोन्ही संस्कृती संपन्न झाल्या. संस्कृतींचा- शैलींचा- विचारांचा संकर होणे, त्यांची आपापसात सरमिसळ होऊन त्यांचा एकमेकांवर प्रभाव पडणे व एकमेकांच्या प्रभावामुळे बदल होत जाणे ही प्रक्रिया आजतागायत सुरूच आहे. या संपूर्ण विचाराचे क्षेत्र काहीसे मर्यादित करून केवळ 'हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत' एवढ्याच क्षेत्राचा विचार केला तरी परिवर्तनांचा एक दीर्घ इतिहास डोळ्यांपुढे येतो.

संगीत कलेचा केवळ काही शतकांचा इतिहास माहीत असला तरी माहीत नसलेला त्याआधीचा शतकानुशतकांचा इतिहासही महत्त्वाचा आहे, ही जाणीव या संदर्भात विशेषत्वाने होते. संगीताचा अज्ञात काळ, त्यानंतरचा ज्ञात पण धूसर होत जाणारा प्राचीन इतिहास, अलीकडचा लख्ख- स्पष्ट व तुलनेने अर्वाचीन इतिहास- असा प्रवास बघितला तर शास्त्रीय संगीताच्या स्वरूपात सतत होत असणारे बदल विशेषत्वाने जाणवत राहतात. या बदलांचा वेध घेण्याचा व त्याद्वारे आजच्या संगीताचे बदलते स्वरूप न्याहाळण्याचा प्रयत्न नेहमीच कुतूहलाचा असतो.

ख्यालगायन ही आजची सर्वाधिक लोकप्रिय शास्त्रीय गायनशैली आहे. शास्त्रीय संगीतात धृपद, ख्याल इत्यादींचा अंतर्भाव होतो. या सर्वांचे मूळ प्राचीन 'प्रबंध गायनात' सापडते. सामवेदातील ऋचांचे गायन विशिष्ट प्रकाराने केले जाई. हे प्रबंधाचे उगमस्थान आहे. धृपदगायन हा त्यापुढचा टप्पा आहे. या सर्व शास्त्रीय गायनशैली म्हणून ओळखल्या जातात. यामध्ये शास्त्रीय-अशास्त्रीय असा भेद नसतो; किंवा फक्त हेच संगीत शास्त्रीय आहे व बाकीचे अशास्त्रीय आहे असाही दावा नसतो. 'संगीताच्या शास्त्राचे काटेकोर पालन करणारे' या अर्थाने 'शास्त्रीय किंवा शास्त्रोक्त' असा त्याचा अर्थ आहे. संगीताचे शास्त्रीय संगीत, उपशास्त्रीय संगीत आणि सुगम संगीत असे भेद केलेले आढळतात. यांचे स्वरूप अगदी भिन्न असले तरी या भेदांच्या सीमारेषा पुसट आहेत. हे वर्गीकरण पुढील गोष्टींवर अवलंबून आहे.

- शब्दाचे प्राबल्य – स्वर, लय आणि भाषिक वर्ण (शब्द) हे कंठसंगीताचे मूळ घटक आहेत. यापैकी स्वर-लय हे संगीताला आवश्यक घटक आहेत. गाण्यासाठी कोणतातरी वर्णोच्चार आवश्यक असला तरी अर्थपूर्ण 'शब्द' हा घटक आवश्यक नाही. मात्र 'शब्द' या घटकाचे संगीतातले महत्त्व जसजसे वाढत जाते तसतसे ते संगीत 'शास्त्रीय संगीत' गटाकडून क्रमाक्रमाने 'उपशास्त्रीय' व त्यानंतर 'सुगम' बनत जाते. शब्द या घटकाचे आधिक्य अथवा प्राबल्य हा या वर्गीकरणाचा आधार आहे.
- मांडणीचे सौंदर्य- राग आणि ताल हे शास्त्रीय संगीताचे मुख्य घटक आहेत. स्वराचे परिष्कृत रूप म्हणजे राग आणि लयीचे परिष्कृत रूप म्हणजे ताल होत. राग आणि ताल या दोन्ही संकल्पना हिंदुस्तानी संगीताची ओळख आहेत. सात शुद्ध आणि पाच विकृत असे एकूण बारा स्वर आहेत. या बारा स्वरांपैकी काही स्वर निवडायचे. त्यांना काही विशिष्ट वळणाने मांडायचे. त्यांना कमीअधिक महत्त्व द्यायचे ही रागाची मूळ संकल्पना आहे. एकदा हे स्वर, त्यांचे प्राबल्य आणि त्यांची वळणे ठरली की ते शास्त्र बनते व ते शास्त्रीय संगीतात कसोशीने पाळले जाते. लय व्यक्त करणाऱ्या मात्रांचे बोल, त्याचे खंड, मात्रांचे वजन ठरवणे अशा क्रियांमधून लयीला तालाचे रूप लाभते. राग आणि ताल ही हिंदुस्तानी संगीताची अन्योन्य वैशिष्ट्ये आहेत.

आधुनिक काळात ज्याप्रमाणे रागगायन प्रचलित आहे त्याचप्रमाणे प्राचीन काळी जातिगायन प्रचलित होते. चौथ्या शतकात *नाट्यशास्त्र* या प्रसिद्ध ग्रंथाचा कर्ता भरतमुनी यांनी आपल्याकडील प्रचारात असलेल्या सर्व गीतांची तपासणी करून काही विशिष्ट लक्षणे ज्या गीतात सामान्यपणे आढळतील अशा गीतांचा एक वर्ग समजावयाचा, या पद्धतीने प्रचारातील सर्व गीतांचे एकूण अठरा वर्ग केले व त्यांना 'जाती' हे नाव दिले. श्रुती, ग्रह, स्वर आदींच्या समूहातून जाती निर्माण झाल्या. *नाट्यशास्त्रात* जातींची दहा लक्षणे सांगितली आहेत. 'जाती म्हणजे एक प्रकारची निबद्ध गीते होती' असे सांगून डॉ. टेंकशे म्हणतात, "कालांतराने देशी संगीताचा प्रसार झाला त्याचा परिणाम हळूहळू मूळ शास्त्रीय नियमांकडे दुर्लक्ष करण्याकडे झाला असला पाहिजे. याची परिणती म्हणून जातीतून रागांची निर्मिती झाली असे असले पाहिजे." (टेंकशे १९७४ : ९)

इतर कलांप्रमाणेच रसनिष्पत्ती हे संगीतानेही आपले उद्दिष्ट मानले आहे. स्वरलयीच्या आधारे रसनिष्पत्ती साधणारे ते शास्त्रीय व काव्याच्या आधारे रसनिष्पत्ती साधणारे ते सुगम संगीत असते. काव्यजन्य भाव महत्त्वाचा मानणारे सुगम संगीत तर संगीतजन्य भाव महत्त्वाचा मानणारे ते शास्त्रीय संगीत असते. कित्येकदा शास्त्रीय संगीतासाठी 'रागदारी संगीत' अशी संज्ञा वापरलेली दिसते. ज्या संगीताचा हेतू राग मांडणे आहे ते शास्त्रीय संगीत होय. राग मांडण्याच्या निखळ हेतूऐवजी राग आधाराला घेऊन त्यामध्ये प्रसंगी बदल करण्याची मुभा संगीत जर घेत असेल तर ते शास्त्रीय संगीत नव्हे. रागनिष्ठतेकडून रागपूरकतेकडे असा हा प्रवास आहे. रागाच्या मूळ स्वरूपात काव्याच्या भावाच्या अनुषंगाने काही बदल करून गायल्यास 'रागगायन' हा हेतू बाजूला होऊन ते संगीत 'शास्त्रीयते'कडून 'उपशास्त्रीय'तेकडे वळू लागते. सौंदर्य, नावीन्य, भावाभिव्यक्ती, आविर्भाव-तिरोभाव यासारख्या विविध कारणांसाठी रागानियमांना मुरड घातली की ते संगीत उपशास्त्रीय ठरते कारण हे बदल निश्चित आणि कायमस्वरूपी नसतात. म्हणूनच रागनिष्ठ म्हणजे शास्त्रीय, रागपूरक म्हणजे उपशास्त्रीय आणि गीतनिष्ठ म्हणजे सुगम संगीत असेही म्हणता येईल.

'शास्त्रीय संगीत' या व्यापक संज्ञेच्या अधिक विचारासाठी शास्त्रीय संगीतातून 'काय' मांडले जाते आणि ते शास्त्रीय संगीतातून 'कसे' मांडले जाते या दोन बाजूंनी अभ्यास करता येईल. शास्त्रीय संगीतातून 'राग ख्याल शैलीने मांडला जातो' असे म्हणता येईल. राग हा आशय आहे तर ख्याल हा घाट आहे. शास्त्रीय संगीताचा इतिहास दोन समांतर संकल्पनांवर दिसतो. प्रबंध- धृपद- ख्याल हा एक स्रोत आणि जातिगायन - रागगायन हा दुसरा स्रोत.

**अ) प्रबंधाकडून धृपदाकडे**

प्रबंध ते धृपद आणि धृपद ते ख्याल अशी संगीताची उत्क्रांती मानली जाते. ही उत्क्रांती आहे. केवळ कालानुसार प्राचीन व अर्वाचीन असा फरक नाही. तो कालिक विकास आहे. ते एक सांगीतिक परिवर्तन आहे. एकातून दुसरे निघालेले आहे. याचे प्रत्यंतर अनेक गोष्टींमधून येते. पूर्वी प्रबंध संस्कृत भाषेत असत. त्यातल्या कवनांची संस्कृत भाषा सर्वसामान्यांना समजत नसे. प्रबंधाची अनेक कडवी असत. काव्याच्या वैविध्यामुळे ते काव्य अधिक प्रभावी ठरून सांगीतिक विकासाला कमी जागा मिळते. सांगीतिक विकासापेक्षा

साहित्यविषयक विकास अधिक झाल्यामुळे ते संगीत शास्त्रीय संगीत उरत नाही, ते सुगम संगीत बनू लागते. प्रबंधाकडून धृपदाकडे वळताना काव्याची लांबी कमी केली असल्याचे आढळते. त्यामुळे सांगीतिक विकासाला जास्त वाव मिळाला. 'वर्तमान संगीताच्या संदर्भात 'सालगसूड' नावाचा प्रबंध विशेष महत्त्वाचा आहे. ध्रुवपद किंवा धृपदाचे मूळ या सालगसूड प्रबंधात आढळते. सालगसूड प्रबंधाच्या सात गीतींपैकी ध्रुव गीतीतून ध्रुवपद जन्माला आले. ध्रुवगीतीच्या उद्ग्राहाला 'स्थायी' म्हणतात. आभोगाच्या प्रथम खंडाला संचारी तर दुसऱ्याला आभोग म्हटले जाते. उद्ग्राह ते संचारी हे अंतर पार करणाऱ्या भागाला अंतरा म्हणतात. (मिश्र १९९९ :२३०)

"ध्रुव प्रबंधातून सर्व धृपदे जन्माला आली. प्रबंधाची अनेक लक्षणे धृपदात सापडतात. प्रबंधाचे धृपद होताना त्यात अनेक परिवर्तने झाली. या प्रबंधांमध्ये संस्कृतऐवजी प्रचलित देशी भाषांमधल्या रचना बांधून राजा मानसिंग तोमर यांनी प्रबंधातून ध्रुवपदांची रचना केली व कालांतराने ध्रुवपदाऐवजी धृपद हा शब्द प्रचलित झाला." (चांदोरकर १९९३ : ७३)

एखादी कविता सादर करणे आणि एक गीत सादर करणे यात जसा फरक आहे तसाच फरक पडत गेला असावा. मराठीतील कवितेत अनेक वृत्तांना, छंदांना स्वतःची अशी परंपरागत चाल आहे. या छंदातले काव्य चालीवर गाण्याचा प्रघात आहे. शार्दूलविक्रीडित वृत्ताचे काव्य प्रचलित मंगलाष्टकांच्या परंपरागत चालीत चपखल बसते; परंतु मंगलाष्टकांचे पारंपरिक गायन हे काव्यगायन आहे. त्याला गीताचा घाट आणण्यासाठी त्यात अनेक गोष्टींची भर टाकावी लागते.

ईश्वराच्या आराधनेसाठी प्रबंध गायले जात होते. ईश्वराची पूजा हे साध्य व संगीत हे साधन बनले. साहजिकच संगीताला दुय्यम स्थान होते. प्रबंधातली कवने व त्याच्या गायनाचे नियम प्रामुख्याने 'कशा नंतर काय आणि कोणती ओळ कितीदा' अशासारखे होते. हे नियम संगीताच्या विकासासंबंधी नव्हते तर ती समूहाला लागणारी शिस्त या स्वरूपाचे होते. प्रबंध एकाच वेळी एकामागून एक असे वेगवेगळ्या तालात आणि रागातही असत. संगीताचे मुख्य घटक हे प्रबंधाच्या काळात फारसे विकसित झालेले नव्हते. भारतीय संगीताची आजची वैशिष्ट्ये प्रबंधगायनातून विस्तारपूर्वक व्यक्त होत नव्हती. पूजेचा भाग या हेतूने प्रबंधगायन देवालयांमधून केले जात असे. काय म्हटले जात आहे व कसे म्हटले जात आहे; यापैकी काय म्हटले जात आहे याकडे जास्त लक्ष दिले जात असावे. प्रस्तुतीकरणाची शैली या

अर्थाने प्रबंधात संगीताचा विकास झालेला नव्हता. प्रबंध देवालयामधून गायले जात असत. हे त्याकाळच्या संगीताचे प्रस्तुतीकरण मानले तर संगीतात काय ऐकायचे असते आणि ते त्याकाळी कसे ऐकले जात होते याचाही विचार करणे आवश्यक ठरते. पूजाअर्चांच्या वेळी ईश्वराच्या मूर्तीच्या पुढ्यात बसून भक्तिभावाने संगीत गायले जाते तेव्हा गायकाच्या मनातली भक्तीची भावना आणि त्याची सौंदर्याविषयीची संवेदना यात भक्ती वरचढ ठरते. असा अनुभवही आहे आणि निरीक्षणही आहे. संगीताची ही प्रस्तुती कित्येकदा बरीच आत्ममग्न स्वरूपाची असते. प्रबंधाला धृपदाचे रूप लाभल्यानंतर ते राजदरबारात रथीमहारार्थींपुढे, राजदरबारातील इतर मान्यवरांपुढे व प्रसंगी इतर संस्थानातील राजदरबारी गायकांच्या उपस्थितीतही गायले जाऊ लागले. त्यामुळे ते आत्ममग्न न राहता श्रोत्यांच्या दृष्टीने आकर्षक असे बनवले जाऊ लागले असावे. यादृष्टीने संगीताला सादरीकरणाचे भान आले. प्रस्तुतीकरणाच्या दृष्टीने त्याचा स्वतंत्र विचार होऊ लागला. ती एक शैली किंवा घाट बनू लागली. ही संगीताच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची पायरी आहे. यादृष्टीने विचार करताना असे लक्षात येते की धृपदाच्या सादरीकरणाबरोबरच संगीताच्या सादरीकरणाचे स्वतंत्र शास्त्र तयार झाले असावे व तेव्हापासून संगीताला स्वतंत्र कला म्हणून अस्तित्व लाभले असावे.

**ब) धृपदाकडून ख्यालाकडे**

'ख्याल' ही सध्याची सर्वात प्रचलित व लोकप्रिय शास्त्रीय गायनशैली आहे. धृपद गायकीची लोकप्रियता ओसरणे आणि ख्यालगायकीची पाळेमुळे रोवली जाणे या एकाचवेळी घडत गेलेल्या प्रक्रिया आहेत. धृपद आणि ख्याल हे शास्त्रीय संगीताचे कालानुक्रमे दोन टप्पे मानले तरी त्याआधारे 'धृपदातून ख्याल निर्माण झाला' असा निष्कर्ष अयोग्य ठरतो. या दोन शैलींच्या संदर्भात पुढील प्रकारच्या शक्यता दिसतात. 'धृपदातून ख्याल निर्माण झाला' असे मानले तर धृपदाचा अस्त आणि ख्यालाचा उगम या दोन घटना कार्यकारणभावाने संबंधित ठरतात. हा शास्त्रीय संगीताचा विकास असेल किंवा ऱ्हास असू शकेल. 'धृपदाचे संस्कार घेऊन ख्याल शैली विकसित झाली' असे मानले तर या मतांमध्ये धृपदाचे संस्कार तर आहेतच पण त्यावर त्याशिवाय इतर संस्कार आहेत हे मान्य केले जाते. 'धृपदाच्या अस्ताच्या वेळी ख्याल लोकप्रिय झाले.' या मतात दोन्हीमध्ये कार्यकारणभाव अपेक्षिला नसून या दोन घटना केवळ योगायोगही असू शकतील, ही शक्यता ध्यानात

संगीतकलाविहार (सिडबार शीर्षक: संगीत)

घेतली आहे. म्हणजे ख्यालाचा उगम धृपदात नाही ही शक्यतादेखील लक्षात घेतली गेली आहे. कारण कालिक विकास आणि उत्पत्ती या भिन्न गोष्टी आहेत. धृपद व ख्याल यामध्ये अनेक साम्यस्थळे सापडतात. अनेक धृपदे ख्यालात परावर्तित झालेली दिसतात. पूर्वी मंदिरांमध्ये गायली जाणारी धृपदे आता ख्याल म्हणून प्रसिद्ध आहेत. ख्याल जन्माला आला आणि हळूहळू धृपदगायकी मागे पडली असे मानले तर यासाठी धृपदाच्या गायकीतल्या उणिवा कारणीभूत आहेत असे जाणवते.

यासंदर्भातले डॉ.अशोक रानडे यांचे विचार महत्त्वाचे आहेत. ते म्हणतात, "रागविस्तार ही नियंत्रक शक्ती असलेल्या संगीत प्रकाराचे कालस्तरावरील व स्वरस्तरावरील लयावतार संपूर्णतः वेगळे पडतात. स्वर व काल या स्तरांचे मेलन होत नाही. हे दोन्ही स्तर वाजवीपेक्षा अधिक वेगळे काढले जातात. संपूर्ण आविष्कार दुभंगलेला, खंडित वाटू लागतो. कलाविष्काराचा अंतिम प्रत्यय हा एकसंध असावा या सौंदर्यशास्त्रीय सिद्धांताला सुरूंग लागतो." (रानडे १९७० : ९६)

श्री. कृष्णचंद्र ज्ञाते यांच्या मते "धृपद गायकीतील शब्दांचे महत्त्व, तालांचे बंधन, उत्कंठा विसर्जन या तत्त्वांचा अभाव, स्वर व काल या दोन स्तरांच्या मेलनाचा अभाव आणि आविष्कारातील दुभंगलेपण या दोषांमुळे ही गायकी सदोष होती. शिवाय या गायकीचा एक साचाच होऊन गेला. म्हणून पुढील काळात हे दोष वगळण्याचे प्रयत्न केले गेले असावेत आणि सौंदर्य जाणिवेने स्वर- ताल- शब्द यांची रचना मांडण्याचा प्रयत्न झाला असावा.धृपद गायकीत ठरावीक राग ठरावीक सुरावटीने गायला जात असे. या आविष्कारपद्धतीत बदल होऊ नये अशी शिस्त पाळली जात असे. प्रबंधगायनात शब्दांचे महत्त्व आणि राग व ताल यासंबंधात काटेकोरपणा-नियमबद्धता होती. या कडक बंधनामुळे त्या गायनात साचेबंदपणा आला. शब्दांचे महत्त्व कमी करण्याच्या, आविष्कार सुटसुटीत व सुलभ करण्याच्या प्रवृत्तीतून धृपदगायनाचा जन्म झाला असावा. प्रबंधातून रूप वेगळे झाले तरी हे दोष उरलेलेच होते." (ज्ञाते २०००: ४५)

'धृपद' ही भक्तिरसप्रधान गायनशैली आहे.धृपदाच्या केवळ ईश्वरस्तुती आणि राजस्तुती एवढ्यापुरत्या मर्यादित भक्तीपर काव्यविषयांऐवजी ख्यालाने शृंगारविषयक काव्याचा अंतर्भाव केला. ते काव्य सर्वसामान्यांना जवळचे वाटू लागले. त्यात काव्यविषयांची विविधता आली. काव्याला पूरक असे भावप्रदर्शन संगीताच्या माध्यमातून घडवण्यासाठी वैविध्यपूर्ण शैली निर्माण

झाल्या. शृंगाररसाला पोषक अशा हळुवार गायनशैलीचा वेध घेतला जाऊ लागला असावा. संगीताचे राजाच्या दरबारात आगमन झाले. देवालयांमधील संगीतगायन दरबारात आल्यामुळे धृपदाने सादरीकरणाचा स्वतंत्र घाट तयार केला होताच. ख्यालाने त्याहीपुढची पायरी गाठली. विविध प्रकारचा मोठा श्रोतावर्ग उपलब्ध झाला. जाणकार तसेच सर्वसामान्य अशा विविध प्रकारच्या श्रोत्यांना संगीत ऐकणे खुले झाले. विविध प्रकारच्या श्रोत्याला आवडू शकेल अशा संगीताचा विचार प्रकर्षाने होऊ लागला. धृपदशैली ही जोरकस किंवा मर्दानी गायनशैली आहे. ख्याल जोरकस असतोच असे नाही. प्रबंधाचे काही नियम शिथिल करून धृपदगायकी निर्माण झाली होती. मात्र तरीही बरेच नियम त्यात कायम होते. स्वस्थान नियमांनी केलेल्या आलापात प्रथम स्वस्थान, द्वितीय स्वस्थान, तृतीय स्वस्थान असे स्वरक्षेत्र मर्यादित असायचे. स्वस्थान- प्रतिग्रहणिका –भंजनीचे नियम पाळून गाताना व्यक्तीच्या स्वाभाविक सांगीतिक आविष्काराला बराच अडसर होत असावा. त्यादृष्टीने आणखी काही नियम शिथिल करून स्वतःच्या आविष्कारासाठी योग्य मोकळीक घेण्याच्या उद्देशाने ही नवी गायकी उदयास आली असावी.

श्री वामनराव देशपांडे यांच्यामते “अठराव्या शतकाच्या अंतापर्यंत धृपदाला अबाधित महत्त्व होते. त्यानंतर मात्र राजे व त्यांचे दरबारी यांना धृपदातील तालविषयक गणिती चमत्कारांचा व त्यांच्या कवनातील तोचतोपणाचा कंटाळा येऊ लागला. धृपदाच्या कवनात प्रणय अथवा शृंगारभावनेला स्थान मिळालेले नव्हते आणि इकडे मोगल राजे व बादशहा यांना विलासाची खूपच ओढ लागली होती. सदारंग अदारंगाने शृंगारिक काव्य रचून प्रसिद्ध केले. शृंगारिक कविता आपल्या स्वभावानुसार तालातील गुंतागुंत किंवा गणिती चमत्कारांना वाव देऊ शकत नाही. त्यामुळे ख्यालाच्या सादरीकरणात नव्या म्हणजे धृपदापेक्षा वेगळया (स्वर) कल्पनांना स्थान मिळाले व त्यातून ख्यालगायन, आलापी, बोलबाट, बोलताना, तानक्रिया वगैरे शैलीवैशिष्ट्यांचा अंतर्भाव झाला.” (देशपांडे १९८८: २५ )

लोकप्रियतेच्या शिखरावर असलेल्या धृपद गायकीच्या उत्तुंगतेने प्रभावित होण्याऐवजी ती मागे पडू लागणे या घटनेचा मानसशास्त्रीय दृष्टिकोणातून विचार केला तर त्याची काही कारणे स्पष्ट होऊ लागतात. एखाद्या विशिष्ट काळातील गायक लोकांवर प्रभाव पाडू शकले नाहीत तर पर्यायाने ती गायकी मागे पडू लागते. अशावेळी ती गायकी तारून नेणारा

एखादा कलाकार निर्माण झाला तर गायकी मागे पडण्याची प्रक्रिया मंदावते व कालांतराने पुनरुज्जीवित होते. ह्याचवेळी इतर गायकी आवडू लागली तर मूळ उणिवा अधिकच अधोरेखित होतात. मूळ गायकीवर नव्याने आवडणाऱ्या गायकीचा प्रभाव पडतो. ह्या प्रभावाचे क्षेत्र संपूर्ण गायकी बदलवून टाकण्याइतके कमीअधिक व्यापक व प्रभावी असू शकते. ख्याल गायकीच्या उगमाबाबत नेमके हेच घडले असावे. धृपदातून ख्याल जन्माला आले हे मान्य असले तरी धृपदातून ख्यालाकडे जाताना त्या स्वरूपावर परिणाम करणारे इतरही अनेक घटक कसे महत्त्वाचे आहेत हे शोधण्यासाठी त्याकाळी प्रचलित असलेल्या इतर प्रकारांचा आढावा घ्यावा लागतो.

धृपदगायन करणाऱ्यांवर कव्वाली या गायनप्रकाराचा प्रभाव पडला असावा व त्यातून ख्याल जन्माला आले असावे. धृपदाची लयकारी आणि कव्वालीची तान या दोन्हीमधून ख्याल तयार झाले. कव्वालांनी ही नवी प्रणाली लवकरच आत्मसात केली. कव्वालांच्या पुढच्या पिढीला 'कव्वालबच्चे' असे म्हटले जाऊ लागले. पूर्वी गोबरहार, खंडार, नोहार हे डागूर अशा धृपदाच्या चार बानी म्हणजे गायनशैली होत्या. धृपदाची गायकी तिच्या लोकप्रियतेच्या प्रगल्भ अवस्थेत कशी होती हे ध्वनिमुद्रित स्वरूपात उपलब्ध नसल्यामुळे ऐकता येत नाही. मात्र त्यांची समृद्ध परंपरा असणारी डागूर बानी आता चाळीसाव्या पिढीत आहे. आजचे धृपदगायन ऐकून व त्याचा अभ्यास करून धृपद गायकीची साधारण कल्पना करता येते. धृपदात साधारणपणे भक्तिरसप्रधान काव्य असते. काव्यातील अक्षरे फार पसरट नसतात. लय खूप विलंबित नसते. त्यामुळे शब्दांकडे लक्ष वेधले जाते. सुरुवातीचे 'नोम-तोम' निबद्ध नसले तरी त्यात अंगभूत लय डोकावत असते. बंदिश सुरू झाल्यावर तालबद्ध भागात रागाचा विचार प्रामुख्याने तालस्तरावर होत असतो. तालाच्या, लयीच्या, खंडांच्या, मात्रांच्या वजनाच्या अनुषंगाने रागविस्तार होतो. रागाचा संपूर्ण विस्तार बराच वेळ तालपूर्व स्थितीत झाल्यामुळे हा विचार आकर्षक चैतन्यमयी वाटतो. शब्दही नव्याने आल्यामुळे व साधारणपणे शब्दांची ठेवण फार स्पष्ट नसल्यामुळे अर्थाबरोबरच बोल, बोलबनाव, गमक, हुंकार, बेहलावे इत्यादी अनेक मार्गांनी हा विस्तार सुरू असतो. पुढे क्रमाक्रमाने गायकाची अंतर्गत विस्तारलय वाढत जाते तशी या गमकक्रियांना गमकाच्या तानांचे रूप लाभते. ख्यालासारखा तानांचा स्वतंत्र विभाग नसला तरी शब्द घेऊन विविध प्रकारची लयकारी करत असताना जेव्हा गाण्याची विस्तारलय वाढते तेव्हा त्या तानाच ठरतात.

संगीताचे प्रयोजन काय, या प्रश्नाच्या उत्तराभोवती प्रबंध ते धृपद आणि धृपद ते ख्याल हा प्रवास होताना दिसतो. संगीत कशासाठी, या प्रश्नाला अनेक उत्तरे मिळू शकतात. एक साधन म्हणून रंजनासाठी, भक्तीसाठी किंवा अन्य ज्या ज्या प्रयोजनांसाठी संगीत वापरले जात आहे, त्या साध्याच्या अनुषंगाने संगीताचे स्वरूप बदलत जाईल. संगीत कशासाठी गायले किंवा वाजवले जात आहे या उद्दिष्टाच्या आधारे संगीताचे स्वरूप बदलते. भक्ती किंवा ईश्वर उपासना यासाठी संगीत वापरले जात असेल तर त्याची सर्व अंगे त्या साध्यानुसार बदलतात. संगीत जर रंजनासाठी वापरले जात असेल तर कोणाचे रंजन होणे अपेक्षित आहे, यानुसार त्याचे स्वरूप बदलत जाईल.

प्राचीन काळापासून श्रोत्याच्या रुचीनुसार गायन बदलत गेलेले दिसते. कोणत्याही कलेचा विकास त्या काळातील श्रोत्यांच्या बदलत्या अभिरुचीचे फल असते. संगीत हा एक उपचार मानला जात असेल तर त्यात नियमांची कठोरता जाचक ठरत नाही. वर्षानुवर्षे तोचतोपणा येऊनही त्याची यांत्रिकपणे जपणूक होत राहते. धृपदाच्या संदर्भात हेच लक्षात येते. कडक नियमांमुळे गायकाच्या प्रतिभेला वाव मिळत नाही असे काहींना वाटते तर नियमांच्या कठोरतेचा काहींना अडसर होत नाही. काही प्रमाणात हे कठोर नियमही तालमीचे किंवा घरंदाजपणाचे लक्षण मानून जपले जातात. साधन म्हणून संगीत वापरले जात असेल तर साध्याच्या आड येणारे संगीताचे नियम मागे पडतात. संगीताचे स्वरूप साध्याला अनुकूल राहील, ही गोष्ट स्वाभाविक आहे. उदाहरणार्थ, भक्तीसाठी संगीत वापरले जात असेल तर भक्ती या भावनेला जाचक ठरणारे संगीताचे नियम बाजूला पडतील. प्रसंगी रागाची शुद्धता, मांडणीचे नियम नीट पाळले जाणारही नाहीत. रंजनासाठी संगीत वापरले जात असेल तर कोणाचे रंजन करायचे आहे यावरून संगीताचे स्वरूप बदलेल. राजदरबारात गाताना राजदरबारातील गवई या नात्याने पदाची प्रतिष्ठा असते. राजदरबाराचा योग्य सन्मान राखायचा तर शुद्धता व कल्पकता याचा उच्चतम स्तर राखणे आवश्यक आहे. याच भावनेने राजाश्रयात संगीत फुलले व जपले गेले. मात्र याचबरोबर काही राजांच्या शृंगारिक वृत्तीला पूरक असे संगीत दरबारात सादर होऊ लागले. संगीताचे स्वरूप बदलतही गेले. त्यामुळे दरबार गायकाचे संगीत व दरबारातील इतर संगीत या दोन पातळ्यांवर संगीतात बदल होत गेले. धृपदातून ख्यालाचा जन्मही याच प्रकारे झाला असावा. कठोर बंधने शिथिल झाली. रंजकतेच्या दृष्टीने संगीताचा विचार होऊ लागला.

### सध्या प्रचलित असलेले गायनाचे स्वरूप

ख्यालगायकीचा उगम होऊन चार शतकांचा कालावधी लोटला आहे. प्रस्थापित गायनशैलीच्या कडक नियमांना शह देण्याच्या वृत्तीतून ख्यालाचा जन्म झाला. अपरिवर्तनशील वाटणाऱ्या नियमांना झुगारून ख्यालाची शैली जन्माला आली. गेल्या काही शतकांचा हिंदुस्थानी संगीताचा किंवा ख्यालगायनाचा इतिहास लक्षात घेतला तर ख्यालाचे रूपही सतत प्रवाही राहिले आहे असे जाणवते. ख्यालाचे स्वरूप तयार होताना वेळोवेळी विविध प्रभाव स्वीकारले गेले. प्रचलित लोकशैलींचे व प्रादेशिक गायनशैलींचेही प्रभाव जोपासले गेले. ज्या आधारावर ख्यालाचा जन्म झाला तो अपरिवर्तनशीलतेला शह देण्याचा ख्यालाचा स्वभाव आजही कायम आहे. म्हणूनच ख्यालाची रीत बनली तरी त्याचा 'विधी' बनला नाही. त्याची कडक नियमावली तयार झाली नाही. ख्यालाचा मार्ग आखला असला तरी त्यात स्वतःच्या अंदाजाने बदल करण्याचा मार्गही खुला आहे. एकंदरीत ख्यालाचे स्वरूप सतत परिवर्तनशील- संस्कारशील– ग्रहणशील व प्रवाही राहिले आहे. म्हणूनच भविष्यातील ख्याल गायनाचे स्वरूप कसे असेल याबद्दल उत्सुकता आहे.

### संदर्भ


१. चांदोरकर, विजया (१९९३) : *भारतीय संगीत में निबद्ध तथा अनिबद्ध गान,* दिल्ली विश्वविद्यालय प्रकाशन, दिल्ली.

२. टेंकशे, शं. अ. (१९७४) : *रागवर्गीकरण*, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ प्रकाशन, मुंबई.

३. देशपांडे, वा. ह. (१९८८) : *मुक्तसंगीतसंवाद*, संगोराम, श्रीरंग (संपा), गानवर्धन प्रकाशन, पुणे.

४. मिश्र, राजेश्वर (१९९९) : *संगीत रत्नाकर एक अध्ययन*, राधाकृष्णन प्रकाशन, दिल्ली.

५. रानडे, अशोक (१९७१) : *संगीताचे सौंदर्यशास्त्र*, मौज प्रकाशन, मुंबई.

६. ज्ञाते, कृष्णचंद्र (२०००) : *भारतीय संगीत स्वरूप व विचार*, मौज प्रकाशन, मुंबई.

संशोधन

# श्री.दा.पानवलकर यांच्या कस्टमविषयक कथांमधील पात्रचित्रण आणि वातावरणनिर्मिती यांतील परस्परपूरकत्व

**स्नेहा देऊस्कर**

सहयोगी प्राध्यापक व प्रमुख
मराठी विभाग
रामनिरंजन झुनझुनवाला महाविद्यालय, मुंबई
sneha.deuskar@gmail.com

संभाषित

श्री.दा.पानवलकर यांच्या उपलब्ध नव्व्याण्णव कथांपैकी एकोणपन्नास कथा ग्रामीण परिसरात, तर पन्नास कथा शहरी / नागर परिसरात घडताना दिसतात. हा परिसर हा कथागत वातावरणाचा प्रधान व महत्त्वपूर्ण घटक आहे. पानवलकर ज्या अनुभवाचा प्रत्यय आपल्या कथांमधून देतात त्यात शहर व गाव यांना, त्यांतील सांस्कृतिक वातावरणाला एक अर्थपूर्ण अशी भूमिका आहे. शहर व गाव हे या कथावास्तवाचे एक अविभाज्य अंग आहे.

पानवलकर यांच्या नागर जीवनाशी निगडित कथांमध्ये मुख्यत्वेकरून मुंबई महानगर हा परिसर चित्रित झालेला दिसतो. मुंबईतील समुद्र किनारा व तेथील गोदी व कस्टम ऑफिसे [‘तीळ’ *(गजगा)*, ‘छिनाल टेकडी’ *(गजगा)*, ‘बगळा’ *(औदुंबर)*, ‘झळा’ *(सूर्य)*, ‘समुद्राच्या लाटा’ *(असंग्रहित)*, ‘कैवल्य’ *(जांभूळ)*, ‘नाइन नाइन पॉइंट नाइन’ *(कांचन)*, ‘ओ पास्कल’ *(सूर्य)*, इत्यादी], कधी मुंबईतील चाळी [‘काबुलीवाला’ *(गजगा)*, ‘पूटू’ *(औदुंबर)*, ‘ट्रायल’ *(सूर्य)*, ‘चिनाब’ *(चिनाब)*, ‘चावी’ *(कांचन)*, इत्यादी], मुंबईतील झोपडपट्टी [‘कमाई’ *(जांभूळ)*, ‘जन्म’ *(कांचन)*] इराणी वा उडुपी हॉटेल [‘ट्रायल’ *(सूर्य)*, ‘यापरि सांडुनि दमयंती’ *(औदुंबर)* इत्यादी], हॉस्पिटल [‘अग्निसर्प’ *(जांभूळ)*, ‘कैवल्य’ *(जांभूळ)*], कॉलेज [‘अनाहत’, *(एका नृत्याचा जन्म)*], हे स्थलपरिसर या कथांतून साकारलेले दिसतात. तर पानवलकर यांच्या ग्रामीण जीवनाशी संबंधित कथांमध्ये खेडेगावातील तसेच नागर भागातील पारंपरिक घरे [‘गजगा’ *(गजगा)*, ‘यापरि सांडुनि दमयंती’ *(औदुंबर)*, ‘बार’ *(औदुंबर)*, ‘पाढा’ *(सूर्य)*, ‘सहदेवा, अग्नी आण!’ *(एका नृत्याचा जन्म)*, ‘जांभूळ’ *(जांभूळ)*, इत्यादी] केळीची गार [‘उगीच’ *(औदुंबर)*, ‘अजन्मा’ *(एका नृत्याचा जन्म)*, ‘जांभूळ’ *(जांभूळ)*], रान, शेताचा वावर [‘वायलर’ *(औदुंबर)*, ‘दट्ट्या’ *(सूर्य)*, ‘सशाचा डबरा’ *(सूर्य)*, ‘एका नृत्याचा जन्म’ *(एका नृत्याचा जन्म)* इत्यादी], मंदिर [ ‘हलाहल’ *(गजगा)*, ‘गारठा’ *(एका नृत्याचा जन्म)*, ‘ओलीस’ *(एका नृत्याचा जन्म)*, ‘भूमी’ *(एका नृत्याचा जन्म)*, ‘हुंकार’ *(जांभूळ)*, इत्यादी], एस.टी. व बस स्थानक [‘रिकामा प्याला’ *(सूर्य)*, ‘बक अप रावण’ *(एका नृत्याचा जन्म)*, ‘गानवांचा फणस’ *(कांचन)*, ‘नागवा’ *(कांचन)*, इत्यादी], वेश्यावस्ती [‘आडवा बोळ’ *(औदुंबर)*, ‘खिंड’ *(चिनाब)* इत्यादी], स्मशानभूमी [‘यापरि सांडुनि दमयंती’ *(सूर्य)*, ‘अजन्मा’ *(एका नृत्याचा जन्म)*, ‘जांभूळ’ *(जांभूळ)* इत्यादी], तसेच संस्थान परिसर [‘श्रीमंतांचा वस्तरा’ *(औदुंबर)*, ‘गारठा’ *(एका नृत्याचा जन्म)*, ‘सुंदर’

(*सूर्य*), ‘माझं नाव धैर्यधर’ (*सूर्य*) इत्यादी] अशा विविध स्थलपरिसरांत ही कथा वावरताना दिसते.

हे सर्व घटक नागरी, ग्रामीण भावविश्व साकारण्यात क्रियाशील झाले आहेत. पानवलकर यांच्या कथांचा हा गाभा म्हणता येईल. या परिसरांखेरीज ही कथा इतर परिसरांतही घडताना दिसते. ही कथा कधी जंगलात [‘वायलर’ (*औदुंबर*), ‘सशाचा डबरा’ (*एका नृत्याचा जन्म*) इत्यादी], तर कधी कारखान्याच्या परिसरात [‘आंघूळ’ (*गजगा*), ‘कैची’ (*कांचन*)]; कधी चित्रपटाच्या स्टुडिओत वा सेटवर [‘धंदा’ (*चिनाब*), ‘हणमंताची निळी घोडी’ (*कांचन*)]; तर कधी विमानतळ [‘बाहुली’ (*चिनाब*), ‘वास्तुदेवता’ (*कांचन*), (परमात्म्याचा अंगठा - पूर्वनाम)] अशा विविध स्थलांवर ही कथा साकारताना दिसते. एस्.टी.चा प्रवासानुभव साकारताना ही कथा ग्रामीण परिसरापासून मुंबईपर्यंत फिरते. [‘गानवांचा फणस’ (*कांचन*), ‘रिकामा प्याला’ (*सूर्य*), ‘नागवा’ (*कांचन*) इत्यादी ] तर कस्टमचा अनुभव व्यक्त करताना ही कथा समुद्राच्या विविध परिसरांमध्ये - बंदर, गोदी, बोट / लाँच / बगळा इत्यादी ठिकाणी घडताना दिसते. कस्टमविषयक एकूण सोळा कथांपैकी नऊ कथा वरील समुद्र परिसरात घडतात.

कस्टम व गुन्हेगारी विश्वाशी निगडित कथांमध्ये रात्रीच्या विविध छटांचे दर्शन घडते. दिनचक्राची व ऋतुचक्राची विविध भावरूपे या कथेत चित्रित झाली आहेत. कालाच्या विशिष्ट प्रहराची भाववृत्ती आणि निवेदक, पात्रे, यांचा संवेदनस्वभाव यांतील परस्परचनेतून हे अनुभवरूप साकार झालेले दिसते. स्थल-काल-परिसरातील हे वैचित्र्य व विविधता श्री.दा.पानवलकर यांच्या कथांतील अनुभवरूपांच्या संपन्न वैचित्र्यांशी व विविधतेशी निगडित आहे असे म्हणता येईल.

पानवलकर यांच्या कथेतील स्थल-कालाचा हा धावता आढावा आहे. येथून पुढे कस्टमविषयक कथांच्या अनुषंगाने, स्थल-काल घटकाचे स्वरूप आणि कथात्म प्रयोजन यांसंदर्भात कथागत जीवनार्थ व कथेतील वातावरण यांच्या स्वरूपाचा सविस्तर आढावा घेऊ.

पानवलकर यांनी मराठी कथेला अपरिचित असणारे कस्टमचे विश्व हा कथानुभव एकूण सोळा कथांमधून साकारला आहे. ‘सर्च’ (*औदुंबर*), ‘बगळा’ (*औदुंबर*), ‘लोळवलेला दिवस’ (*सूर्य*), ‘तीळ’ (*गजगा*), ‘झळा’ (*सूर्य*), ‘ओ पास्कल’ (*सूर्य*), ‘केस’ (*चिनाब*), ‘बाहुली’ (*चिनाब*), ‘गाणारा पलंग’ (*कांचन*), ‘वास्तुदेवता’ (*कांचन*), ‘गर्वगीत’ (*कांचन*), ‘नाइन

नाइन पॉइंट नाइन' *(कांचन)*, 'शून्य' *(कांचन)*, 'चावी'*(कांचन)*, 'पिंपळ सळसळला' *(कांचन)*, 'कैवल्य'*(जांभूळ)* या त्या कथा होत.

कस्टमशी संबंधित जीवनाचे - तस्करी, चोरटे धंदे करणारे गुन्हेगार, त्यांना साथ देणारे लोक, या साऱ्यांना पकडणारे व त्यांच्यावर केस करणारे विविध कस्टम अधिकारी अशा व्यक्तींच्या विविध पातळ्यांवरील विशिष्ट जीवनाचे पैलू उलगडणाऱ्या या कथा आहेत.

श्री.दा.पानवलकर यांनी पात्रचित्रणातून मानवी समाजातील विविध वृत्तिप्रवृत्तींना व त्या वृत्तिप्रवृत्तींमागील प्रेरणास्रोतांना आपल्या कथाविश्वात महत्त्वाचे स्थान दिलेले दिसते. कस्टमशी संबंधित निरनिराळे व्यवसाय व उपद्व्याप करणारी असंख्य पात्रे त्यांनी निर्माण केली आहेत. श्रेणीनुसार कस्टम अधिकारी, बोटीवरील कस्टम अधिकारी, तस्करी करणारी स्त्री-पुरुष पात्रे आदी स्वरूपात ही पात्रे प्रकट झालेली दिसतात. या पात्रांचे स्वरूप थोडक्यात पुढीलप्रमाणे नोंदविता येईल.

अ) कार्यकुशल कस्टम अधिकारी ('बगळा', 'लोळवलेला दिवस', 'नाइन नाइन पॉइंट नाइन', 'गर्वगीत', 'सर्च' इत्यादी)

आ) कस्टम अधिकाऱ्याच्या आंतरिक विश्वाचा शोध घेणाऱ्या कथा ('केस', 'कैवल्य', 'तीळ', 'सर्च' आदी)

इ) कस्टममधील कार्यपद्धतीचे आणि कार्यबाहुल्याचे दडपण घेऊन वावरणारा अधिकारीवर्ग ('झळा' 'लोळवलेला दिवस' इत्यादी)

ई) आपल्या कामाचे महत्त्व पुरेसे न जाणणारे अधिकारी ('ओ पास्कल', 'पिंपळ सळसळला' इत्यादी)

उ) उपजीविकेसाठी दारू, सोने, अफीम आदींची तस्करी करणारी पात्रे ('शून्य', 'गाणारा पलंग', 'बाहुली' आदी)

'नाइन नाइन पॉइंट नाइन', 'गर्वगीत', 'कैवल्य', 'लोळवलेला दिवस' इत्यादी कथांमधील ही सर्व पात्रे त्यांच्यावरील जबाबदारी ओळखून जबाबदारी पूर्ण करण्यासाठी अथक आणि कठोर परिश्रम घेणारी आहेत. जिथे चोरट्या मालाची ने-आण होऊ शकते अशा ठिकाणी (समुद्र-गोदी, विमानतळ आदी) कार्यरत असलेली ही पात्रे आपल्या व्यवसायाशी व आपल्या कर्तव्याशी एकनिष्ठ आणि प्रामाणिक असलेली दिसतात. वास्तविक पाहता त्यांच्या सभोवतालचे विश्व हे खोट्या वृत्तिप्रवृत्तीने व धनलालसेने पछाडलेल्या लोकांचे विश्व आहे. त्यांच्याभोवती कार्यतत्परता, कार्यबाहुल्य व प्रामाणिकपणा यांना

विरोध करणारे वातावरण असूनही ही पात्रे कर्तव्यापासून दूर जात नाहीत. निवेदक प्रतिकूल वातावरणातही कार्यबाहुल्य व प्रामाणिकपणा यांना महत्त्व देणाऱ्या पात्रांचे चित्रण करून सर्वसामान्यांना अपरिचित असलेल्या अनुभवाचे दर्शन घडवितो. अशा प्रकारच्या पात्रचित्रणात निवेदकाने व्यक्तिविशिष्टतेला फारसे महत्त्व दिलेले दिसत नाही.

असे असले तरी 'नाइन नाइन पॉइंट नाइन', 'केस', 'कैवल्य', 'तीळ', 'सर्च' आदी कथांमधील पात्रचित्रणात निवेदकाने त्या त्या कस्टम अधिकाऱ्याच्या आंतरिक भावविश्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. उदाहरणार्थ, 'नाइन नाइन पॉइंट नाइन' *(कांचन)* या कथेतील व्हिक्टरसाहेब हे पात्र कथागत वास्तवात आपल्या सहकारी अधिकाऱ्यावर (सुधाकर) फारसा विश्वास ठेवताना दिसत नाही. याचे कारण त्याच्या हाताखाली कार्यरत अधिकारी हे अप्रामाणिक आहेत हे नसून त्याचे कौटुंबिक भावजीवन संपुष्टात आलेले आहे, हे आहे असे निवेदक दाखवून देतो. म्हणूनच प्रस्तुत कथेतील पात्र-पात्रसंघर्ष हा विशिष्ट वातावरणाच्या पार्श्वभूमीवर आकारास आलेला दिसतो.

या कथा समुद्र, विमानतळ, कस्टम ऑफिस वा पात्रांची श्रीमंती दाखविणारी घरे, गोदी, विविध तपासणी कक्ष अशा स्थल-परिमाणात घडतात.

उदाहरणार्थ, 'बगळा' *(औदुंबर)*, 'तीळ' *(गजगा)*, 'झळा' *(सूर्य)*, 'ओ पास्कल' *(सूर्य)*, 'गर्वगीत' *(कांचन)*, 'नाइन नाइन पॉइंट नाइन' *(कांचन)*, 'शून्य' *(कांचन)*, 'कैवल्य' *(जांभूळ)*, या आठ कथा बोटी, छोटे पडाव, समुद्राचा परिसर अशा वातावरणाच्या पार्श्वभूमीवर साकार होतात.

'तीळ' *(गजगा)* ही एक अशी कस्टमविषयक कथा आहे की ज्या कथेत चोरी-तस्करी यांचे संदर्भ नाहीत. ही कथा कस्टम अधिकारी व तरुणी एडिथ यांमधील क्षणिक आकर्षण व्यक्त करते. या कथेतील अनुभवविश्व स्त्री-पुरुषांमधील क्षणिक आकर्षणाला, ओझरतेपणी घेतलेल्या शारीरसुखाला अधोरेखित करणारे आहे. त्यामुळे या कथेतील पात्रे प्रत्यक्ष समाजव्यवस्थेतील मूल्यभान समुद्राच्या परिसरात जाणीवपूर्वक हरवून बसलेली दिसतात.

'तीळ' या कथेचा काळ उतरत्या संध्याकाळपासून रात्री बारा वाजेपर्यंतचा आहे. नववर्षाच्या पूर्वसंध्येला नववर्षाचे स्वागत करण्यासाठी आयोजित केलेली पार्टी ही घटना या कथेत महत्त्वाची आहे. रात्री बारा वाजता नववर्षाचे स्वागत करायचे आहे. त्या उत्साहात ही संपूर्ण संध्याकाळही

आनंदी व उत्साही वातावरणाने भारलेली आहे. 'बोट' या स्थलपरिसरामुळे जगापासून तुटलेपणाची आणि म्हणूनच बंधनमुक्ततेची (मूल्यभान हरवणे) जाणीव पात्रांच्या मनात आहेच. त्यात संध्याकाळ व रात्र या कालामुळे भर पडून पात्रे एकमेकांकडे मुक्तपणे आकर्षिली गेलेली दिसतात. नववर्षाच्या स्वागतासाठी आयोजित पार्टी व तेथील संगीत-नृत्य, या पार्श्वभूमीवर निवेदक व एडिथ यांच्या मनातील आकर्षणभाव फुलणे, विकसित होणे शक्य झाले आहे. निवेदक व एडिथ यांच्या मनातील हे आकर्षण फुलवणे हेच या स्थल-काल-योजनेचे प्रमुख प्रयोजन आहे असे म्हणता येईल.

मूल्यभान हरविलेली पात्रे 'ओ-पास्कल' (*सूर्य*) या कथेतही आढळतात. या कथेतील जातीने कोळी असलेली लक्ष्मी दारूचा चोरटा व्यापार सुरळीतपणे करता यावा म्हणून कस्टम अधिकाऱ्याची भोगेच्छा तृप्त करते. यामागील तिची दृष्टी विशिष्ट व्यवसायाने घडविलेली आहे. ज्या परिसरात तिच्याकडून या प्रकारचे वर्तन घडते त्या परिसराला हे जणू नित्याचेच आहे. इथे समाजमान्य नीतिविषयक संकेत पात्रमनांना स्पर्श करताना दिसत नाहीत. निवेदक विशिष्ट स्थलपरिमाणातील पात्रांचे असे वर्तन कथन करून मूल्यविषयक प्रश्नचिन्हच उभे करतो आणि कस्टमचे जग हे प्रत्यक्ष जगाहून निराळे असल्याचे समर्थपणे दाखवून देतो.

कस्टमविषयक कथांमध्ये तस्कर वा चोरटा व्यापार करणाऱ्या व्यक्ती, त्यांचा शोध घेणारे कस्टम अधिकारी यांचे विविध अनुभव साकारले आहेत. यांपैकी 'बगळा' (*औदुंबर*), 'नाइन नाइन पॉइंट नाइन' (*कांचन*) या दोन कथांमधील घटनाही प्रत्यक्ष बोटीवर (बगळयावर) घडतात. या कथांमध्ये चोरट्या मालाचा शोध घेतला जातो. या शोधमोहिमांच्या वर्णनांतून या बोटीवरील सर्व पात्रांच्या (खलाशी, त्याचे सहकारी, संशयित तस्कर, त्यांना साथ देणारे बोटीवरील लोक, कस्टम अधिकारी इत्यादी) संस्कृतीचा व त्यांच्या विशिष्ट मानसिकतेचा प्रत्यय येत राहतो. निवेदक अशा प्रसंगी पात्रांच्या सभोवतालचे जे वर्णन करतो त्या वर्णनातून त्यांच्या मानसिकतेची आंदोलने अधिक स्पष्टपणे वाचकाच्या प्रत्ययाचा विषय होतात. कथागत परिसराचे वर्णन पात्रांचे अनुभवविश्व सहजपणे उलगडत कथार्थाला एक प्रकारची सहजता प्राप्त करून देते. हेच सदर स्थलयोजनेचे कथात्म कार्य आहे, असे म्हणता येईल. उदाहरणार्थ,

....रात्रभर धिंगाणा घालून दर्या थंडावला. त्या धिंगाण्यात कधीतरी बगळयाच्या शिडाच्या खांबाला बांधलेल्या फारुकच्या गळयातलं

घुंगूर वाजायचं. क्षणभर जमिनीवर असल्याचा भास व्हायचा. तेवढ्यात बगळ्याबाहेर धपाल्लकन् आवाज झाला की पाहावं तर लाटेवरच्या ओल्या काळोखात रूपेरी माशाचं अर्धवर्तुळ उमटून बघता बघता पाण्यात घुसायचं. मागोमाग त्याहून मोठं वर्तुळ चमकून दिसेनासं व्हायचं. आणि याच धमालीत दूरवरचा लाल दिवा डोळे मिचकावून गप्प राहायचा.

('बगळा' (*औदुंबर*), पृ.१०६)

बगळ्यावरचा लपवलेला माल शोधूनही सापडत नाही, त्यामुळे कस्टम अधिकारी अधिक सतर्कपणे वावरत आहेत. त्याच प्रसंगी मुख्य संशयित नाखुदा अब्दुल्ला सुलतानही शांतपणे बसला आहे. या दोन्ही पात्रांना जाणवणारे एक प्रकारचे जखडलेपण उपरोक्त वातावरणातून सूचित केले आहे. 'नाइन नाइन पॉइंट नाइन' या कथेतही हीच भावस्थिती 'कोल्ड स्टोअरेज'मधील गोठलेपणाची जाणीव व्यक्त करणाऱ्या निवेदनातून साकार होते. 'नाइन नाइन पॉइंट नाइन'मधील व्हिक्टर कुटुंबपातळीवर वैफल्याचा अनुभव घेतो, त्यामुळे त्याचा परिणाम त्याच्या मानसिकतेवर होऊन अधिकाऱ्यांबरोबरचे वागणे बदललेले दिसते.

'नाइन नाइन पॉइंट नाइन' या कथेतील सुधाकर हे पात्र कष्टपूर्वक सोन्याचा शोध घेते. पण त्याचा वरिष्ठ अधिकारी व्हिक्टर त्याचे श्रेय स्वतःकडे घेतो. वरिष्ठ अधिकाऱ्याच्या या वर्तनामुळे सुधाकर या पात्राला आपले शोषण होत आहे या जाणिवेमुळे जो ताण सोसावा लागतो तो ताण या कथेत शब्दांकित झालेला दिसतो. अधिकाऱ्यांमधील व्यावसायिक संबंधांच्या स्वरूपावर हे अनुभवविश्व आधारलेले आहे.

'झळा' या कथेत बापू या पात्राला वरिष्ठ अधिकाऱ्याच्या संशयी स्वभावाला सतत सामोरे जावे लागते. त्याची जी कुचंबणा होते त्या कुचंबणेला, रखरखीत उन्हाच्या पार्श्वभूमीवर या कथेत शब्दरूप मिळालेले दिसते.

'गर्वगीत'सारख्या कथेमध्ये आपल्या व्यवसायाशी एकनिष्ठ असलेल्या अधिकाऱ्याच्या कर्तव्यकठोर कृतीभोवती अनुभवविश्वाची गुंफण करण्यात आली आहे. उफाळलेल्या समुद्रात खाऱ्या पाण्याचा मारा सोसत आपल्याला नेमून दिलेल्या बोटीची रात्रभर राखण करणे व त्यासाठी लाँचवरून बोटीवर उडी मारण्याची जीवघेणी व धोकादायक कृती करणे असे वाचकालाही श्वास रोखून धरायला लावणारे कस्टम अधिकाऱ्याच्या कामाविषयीचे अनुभव या कथेत व्यक्त झाले आहेत. अशा स्वरूपाचे विशिष्ट व्यवसायातील चित्तथरारक

अनुभव मराठी कथेत इतक्या तपशीलवारपणे पानवलकरांनी प्रथम आणले याची येथे आवर्जून नोंद करावीशी वाटते.

कस्टममध्ये काम करीत असताना चोरट्या व्यापाराचा शोध घेणे हे कस्टम अधिकाऱ्यांचे काम असते. हा शोध सहज-सोपा नसतो. अवतीभवती परस्परांविषयी प्राधान्याने संशयाचे वातावरण असते. अशा वातावरणात अथक परिश्रम करून आपले कर्तव्य पार पाडणाऱ्या व्यक्तींचे अनुभवविश्व पानवलकर यांच्या काही कथांमध्ये उलगडते. उदाहरणार्थ, 'गर्वगीत', 'लोळवलेला दिवस', 'नाइन नाइन पॉइंट नाइन', 'बगळा', 'सर्च' इत्यादी.

काही कथांमध्ये जसे प्रामाणिकपणे व कष्टपूर्वक काम पार पाडणाऱ्या अधिकाऱ्यांच्या मानसिक विश्वाचे, त्यांच्या धोका पत्करूनही धाडसी वृत्तीने कर्तव्य पूर्ण करणे या स्वरूपाचे अनुभव साकारले आहेत. त्याप्रमाणे काही कथांमध्ये बेफिकीर अधिकाऱ्यांचे भावविश्व साकारलेले दिसते. ('ओ पास्कल', 'पिंपळ सळसळला' इत्यादी) या कथांमधील अनुभवार्थाला पोषक अशा वातावरणाचे उपयोजन हे या कथांचे सामर्थ्यस्थळ म्हणावे लागेल.

ज्या तस्करांशी कस्टममधील अधिकाऱ्यांचा संबंध येत असतो, ज्यांच्यामुळे कस्टम अधिकाऱ्यांना सतत सतर्क राहावे लागते, विशेष त्रास सहन करावा लागतो अशा तस्करांचे अनुभवही 'बगळा', 'शून्य', 'गाणारा पलंग', 'नाइन नाइन पॉइंट नाइन', 'बाहुली' या कथांमध्ये साकारतो.

कस्टमचे जग सर्वसामान्य जगाहून वेगळे असते. येथील अधिकारी दिवसरात्र आपल्या कुटुंबापासून दूर राहून अविरत काम करीत असतात. त्यांच्या सभोवतालचे वातावरण नीरस, कंटाळवाणे असे असते. त्यामुळे एक प्रकारची संवेदनशून्यता त्यांच्या ठायी निर्माण झालेली असते. या संवेदनशून्यतेचे दर्शन घडविणारे अनुभवविश्व 'ओ पास्कल', 'पिंपळ सळसळला' या कथांमध्ये साकारते, त्याचबरोबर अशा संवेदनशून्य वातावरणात राहूनही इतर संवेदनशून्य व बेजबाबदार अधिकाऱ्यांना समजून घेण्याची संवेदनशीलता 'पिंपळ सळसळला', 'नाइन नाइन पॉइंट नाइन' या कथांमध्ये आढळते.

अशीच संवेदनशीलता 'कैची' कथेतील निवेदक कस्टम अधिकाऱ्याच्या वर्तनातून व्यक्त होते. येथे अधिकाऱ्याने कामगार स्त्रीचे प्रश्न व तिचे सामर्थ्य ओळखून कार्यकुशलतेने परिस्थिती हाताळण्याचा अनुभव चित्रित होतो. संवेदनशीलतेतून आलेल्या कार्यकुशलतेबरोबरच कामगार पुढारी होऊ

पाहणाऱ्या स्त्रीशी त्या अधिकाऱ्याचे नाजूक भावबंध जुळण्याचा अनुभवही सूचित होतो व या सूचकतेमुळेच अनुभवविश्वाला दुपदरी स्वरूप येते.

कुटुंबापासून दूर राहून आपले काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना वर्षाच्या शेवटची संध्याकाळ कसा वेगळा अनुभव देते ते 'तीळ' या कथेत व्यक्त होते. मध्यमवर्गीय जीवनमान, मध्यमवर्गीय मूल्यभान, नैतिकतेचे निकष या सर्वांना मागे सारून आला क्षण आनंदाने जगणे कसे महत्त्वाचे मानले जाते हा अनुभव या कथेत साकारतो.

कस्टमविषयक कथांमध्ये काही कथा एखाद्या सरळरेषीय व गमतीदार अनुभवाभोवती गुंफलेल्या दिसतात. उदाहरणार्थ, कस्टमच्या जगामध्ये नव्याने अधिकारी म्हणून प्रवेश केलेल्या व्यक्तीचे अननुभवी भावविश्व प्रकट करणारी (किस्सेवजा) कथा म्हणून 'केस' या कथेतील अनुभवविश्वाकडे पाहू शकतो. खबऱ्या म्हणून मुरलेल्या व्यक्तीने, केस करायची इच्छा असणाऱ्या व त्याद्वारे आपल्या चाळीतील तरुणीवर प्रभाव टाकण्याचे स्वप्न पाहणाऱ्या अधिकाऱ्याला कसे हातोहात फसवले त्याचा अनुभव या कथेत व्यक्त होतो. त्याचबरोबर प्रत्यक्ष सोने न पकडताही तो चाळीतील लोकांच्या दृष्टीने सोन्याचा शोध घेण्यात यशस्वी कसा ठरलेला आहे, असा अनुभवही या कथेत व्यक्त होतो. अशा रीतीने दुहेरी पातळीवरचा फसवणुकीचा अनुभव कथेत साकारतो.

'चावी' या कथेत एका कस्टम अधिकाऱ्याचा अनुभव व्यक्त होतो. हा अनुभव कस्टम खात्यातील त्याच्या कामाशी प्रत्यक्षपणे संबंधित नाही. परंतु कस्टम अधिकारी असूनही रात्री व विशिष्ट परिस्थितीत त्याला युनिफॉर्मशिवाय व घरातील तोकड्या कपड्यात बाहेर फिरावे लागते. अशा परिस्थितीत त्याला येणारा अवहेलनेचा, फजितीचा अनुभव या कथेत गमतीशीर प्रसंगांतून व्यक्त होतो. पोलीस अधिकाऱ्यांपासून ते गल्लीतील कुत्र्यांपर्यंत सर्वजण त्याच्याकडे संशयाने पाहतात. या प्रकारामुळे त्याला रात्रीची झोपही न मिळणे व रात्रभर घराबाहेर व्यर्थ फिरावे लागल्याने विलक्षण थकून जाणे असा प्रत्यक्षात अनपेक्षित व चमत्कारिक प्रसंग ओढवण्याचा अनुभव या कथेत कथाकाराने साकारलेला दिसतो.

'गाणारा पलंग' या कथेत एका नवशिक्या बेकार तरुण चोराचा विशिष्ट अनुभव चित्रित झाला आहे. एका भुरट्या चोराला आपण पकडले जाऊ याची भीती वाटणे, त्या भीतीपोटीच लपून राहाणे, लपण्याचा जीवघेणा अनुभव घेत असतानाच त्या घरातील जोडप्याने स्मगलिंगचा चोरटा प्रचंड

माल उतरवल्याचे पाहणे असे चोरीचेच दुहेरी अनुभव व्यक्त होतात. मात्र तो भुरटा चोर त्या घरातून आपली सुटका करून घेताना स्वतः चोरी करण्याचे टाळून पोलिसांना स्मगलिंगच्या मालाची खबर देतो. यातून कथाकाराने चोरी करणे व दुसऱ्याची चोरी पकडणे, अप्रामाणिकपणा व प्रामाणिकपणा या विरोधी अनुभवांची गुंफण केली आहे. विशिष्ट परिस्थितीत माणसाच्या वृत्तीत डोकावणाऱ्या विरोधाभासाचा अनुभव प्रस्तुत कथेत शब्दांकित होतो. प्रचंड मोठा श्रीमंती फ्लॅट, त्यातील उंची फर्निचर, फ्रीजमधील उत्तम पदार्थ या वातावरणाच्या पार्श्वभूमीवर एका कफल्लक चोराने स्वतः चोरी न करता, पोलिसांना स्मगलिंगच्या मालाची खबर देऊन दाखवलेली मनाची श्रीमंती निवेदकाने अत्यंत प्रभावी पद्धतीने अधोरेखित केली आहे.

पानवलकर यांच्या एकूण कथाविश्वामध्ये मानवाठायी नांदणाऱ्या मूलभूत प्रेरणा या कथाविश्वाचा भाग झालेल्या दिसतात. कस्टमविषयक अनुभव व्यक्त करणाऱ्या ‘कैवल्य’, ‘शून्य’ या कथांमध्येही असा अनुभव साकारलेला दिसतो.

‘कैवल्य’ या कथेमध्ये सुपेकर या कस्टम अधिकाऱ्याला चोरटे सोने पकडण्यात यश आले तरी त्याचे श्रेय त्याला मिळत नाही. व्यावसायिक जीवनात अपयशाचा अनुभव घेणाऱ्या या अधिकाऱ्याला वैयक्तिक जीवनात व कामजीवनातही अपयश व एकटेपणाच भोगावा लागतो. मुळात आजारी आईसाठी अविवाहित राहिलेल्या सुपेकर या पात्राला आपल्या मनात दाबून ठेवलेल्या कामप्रेरणेवर विजय मिळवता येत नाही. आपल्या सहकाऱ्याच्या मृत्यूनंतर त्याच्या कोलमडून पडलेल्या, परावलंबी झालेल्या पत्नीजवळ राहण्याची संधी त्याला मिळते. पण तिच्या अचानक मृत्युमळे सुपेकर याही बाबतीत अतृप्त व एकटा राहतो. व्यावसायिक जीवनात व वैयक्तिक जीवनात एकटेपणा सोसणाऱ्या पात्राने कामभावनेसारख्या मूलभूत मानवी प्रेरणेवर विजय मिळविण्यात अपयशी होणे व कामप्रेरणेचा विषय हाती आल्यावरही तो अचानक हिरावला गेल्याने पुन्हा अपयशी होणे असे दुहेरी अनुभवविश्व येथे साकारलेले दिसते.

‘शून्य’ या कथेत पत्नीने (नॉर्मा) सोन्याची तस्करी करणाऱ्या पतीला (रॉकी) आपल्या सुखलोलुपतेचे साधन बनविणे हा अनुभव व्यक्त होतो. आपण पत्नीच्या सुखाचे ‘साधन’ बनल्याची जाणीव झालेला पती पत्नीला आपल्या भोगलालसेचे साधन बनवतो. पत्नीच्या सुखासाठी स्वतःचा जीव धोक्यात घालून तस्करी करणाऱ्या पतीचे उद्ध्वस्त झालेले भावविश्व या कथेत

उलगडते. तस्करीच्या पार्श्वभूमीवर पती-पत्नी नातेसंबंधातील श्रेयस हरवत चालले आहे हा जीवनार्थ येथे अधोरेखित होतो. समुद्र व समुद्राभोवतालचा स्थलपरिसर या अस्थिर पार्श्वभूमीवर मानवी जीवनातील अस्थिरता, तसेच मानवाचे हरवत चाललेले मूल्यभान या कथांमध्ये अधोरेखित होते. या विशिष्ट स्थलपरिमाणातील पात्रांचे असे वर्तन कथन करून पानवलकर यांनी मूल्यविषयक प्रश्नचिन्हच वाचकांसमोर अप्रत्यक्षपणे उभे केलेले दिसते. कस्टमचे जग हे प्रत्यक्ष जगापेक्षा वेगळे असल्याची जाणीवही ते समर्थपणे करून देतात. कस्टमविषयक कथांमध्ये पात्रमनातील अस्थिरता आणि भूप्रदेशाची अस्थिरता यांच्यात एकात्मतेचे नाते कल्पून निवेदक मानवी जीवनव्यवस्थेवर अप्रत्यक्षपणे भाष्य करताना दिसतो.

'सर्च' या कथेमध्ये दडवलेल्या सोन्याचा शोध घेण्याची एक व्यावहारिक पातळी आहे. पण हा शोध घेतानाच तपास अधिकारी अपरिहार्यपणे तेथे असलेल्या त्या कुटुंबातील लहान बेगमच्या देहमनाचाही शोध घेताना दिसतो. या शोधाला बेगमनेही दिलेला मूक प्रतिसाद कथाकाराने सूचित केला आहे. शोधाचा असा दुहेरी अनुभव कथार्थाला एक अधिकचे परिमाण प्राप्त करून देतो. या कथेतील मुंबईतल्या गजबजाटातील कोंदट चाळ, काळोखा जिना इ. वातावरणाचे घटक मानवी मनोव्यापाराची गुंतागुंत नेमकेपणाने अधोरेखित करतात.

'वास्तुदेवता' या कथेत शंकराचार्यांनी दिलेल्या काठीच्या संदर्भात कस्टम अधिकाऱ्यांच्या ठायी नांदणारी परात्मता चित्रित झालेली आढळते. काठी हा अपारंपरिक श्रद्धाविषय आहे. तसेच विमानतळावरील कस्टमचा तपासणीकक्ष, हे काठीची पूजा करण्याचे स्थळही अपारंपरिक व विरोधाभासात्मक आहे. या गमतीशीर व विरोधाभासात्मक परिस्थितीत कस्टमसारख्या सदैव सतर्क व जागरूक राहणाऱ्या अधिकाऱ्यांच्या ठायी त्यांच्या नकळत ही जी परात्मता नांदते आहे, त्याचे दर्शन या कथेत घडते. ही परात्मताही तीन प्रकारची आहे. या काठीला जिवापाड जपून तिची रोज पूजा करणारा वाय. डी. महामुनी आपल्या श्रद्धाविषयाची चिकित्सा करीत नाही. तर काही अधिकारी त्याच्या श्रद्धेचीच खिल्ली उडवतात आणि इतर अधिकारी रोज मिळणारा पेढा कोणतीही चौकशी व चिकित्सा न करता मुकाट्याने खातात. आपल्या कृतीचा, तार्किकतेच्या पातळीवरून विचार न करणाऱ्या पात्रांच्या तीन प्रकारच्या कृतींमुळे या कथेत परात्मतेचा तिहेरी

अनुभव विमानतळावरील कस्टमच्या तपासणीकक्षासारख्या रूक्ष जागेच्या पार्श्वभूमीवर व्यक्त होतो.

पानवलकरलिखित या कथांमधील तस्करी करणाऱ्या पात्रांच्या आयुष्याची दिशाही अस्थिर आहे; कारण त्यांना चोरी पकडली जाण्याची भीती घेरून राहिलेली आहे. चोरटे जसे भीतीने ग्रासलेले आहेत, तसेच तस्करीच्या शोधासाठी झटणारे अधिकारीही अस्थिरतेने ग्रासलेले आहेत. कारण तस्करीचा शोध लागला नाही तर त्याचे परिणाम नोकरीत भोगावे लागण्याची शक्यता आहे. ही भीती त्यांचे आयुष्य अस्थिर बनवते. विशिष्ट व्यवसायातील ही पात्रे (गुन्हेगार, अधिकारी) जीवनातील अस्थिरतेच्या अनुभवाला सामोरी जातात. त्यांच्या अस्थिरतेला अधिक गडद करणाऱ्याचे कार्य 'बगळया'च्या भोवतालचा सततचा अस्थिर असा जलमय परिसर करताना दिसतो.

कथागत वास्तवात पात्रे सजीवतेचा अनुभव देतात, तर स्थल निर्जीवतेचा अनुभव देते. निवेदक या दोघांमधील अस्थिरता एकमेकांसमोर आणून पात्रजीवनातील भयावहता स्पष्टपणे साकार करतो. आणि त्यामुळेच सदर कथांमधील विशिष्ट परिमाण लाभलेल्या स्थलयोजनेला कलात्मकता प्राप्त होते.

या कथांमधील काही अधिकारी पात्रे एका वेगळयाच कारणामुळे भयग्रस्ततेने वावरताना दिसतात. उदाहरणार्थ, ['कैवल्य' (*जांभूळ*), 'नाइन नाइन पॉइंट नाइन' (*कांचन*)] आपण ज्या तस्करीचा शोध घेत आहोत, त्यावर जिवापाड काम करीत आहोत आणि एका निर्णयाप्रत येत आहोत, त्या कामाचे श्रेय दुसराच एखादा अधिकारी बळकावण्याची भीती या पात्रांना वाटते. एकीकडे तस्करांचा शोध घेताना, तो शोध लागत नाही म्हणून आलेली अस्थिरता ही पात्रे अनुभवतात, तर दुसरीकडे तो शोध घेऊनही त्याचे श्रेय लाभत नाही या अस्थिरतेत ती जगतात. बोटीवरचे आयुष्य जगणाऱ्या पात्रांच्या जीवनातील विविध प्रकारची अस्थिरता निवेदक विशिष्ट स्थल परिमाणाच्या पार्श्वभूमीवर साकारताना दिसतो. कथागत पात्रांची मानसिकता आणि कथेतील विशिष्ट वातावरण यांच्या एकात्मतेचे दर्शन या कस्टमशी संबंधित कथांमध्ये सातत्याने घडते.

कस्टम अधिकाऱ्यांना ज्या शोधमोहिमा हाती घ्याव्या लागतात, त्यांतील धोक्याचे सूचनही खवळलेला समुद्र, उफाळलेला दर्या, उसळणाऱ्या

लाटा या स्थलपरिसरातील विशेष वातावरणातून घडते. उदाहरणार्थ, 'गर्वगीत' *(कांचन)* या कथेतील वातावरण पाहू -

......बाहेर कुठंही आणि कुठपर्यंतही नजर टाकावी तर तिथं पर्वतप्राय लाटाच लाटा फेसांचे फुत्कार फेकत, खवळलेल्या नागिणींच्या झुंडीप्रमाणं एकमेकांच्या अंगावर चवताळून तुटून पडताना दिसत होत्या. एकाक्षणी ज्या ठिकाणी पाण्याचा अजस्र डोंगर उत्पन्न होई, त्या क्षणी दुसऱ्या ठिकाणी त्या डोंगराची खोलच खोल दरी झालेली दिसे. पर्वतांना जर पळता येत असतं तर अशा प्रकारचं दृश्य आपणास जमिनीवर पाहायला मिळालं असतं. समुद्राचं ते भयासूर दृश्य पाहून अफाट छातीच्या माणसाचीही छाती फाटली असती!

('गर्वगीत', *(कांचन)*, पृ.५८)

'शून्य' या कथेत सोन्याचा चोरटा व्यापार करणाऱ्या रॉकी या पात्राची मानसिकताच समुद्राच्या पार्श्वभूमीवर व्यक्त होताना दिसते.

रॉकी बोटीवरील माल (चोरटे सोने) घेऊन येण्यात अयशस्वी झाला आहे. नॉर्मा ही त्याची पत्नी आहे. ती त्याच्या अशा रिकाम्या येण्याने अस्वस्थ आहे. आपण 'एम्प्टी' आलो, म्हणून नॉर्मा आपल्याशी तुसडेपणाने वागत आहे या जाणिवेने रॉकी दुखावला आहे. त्याची ही अस्वस्थता व्यक्त करताना त्याच्या घरासमोरील समुद्र मात्र शांत आहे.

-खिडकीकडे जाऊन छातीवर ओलसर थंड वारे घेऊ लागला. पूर्ण चंद्रबिंबाने दर्याच्या लहरींना अभय दिले होते. त्या स्वच्छंदात फेसाळत, उधळत होत्या, गाजत होत्या. आकाश आपल्या मखमली निळ्या रंगात दंग होते.

('शून्य' (*कांचन*), पृ.१५७)

शांत, धुंद वातावरणाच्या पार्श्वभूमीवर रॉकीची अस्वस्थता विरोधलयीने अधिक तीव्र होते. रॉकी बोटीवरून हाती काही न घेता आला असला तरी तो संशयित गुन्हेगार आहे. अस्थिर पार्श्वभूमी सोडून विसाव्यासाठी, विश्रांतीसाठी आणि सुरक्षिततेसाठी तो घरी आला आहे. पण तो रिकाम्या हाताने आल्यामुळे घरीही त्याला 'घरपणा'चे सुख नॉर्मा देत नाही. घराकडून समुद्राकडे पाहताना समुद्र शांत दिसतो. समुद्र शांत दिसला, तरीही त्याच्या पोटात अनेक वादळं दडलेली असतात. अशा वरकरणी शांत दिसणाऱ्या समुद्राकडे पाहताना रॉकीच्या मनात एकटेपणाचे दु:ख तुफानासारखे दाटलेले आहे. त्याची पत्नी त्याचे हे दु:ख समजून घेत नाही आणि दुसरीकडे निसर्ग हा अलिप्त आहे. पत्नीचा असमंजसपणा आणि निसर्गाचे दूरत्व या दोन पातळ्यांवर त्याच्या

एकटेपणाची, असुरक्षिततेची जाणीव तीव्रपणे अधोरेखित होताना दिसते. घर, बोट, समुद्र या सर्वच स्थलांच्या पार्श्वभूमीवर अशा विरोधी वातावरणातून आपण 'शून्य' होऊन राहिल्याची रॉकीची जाणीव स्पष्ट होऊ लागते.

'ओ पास्कल' (*सूर्य*) या कथेतील ओ पास्कल हा अधिकारी हुशार आहे, पण बेफिकीर आहे, तो ड्यूटीवर असताना झोपतो, दारू पितो. असे वागताना तो त्याच्या परिणामांची पर्वा करीत नाही. म्हणूनच तो झोपलेला असताना त्याचा साहेब तसा शेरा डायरीत मारून गेला हे कळल्यावरही तो निर्धास्त (बेफिकीर) राहतो. त्याची या प्रकारची मानसिकता त्याच्या सभोवतीच्या समुद्रावरच्या विशिष्ट वातावरणामुळे विशेषपणे सूचित होत राहते. उदाहरणार्थ,

...तो खुर्चीत बसला. थंडपणं चौकीबाहेर पाहिलं. कालवलेला अंधार चिखलासारखा गारेगार. लांबून एखादंच लाल दिव्याचं फूल डोळा मारीत होतं!...

अंधार फुटायला लागला, लाटा परत फिरू लागल्या.

('ओ पास्कल', (*सूर्य*), पृ.१३८)

वर उल्लेखिलेल्या सर्व कस्टमविषयक कथांमधील घटना रात्र-मध्यरात्र या कालपरिमाणातच घडताना दिसतात. हे जग चोरट्या व्यापाराचे आहे. रात्रीच्या अंधाराचा व जगाच्या 'झोपलेपणा'चा फायदा घेऊनच हे व्यवसाय-धंदे केले जाणे स्वाभाविक आहे. रात्री सारे जग दिवसभराच्या थकव्यानंतर गाढ निद्रेच्या अधीन झालेले असते, तेव्हा तस्करांच्या हालचाली सुरू होतात. स्वाभाविकच त्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवणारे कस्टम अधिकारीही रात्री अधिक सतर्क व कृतिशील असताना दिसतात.

आतापर्यंत आपण श्री.दा.पानवलकर यांच्या कथांमध्ये कथागत परिसराच्या आश्रयाने पात्रांची मानसिकता कशी साकार होते ते पाहिले. पानवलकर पूर्वसूरींपेक्षा व समकालीन लेखकांपेक्षा पूर्णपणे वेगळ्या अनुभवविश्वाकडे वळलेले दिसतात.

श्री.दा.पानवलकर यांच्या कथाविश्वाकडे पाहिले असता सर्वप्रथम जो विशेष जाणवतो, तो म्हणजे या कथाविश्वातील विषयवैविध्य. कस्टमविषयक कथा हे तर श्री.दा.पानवलकर यांनी मराठी कथाविश्वाला दिलेले अनमोल योगदान आहे. कस्टम खात्यातील अनुभव हे मराठी कथेला अपरिचित असणारे अनुभवाचे दालन पानवलकर यांच्या या सोळा कथांद्वारे खुले झाले.

या अनुभवविश्वाचे वेगवेगळे कंगोरे उलगडून दाखवताना मानवी मनोविश्वाचे पदरही उलगडण्याचे आपले कसब पानवलकर यांनी दाखवून दिले.

या कथांचा आणखी एक विशेष म्हणजे पानवलकर यांची सकारात्मक दृष्टी होय. या कथांमधील गैरवर्तन करणारे तस्कर असोत, वा आपले कर्तव्य चोखपणे बजावूनही अयशस्वी होणारे कस्टम अधिकारी असोत, या सर्व पात्रांच्या वर्तनामागील परिस्थितीचा विचारही कथाकार नोंदवतो. त्यामुळे एखादे पात्र सुष्ट वा दुष्ट ठरत नाही. तर त्या वर्तनामागची परिस्थिती समजल्यामुळे त्यांच्याविषयी सहानुभूतीची भावना जागवली जाते. पानवलकर पात्रांच्या रगेल, रांगड्या स्वभावाबरोबरच पात्रमनातील मायेचा ओलावा हळुवारपणे नोंदवतात. स्वाभाविकच या कथांमधील पात्रचित्रणाला विविध पैलू प्राप्त होतात.

मराठी कथेला अपरिचित असे पूर्णतः नवे अनुभवविश्व, वैविध्यपूर्ण पात्रचित्रण, स्तिमित करणारे घटना-प्रसंग व त्यांची चित्रदर्शी शैलीतील वर्णने, उपमा आणि प्रतिमांनी युक्त अशी दमदार भाषाशैली आणि पोषक वातावरणनिर्मिती या वैशिष्ट्यांमुळे आधुनिक मराठी कथापरंपरेत श्री.दा.पानवलकर यांच्या कस्टमविषयक कथांना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे, असे निःसंशयपणे म्हणता येते.

**संदर्भ**


१. पानवलकर, श्री.दा. (१९६३) : *गजगा*, बा.ल.पाठक प्रकाशन, मुंबई.

२. पानवलकर, श्री.दा. (१९६३) : *औदुंबर*, मौज प्रकाशन गृह, मुंबई.

३. पानवलकर, श्री.दा. (१९६८) : *सूर्य*, मौज प्रकाशन गृह, मुंबई.

४. पानवलकर, श्री.दा. (१९७५ ): *एका नृत्याचा जन्म*, मौज प्रकाशन गृह, मुंबई.

५. पानवलकर, श्री.दा. (१९७८) : *चिनाब*, विश्वमोहिनी, पुणे.

६. पानवलकर, श्री.दा. (१९८१) : *जांभूळ*, मौज प्रकाशन गृह, मुंबई .

७. पानवलकर, श्री.दा. (१९९८) : *कांचन*, मौज प्रकाशन गृह, मुंबई.

संशोधन

# अंतर, पृष्ठभाग आणि कोव्हीड-१९: एक भौगोलिक दृष्टिकोण

**दीपेश करमरकर**

साहाय्यक प्राध्यापक
भूगोल विभाग
श्रीमती चांदीबाई हिम्मथमल मनसुखानी महाविद्यालय, उल्हासनगर
dipeshgeography@gmail.com

संभाषित

**विषय-प्रवेश**

गेल्या तीस वर्षांपासून आपल्याला सार्वजनिक आरोग्यासाठी धोका ठरणाऱ्या कारणांची माहिती आणि जाणीव आहे. गेल्या काही दशकांमध्ये जगभरात अनेक नवीन रोगजनक जिवाणू आणि विषाणूंचा प्रादुर्भाव पाहण्यात आला आहे आणि त्यामुळे प्रभावित झालेल्या तसेच मृत्युमुखी पडलेल्या लोकांची संख्यादेखील खूप जास्त आहे. अशा उदयोन्मुख रोगजनकांच्या आणि आजारांच्या उदाहरणांमध्ये एचआयव्ही/एड्स, इबोला, वेस्ट नाईल विषाणू आणि गंभीर तीव्र श्वसन सिंड्रोम (सार्स) आणि श्वसन सिंड्रोम (मर्स) यांचा समावेश होतो. हवामान आणि संसर्गजन्य रोगांची गतिशीलता आणि जटिलता यामुळे अशा आजारांचा अभ्यास अधिक कठीण आणि आव्हानात्मक ठरतो. संसर्गजन्य आजारांचा उद्भव हा एका विशिष्ट पर्यावरणीय चौकटीत होत असतो. त्यामुळे पर्यावरणातील बदल, त्यातील मानवाची आणि प्राण्यांची वर्तणूक, आणि यावर प्रभाव पाडणाऱ्या अर्थव्यवस्था, राजकारण, लोकसंख्या यांसारख्या सर्व घटकांचा अभ्यास महत्त्वाचा असतो. जागतिक हवामान बदलदेखील एक प्रमुख घटक आहे. वाढणाऱ्या तापमानामुळे जिवाणू आणि विषाणूंच्या पुनरुत्पादनाचा वेग वाढतो आणि त्यामुळे पसरणाऱ्या आजारांचा धोकाही बळावतो. बरेचदा स्थिर आणि गुंतागुंतीच्या परिसंस्थांमध्ये झालेल्या अगदी लहानशा बदलामुळेदेखील विविध आजार उद्भवू शकतात. उदाहरणार्थ, अमेरिकेत लाइम रोगाचा उदय हा जंगलतोड आणि जंगलतोडीचा परिणाम होता. या जंगलतोडीमुळे हरीण आणि पांढऱ्या पायाच्या उंदरांचे अधिवास बदलले आणि त्यात शहरी आणि उपनगरी विस्तारास अनुकूल अशा वाहतूक व्यवस्थेची भर पडून समस्या अधिकच गंभीर बनली (मेयर व लेव्हीस २०२०). तसेच आफ्रिकेतील इबोला उद्रेक आणि २००२ मधील सार्सची उत्पत्ती यांचा संबंध वटवाघळांच्या प्रजाती आणि मानवी संपर्क यांच्याशी असल्याचे अनुमान आहे (मेयर व लेव्हीस २०२०). सार्स-कोव्ह-२ (ज्यामुळे कोव्हीड-१९ आजार उद्भवतो) या विषाणूचा उदय आणि प्रसार हेदेखील याच साखळीतील उदाहरण आहे.

चीन सरकारच्या ३१ डिसेंबर २०१९ च्या अधिकृत अहवालानुसार, सार्स-कोव्ह-२ चा प्रादुर्भाव चीनच्या हुबेई प्रांतातील वुहान या शहरात झाला. या विषाणूच्या उद्रेकाचे अचूक निदान झाले नसले तरी त्याचा संबंध वटवाघळांच्या 'जिवंत' बाजारपेठेशी आहे, असे अधिकृत अहवाल सांगतो. पूर्वीदेखील अशा जिवाणूंचा संबंध प्राण्यांच्या आणि संबंधित खाद्यपदार्थांच्या

संशोधन

विक्रीशी जोडला गेला आहे (मेयर व लेव्हीस २०२०). सार्स-कोव्ह-२ विषाणूच्या जनुकीयदृष्ट्या जवळ असलेले कोरोना जिवाणू वटवाघळांमध्ये आढळतात. या आनुवंशिक समानतेमुळे प्रजातींमध्ये विषाणूंचा संसर्ग झाल्याचे अनुमान काढता येतो. बरेचदा असे प्राणी लांब अंतरावरून किरकोळ बाजारामध्ये आणले जातात, विविध प्रजातींमध्ये आपसात विषाणूंचा संसर्ग होतो, आणि मग बाजारपेठांमध्ये संसर्गित प्राणी आणि संबंधित खाद्यपदार्थ मानवी संपर्कात येतात. एकदा मानवी लोकसंख्येमध्ये या विषाणूंचा प्रवेश झाला की श्वसनमार्गातील थेंबांवाटे ते इतर लोकांपर्यंत पसरतात. दाट, प्रवाही आणि कमकुवत रोगप्रतिकारशक्ती असणाऱ्या लोकसंख्येमध्ये हे विषाणू फारच लवकर पसरतात.

**कोव्हीड-१९ आणि भूगोल**

संसर्गजन्य रोगांचा उद्भव आणि प्रसार हा ‘आरोग्य-भूगोल’ तसेच ‘वैद्यकीय-भूगोल’ या मानवी भूगोलाच्या उपशाखांचा एक महत्त्वाचा विषय आहे. यामध्ये विविध आजारांचा परिसंस्था, प्रादेशिक पर्यावरण, हवामान आणि बदलणारे ऋतू यांच्याशी असलेला संबंध अभ्यासला जातो. रोगांच्या प्रसारास कारणीभूत असलेले घटक, प्रसार-मार्ग आणि त्यांचे आकृतिबंध, तसेच बाधित प्रदेशांचे आकृतिबंध याचाही अभ्यास या उपशाखेत होतो. हा अभ्यास करताना विविध अभिक्षेत्रीय (spatial) स्तरांचा विचार अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण अगदी स्थानिक पातळीवर, म्हणजे शहरातील एका उपनगरात अथवा एखाद्या झोपडपट्टीत, निरनिराळे घटक कार्यरत असतात. त्यामुळे राष्ट्रीय अथवा राज्य पातळीवरील अभ्यास पुरेसा पडत नाही. या अनुषंगाने, कोव्हीड-१९ या विषयावर गेल्या काही महिन्यात बरेच संशोधन झाले आहे.

गुप्ता व इतर (२०२०) यांनी केलेल्या भारतातील माहितीवर आधारित केलेल्या सांख्यिकीय विश्लेषणात असे दिसते की कोव्हीड-१९ प्रसारामध्ये हवामानाचा खूप मोठा प्रभाव आहे. परंतु हा प्रभाव प्रादेशिकरीत्या विषम आहे, आणि त्याची कारणे अभिक्षेत्रीय आहेत. सौर किरणे आणि तापमान यांतील धन सहसंबंध तसेच आर्द्रता आणि पाऊस यांमधील ऋण सहसंबंध यावरून त्यांनी असे स्पष्ट केले आहे की उष्ण व कोरड्या हवामान प्रदेशांतील कमी उंचीवरील प्रदेशात या आजाराचा प्रसार अधिक होतो. भौगोलिक स्थान, स्थानिक हवामान, लोकसंख्या असे घटक एकत्रित भूमिका बजावतात. या

काळात विविध देशांत पाळल्या गेलेल्या टाळेबंदीचा पर्यावरणावर पडलेला प्रभावही अनेकांनी अभ्यासला (झम्ब्रनो-मोन्सरेत व इतर २०२०; गुप्ता व इतर २०२०, रघुवंशी व इतर २०२०; शर्मा व इतर २०२०; मोहिते व सरोदे २०२०). या संशोधनांमध्ये टाळेबंदीच्या हवामान, हवा प्रदूषण, आणि एकूणच पर्यावरणावर पडलेल्या काहीशा सकारात्मक प्रभावाची चर्चा केली गेली आहे. चक्रबर्ती व मैती (२०२०) यांनी या परिस्थितीचा स्थलांतर, समाज आणि पर्यावरणावर झालेला परिणाम अभ्यासला आहे.

मेयर व लेव्हीस (२०२०) यांनी जागतिक पातळीवरील कोव्हीड-१९ बाधित प्रदेशांच्या आकृतिबंधांचा अभ्यास केला आहे. युरोपियन आणि आशियाई देशांचा विशेष अभ्यास करताना त्यांनी भारताबाबत काही निरीक्षणे नोंदविली आहेत. यामध्ये मुंबई, दिल्ली, पुणे यासारख्या मोठ्या शहरांतील लोकसंख्येची अतिघनता, तसेच विविध झोपडपट्ट्यांमधील दाटीवाटीने राहणारे लोक, दारिद्र्य, मूलभूत सुविधांचा अभाव, आणि त्यामुळे धोक्यात आलेली सार्वजनिक स्वच्छता यांमध्ये कोव्हीड-१९ प्रसाराची कारणे शोधली आहेत. मुरुगेसन व इतर (२०२०) यांनी केलेल्या अभ्यासात भौगोलिक माहिती प्रणालीच्या मदतीने अभिक्षेत्रीय आकृतिबंधांचा अभ्यास केला आहे. यामध्ये पश्चिम-मध्य भारतातील किनाऱ्यालगतचे प्रदेश, तसेच पूर्व किनाऱ्यालगतचे प्रदेश आणि देशातील प्रमुख मोठी शहरे ही कोव्हीड-१९ची केंद्रे असल्याचे लक्षात येते. घोष व इतर (२०२०) यांच्या कामात भारतातील विविध राज्यांमधील कोव्हीड-१९च्या असुरक्षिततेचा अभ्यास केला आहे. यांत इस्पितळे आणि बेड्सचे प्रमाण, कोव्हीड-१९ चाचण्यांचे प्रमाण, उपलब्ध प्रयोगशाळा आणि सर्वसामान्यांना या सुविधा प्राप्त होण्यामधील सुलभता, आणि झोपडपट्ट्यांमधील लोकसंख्या या घटकांच्या संदर्भाने आंतर-राज्य विषमता दर्शविली आहे. कोव्हीड-१९बाबत अत्याधुनिक संशोधन करून ज्ञाननिर्मिती करणाऱ्या प्रदेशांकडे ही परिस्थिती सुधारण्याचे नियंत्रण असेल. मात्र सर्वच देश संशोधन आणि ज्ञाननिर्मितीच्या एकाच पातळीवर नाहीत. या विषमतेमुळे निर्माण होऊ पाहणारा ज्ञाननिर्मितीचा विषम आणि वेगाने बदलणारा भूगोल यावरील मेंडेस व कार्व्हालो (२०२०) यांचे काम मोलाचे आहे. कोव्हीड-१९चे व्हॅक्सिन संशोधन आणि उत्पादन याबाबत देशादेशांत सुरू असलेली स्पर्धा, आणि या स्पर्धेत जिंकणाऱ्या विशिष्ट देशांना तसेच औषध निर्माण क्षेत्रातील विशिष्ट महाउद्योगांना त्याचा होणारा लाभ यातून या विषम भूगोलाचे फलित काय असेल, त्याची कल्पना करता येऊ शकते.

### उद्दिष्टे आणि कार्यपद्धती

सध्या तरी कोव्हीड-१९चा प्रभाव रोखण्यासाठी, शारीरिक अंतर राखणे आणि वेळोवेळी साबणाने हात स्वच्छ धुणे, हेच दोन प्रतिबंधात्मक उपाय उपलब्ध आहेत (डब्ल्यूएचओ २०२०). या दोन्ही उपायांमध्ये आणि कोव्हीड-१९च्या प्रसारामध्ये अंतर आणि पृष्ठभाग या दोन घटकांची महत्त्वाची भूमिका आहे. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये याच दोन घटकांची भूमिका जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे. यासाठी आवश्यक असणारी दुय्यम माहिती महाजालावरील उपलब्ध संशोधनाद्वारे आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावरून मिळविण्यात आली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक ३० नोव्हेंबर २०२० रोजी प्रसृत केलेली कोव्हीड-१९ संबंधित माहिती वापरण्यात आली आहे. तसेच वरील दोन घटकांसंदर्भात जनमानसातील जागरूकतेची वास्तविक पातळी काय आहे, हे समजून घेण्यासाठी गुगल फॉर्म सर्वेक्षण माध्यमातून प्राथमिक माहिती गोळा केली आहे. यासाठी मुंबई महानगर क्षेत्रात राहणाऱ्या अठरा वर्षांपुढील ८० व्यक्तींचा प्रतिसाद नोंदवण्यात आला आहे. या दुय्यम आणि प्राथमिक माहितीच्या विश्लेषणाच्या आधारे, अंतर आणि पृष्ठभाग यांची कोव्हीड-१९ प्रसारातील भूमिका अभ्यासली आहे.

### अंतर आणि कोव्हीड-१९

अंतर हा एक महत्त्वाचा भौगोलिक घटक आहे. अंतर म्हणजे ‘अलगतेचे प्रमाण’ होय. भूगोल विषय अंतर या घटकाकडे प्राकृतिक अंतर, कालांतर, मुद्रांतर, मानसिक अंतर, सामाजिक अंतर अशा विविध दृष्टिकोणातून पाहतो. कोव्हीड-१९च्या दृष्टीने व्यक्तींमधील अंतराची भूमिका महत्त्वाची आहे. हा आजार प्रामुख्याने वारंवार संपर्कात येणाऱ्या लोकांमध्ये पसरतो. संसर्गित व्यक्तीच्या श्वसनमार्गातून बाहेर टाकले गेलेले लहान आकाराचे थेंब आणि कण त्याच्या तोंडावाटे किंवा नाकावाटे हवेत पसरतात. थेंबांमधील विषाणू हवेत काही मिनिटे ते काही तास रेंगाळत राहतात. हवेतील या थेंबांच्या आणि कणांच्या संपर्कात आलेली व्यक्ती संसर्गित होऊ शकते (सिडीसी २०२० आ). जसे हे थेंब अधिक अंतरावर हवेत पसरत जातात, तसे थेंबांचे केंद्रीकरण कमी होत जाते. जसे कालांतर वाढत जाते, तसे त्या थेंबांतील संसर्गित विषाणूंची संख्याही कमी होत जाते (सिडीसी २०२० आ).

म्हणूनच जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये, परस्परांमध्ये किमान १ मीटर (३.३ फूट) अंतर राखणे आवश्यक असल्याचे सांगितले आहे (डब्ल्यूएचओ २०२०). अमेरिकेतील सेंटर्स फॉर डिसीज कंट्रोल अँड प्रिव्हेन्शन या संस्थेतील उपलब्ध आकडेवारीनुसार, कोव्हीड-१९चा प्रसार हवेद्वारे होणाऱ्या संसर्गापेक्षा, संक्रमित व्यक्तीच्या जवळ गेल्याने अधिक होतो. त्यामुळेच या संस्थेने परस्परांमध्ये किमान ६ फूट अंतर आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले आहे (सिडीसी २०२० अ). किमान अंतरांची निश्चिती विविध घटकांवर अवलंबून असते. उदाहरणार्थ, मर्यादित वायुविजन असणाऱ्या बंद जागांमध्ये कोव्हीड-१९चे विषाणू, संक्रमित झालेल्या व्यक्तीपासून ६ फूट जास्त अंतरावर असलेल्या, लोकांमध्येदेखील संक्रमित होऊ शकतात असे आढळून आले आहे (सिडीसी २०२० इ). म्हणून बंद आणि मर्यादित वायूविजन असणाऱ्या जागा, गर्दीची ठिकाणे, आणि इतरांशी जवळ संपर्क येऊ शकेल अशा जागांमध्ये वावरताना अत्यंत काळजी घेणे आवश्यक आहे.

कोणताही एक विशिष्ट घटक स्वतंत्रपणे कोव्हीड-१९चे संक्रमण नियंत्रित करीत नाही, संक्रमण अनेक घटकांद्वारा नियंत्रित होते. अंतर या घटकाबाबतही असेच म्हणता येईल. व्यक्तींमधील अंतरे कमी असण्याचे प्रमाण लोकसंख्येची अधिक घनता असणाऱ्या प्रदेशांमध्ये जास्त असते. यामुळेच, मुंबईसारखी, लोकसंख्येची अतिघनता असलेली, शहरे कोव्हीड-१९च्या संक्रमणाचे केंद्रबिंदू ठरली. २०११च्या भारतीय जनगणनेनुसार, मुंबई शहराची एकूण लोकसंख्या ३०,८५,४११ इतकी असून घनता १९,६५२ प्रतिचौरस किलोमीटर आहे. तर मुंबई उपनगरांची लोकसंख्या ९३,५६,९६२ इतकी असून घनता २०,९८० प्रतिचौरस किलोमीटर आहे. उपनगरांमधील लोकसंख्येच्या अतिघनतेमुळे, बृहन्मुंबईतील एकूण रुग्णांपैकी, ७०.९% रुग्ण मुंबई उपनगरांत आढळतात (एमसीजीएम २०२०). मुंबई शहरातील रुग्णांची टक्केवारी २९.१% इतकी आहे (एमसीजीएम २०२०). परंतु वॉर्ड पातळीवर लोकसंख्येच्या घनतेचा आणि बाधितांच्या संख्येचा (तक्ता १) संबंध तपासण्यासाठी कार्ल पिअर्सनच्या अनुक्रम सहसंबंध पद्धतीचा उपयोग केला.

**तक्ता १ :**

बृहन्मुंबई: वॉर्डनुसार एकूण कोव्हीड-१९ बाधितांची संख्या आणि लोकसंख्येची घनता (२०११)

| वॉर्ड | कोव्हीड-१९ बाधित लोकसंख्या | लोकसंख्येची घनता (प्रतिचौरस किमी) |
|---|---|---|
| A | ६५९९ | १६२२९ |
| B | २०६३ | ५०९१६ |
| C | ३७८३ | ९२३१२ |
| D | १२७५८ | ५२५५५ |
| E | ९२९५ | ५३१४७ |
| F/S | १०३४७ | ४१९८१ |
| F/N | १०४०१ | |
| G/S | ९८६७ | ५४५६९ |
| G/N | १३४०४ | |
| H/E | ८९५९ | ४०९८७ |
| H/W | ९५४२ | |
| K/E | १६१६३ | ३३१०७ |
| K/W | १७८४३ | |
| P/S | १०७०४ | २१८४९ |
| P/N | १६६६१ | |
| R/S | १६३४९ | २१७११ |
| R/N | ८५३४ | |
| R/C | १९५९० | |
| L | १०२९४ | ६६८३१ |
| M/E | ८५०१ | २२२१५ |
| M/W | ८०९३ | |
| N | १३४५५ | ११२४३ |
| S | १३४०९ | ११६२२ |
| T | १३१९४ | ९८१२ |

(माहिती स्रोत: भारताची जनगणना, २०११; एमसीजीएम, २०२०)

कार्ल पिअर्सनच्या अनुक्रम सहसंबंध विश्लेषणानुसार, वॉर्ड पातळीवरील लोकसंख्येची घनता आणि बाधितांची संख्या यांत ऋण सहसंबंध ($r = -०.३३९६$) प्रस्थापित झाला. या क्षीण सहसंबंधामुळे असे लक्षात येते की वॉर्डमधील बाधितांची संख्या स्थानिक पातळीवरील अनेक घटक नियंत्रित करतात, आणि लोकसंख्येची घनता हा एकमेव नियंत्रक नाही.

संभाषित

३० नोव्हेंबर २०२० रोजीच्या आकडेवारीनुसार, बृहन्मुंबईतील एकूण बाधितांची संख्या २,८२,८१४ आहे. यातील १०,७९१ व्यक्ती मृत असून २,५५,८६० व्यक्ती बऱ्या होऊन घरी परतल्या आहेत. एकूण सक्रिय रुग्णांची संख्या १३,१५७ इतकी आहे (एमसीजीएम २०२०). तक्ता २ मधील माहिती बृहन्मुंबईमधील एकूण कोव्हीड-१९ बाधितांचे वॉर्ड स्तरावरील विषम भौगोलिक आकृतिबंध दर्शवितात.

**तक्ता २:**

बृहन्मुंबई: कोव्हीड-१९ बाधितांचे भौगोलिक आकृतिबंध
(३० नोव्हेंबर २०२०)

| **एकूण कोव्हीड-१९ बाधितांची संख्या** | **बृहन्मुंबईतील वॉर्ड** | **वॉर्डमधील प्रमुख ठिकाणाचे नाव** |
|---|---|---|
| सर्वाधिक कोव्हीड-१९ बाधित संख्या असलेले भाग (१५००१ पेक्षा जास्त) | R/C, K/W, P/N, R/S, K/E | बोरीवली, अंधेरी (प.), जोगेश्वरी (प.), विलेपार्ले (प.) |
| अधिक कोव्हीड-१९ बाधित संख्या असलेले भाग (१२००१ ते १५०००) | N, S, G/N, T, D | घाटकोपर, विद्याविहार, भांडूप, पवई, कांजुरमार्ग, विक्रोळी, धारावी, माहीम, दादर, मुलुंड, ग्रांटरोड, वाळकेश्वर, मलबार हिल, हाजी आली |
| मध्यम कोव्हीड-१९ बाधित संख्या असलेले भाग (९००१ ते १२०००) | P/S, F/N, F/S, L, G/S, H/W, E | गोरेगाव, माटुंगा, सायन, वडाळा, परळ, साकीनाका, असल्फा, कुर्ला, वरळी, प्रभादेवी, बांद्रा (प.), खार (प.), सांताक्रूझ (प.), भायखळा, आग्रीपाडा, डॉकयार्ड रोड, रे रोड, चिंचपोकळी |
| कमी कोव्हीड-१९ बाधित संख्या असलेले भाग (० ते ९०००) | H/E, R/N, M/E, M/W, A, C, B | बांद्रा (पू.), खार (पू.), सांताक्रूझ (पू.), दहिसर, मानखुर्द, देवनार, शिवाजीनगर, चेंबूर, टिळकनगर, चर्चगेट, कुलाबा, पायधुनी, भुलेश्वर, मस्जिद बंदर, डोंगरी, भेंडी बझार |

(माहिती स्रोत: एमसीजीएम, २०२०)

वरील माहितीनुसार, वायव्य मुंबईतील बोरीवली, अंधेरी (प.), जोगेश्वरी (प.), विलेपार्ले (प.) या वॉर्ड्‌समध्ये कोव्हीड-१९ बाधित व्यक्तींचे सर्वाधिक (३२.१%) केंद्रीकरण झालेले दिसते. गोरेगाव आणि बोरीवली भागांत नवीन रुग्णवाढीचा वेग इतर वॉर्ड्‌सपेक्षा (अनुक्रमे ०.५०.% आणि ०.४३%) अधिक आहे (एमसीजीएम २०२०). तसेच बोरीवली, कांदिवली, अंधेरी (प.), जोगेश्वरी (प.), विलेपार्ले (प.) या भागात सीलबंद करण्यात आलेल्या इमारतींची संख्यादेखील जास्त आहे. मात्र शहरातील वायव्य भागांमध्ये (धारावी, माहीम, दादर) तसेच पूर्व उपनगरांमध्ये (भांडूप, पवई, कांजुरमार्ग, विक्रोळी, घाटकोपर, विद्याविहार) झोपडपट्ट्या आणि चाळींमधील प्रतिबंधित क्षेत्रांचे प्रमाण इतर भागांच्या तुलनेत अधिक आहे. पश्चिम [बांद्रा (पू.), खार (पू.), सांताक्रूझ (पू.), दहिसर], आणि पूर्व उपनगरांतील (मानखुर्द, देवनार, शिवाजीनगर, चेंबूर, टिळकनगर) आणि शहरातील (चर्चगेट, कुलाबा, पायधुनी, भुलेश्वर, मस्जिद बंदर, डोंगरी, भेंडीबाजार) काही भागांत रुग्णसंख्या तुलनेनं कमी आहे. हे विषम आकृतिबंध अनेकविध घटकांचे नियंत्रण दर्शवितात.

**पृष्ठभाग आणि कोव्हीड-१९**

अंतराबरोबरच पृष्ठभाग हादेखील कोव्हीड-१९ संक्रमणातील एक महत्त्वाचा घटक आहे. संसर्गित व्यक्तीच्या नाकावाटे आणि तोंडावाटे बाहेर पडलेले मोठ्या आकाराचे थेंब हवेत तरंगू शकत नाहीत आणि त्यामुळे ते आजूबाजूच्या पृष्ठभागांवर पडतात. सूर्यप्रकाश, आर्द्रता आणि पृष्ठभागाचा प्रकार यासारख्या घटकांनुसार कोव्हीड-१९चा विषाणू विविध पृष्ठभागांवर काही तास ते काही दिवस जगू शकतो (सिडीसी २०२० आ). एखाद्या व्यक्तीचा संसर्गित पृष्ठभागाशी संपर्क आल्यास विषाणू तोंड, नाक किंवा डोळे याद्वारा शरीरात प्रवेश करू शकतात आणि संक्रमणाचा धोका वाढवू शकतात. जागतिक आरोग्य संघटनेच्या म्हणण्यानुसार, पृष्ठभागांद्वारे होणारा संसर्ग अप्रत्यक्ष आणि काहीसा अधिक कालांतर असल्याने विशेष प्रभावी घटक नाही (डब्ल्यूएचओ २०२०). परंतु पृष्ठभागांद्वारे मर्यादित प्रमाणात होणारे संक्रमण रोखणेसुद्धा महत्त्वाचे आहे. भारद्वाज व अग्रवाल (२०२०) यांच्या नुकत्याच प्रकाशित झालेल्या शोधनिबंधात कोव्हीड-१९ चे विषाणू वेगवेगळ्या पृष्ठभागांवर किती काळ जिवंत राहू शकतात याबाबत विश्लेषण केले आहे. त्यानुसार, श्वसनमार्गावाटे बाहेर पडलेले थेंब काही सेकंदांत

कोरडे होतात. पण वेगवेगळया पृष्ठभागांवर पडलेल्या थेंबांतील जिवाणूंच्या जगण्याचा काळ काही तासांचा असू शकतो. पृष्ठभागांवर पडलेला थेंब जरी सुकला, तरी अत्यंत संथ बाष्पीभवनामुळे द्रवाचा अगदी काही नॅनोमीटरइतका सूक्ष्म थर शिल्लक राहतो आणि त्यामध्ये हा जिवाणू काही कालावधीसाठी जिवंत राहू शकतो (भारद्वाज व अग्रवाल २०२०). सूक्ष्म थरातील द्रवाचे आणि जिवाणूंचे प्रमाण, द्रवाचा बाष्पीभवनाचा वेग, पृष्ठभागाचे स्वरूप या घटकांवर हा कालावधी अवलंबून असतो. कोव्हीड-१९ चा जिवाणू प्लास्टिक आणि स्टेनलेस स्टील पृष्ठभागांवर अधिक काळ टिकतो तर तांबे धातूच्या पृष्ठभागांवर कमी काळ टिकतो (सुमन व इतर २०२०). तक्ता - ३ मध्ये, कोव्हीड-१९चा विषाणू कोणत्या प्रकारच्या पृष्ठभागांवर किती काळ जिवंत राहू शकतो याची माहिती दिलेली आहे.

**तक्ता ३:**

विविध पृष्ठभागांवर जिवाणूच्या जिवंत राहण्याचा कालावधी

| पृष्ठभागाचा प्रकार | कोव्हीड-१९चा जीवाणू जिवंत रहाण्याचा कालावधी |
|---|---|
| धातू | ५ दिवस |
| लाकूड | ४ दिवस |
| प्लास्टिक | २ ते ३ दिवस |
| स्टेनलेस स्टील | २ ते ३ दिवस |
| पुठ्ठा | ४ तास |
| तांबे धातू | ४ तास |
| ॲल्युमिनियम | २ ते ८ तास |
| काच | ५ दिवस |
| सिरॅमिक्स | ५ दिवस |
| कागद | काही मिनिटे ते ५ दिवस |
| मानवी त्वचा आणि केस | साधारण ९ तास |
| अन्न आणि पाणी | जिवाणू अन्न आणि पाण्यावाटे पसरत नाही |
| कापड आणि पादत्राणे | यावर विशेष संशोधन नाही |

(माहिती स्रोत: सुमन व इतर, २०२०; नझारिओ, २०२०)

विविध पृष्ठभागांवर जिवाणू अधिक काळ जगू शकत असल्याने मानवी संसर्गाचा धोकाही वाढतो. त्यामुळे घरामधील आणि कार्यालयांतील पृष्ठभाग- जसे टेबल्स, खुर्च्या, दरवाजांच्या मुठी आणि कड्या, न्हाणीघरातील आणि बेसिनवरील नळ, विजेची बटणे, दूरध्वनी संच, संगणकाचे कळफलक, इत्यादी - नियमित कालांतराने स्वच्छ करणे हा आवश्यक उपाय आहे. सेंटर्स फॉर डिसीज कंट्रोल अँड प्रिव्हेन्शन या संस्थेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार, अधिक दूषित झालेले पृष्ठभाग साबणाने किंवा डिटर्जंटने साफ करावे आणि मग त्यावर अल्कोहोल-मिश्रित जंतुनाशकाचा वापर करावा (सिडीसी २०२० अ). तसेच काही पृष्ठभाग कमी कालावधीसाठी गरम केले, तरी काही नॅनोमिटरच्या थराचे बाष्पीभवन होण्यास मदत होते आणि त्यायोगे जिवाणू नष्ट होऊ शकतो (भारद्वाज व अग्रवाल २०२०).

**अंतर आणि पृष्ठभाग याबाबत जनसामान्यांमधील जागरूकता:**

अंतर आणि पृष्ठभाग या घटकांची कोव्हीड-१९ संसर्गातील भूमिका इतकी महत्त्वाची असताना जनसामान्यांमध्ये याबाबत किती माहिती अथवा जागरूकता आहे आणि याबाबतीत लोकांची वर्तणूक कशी आहे, हे तपासून पाहण्यासाठी एक सर्वेक्षण करण्यात आले. सर्वेक्षणात एकूण ८० व्यक्तींनी सहभाग घेतला. यात ७५% स्त्रिया असून बहुतांश व्यक्ती (८८.९%) १८ ते ४० वर्षे वयोगटातील आहेत. ३७% प्रतिसादकांनी त्यांच्या जवळच्या कुटुंबातील सदस्य, नातेवाईक किंवा कार्यालयीन सहकारी यांपैकी कुणा एकाची कोव्हीड-१९ चाचणी सकारात्मक आल्याचे सांगितले आहे. एकूण नमुन्यांपैकी जवळजवळ ३०% व्यक्ती बाजारपेठेसारख्या अतिघनतेच्या भागांत नियमितपणे प्रवास करतात. यातील साधारण ३२% व्यक्ती नोकरी करणाऱ्या आहेत.

एकूण प्रतिसादकांपैकी बहुतांश व्यक्ती घराबाहेर प्रवास करताना मुखपट्टीचा वापर करतात आणि नियमितपणे साबणाने हात धुतात. परंतु, हे आश्चर्यकारक आहे की ५% व्यक्ती अजूनही मुखपट्टी परिधान करीत नाहीत, तर २.५% व्यक्ती नियमितपणे हात धुवत नाहीत. शासनाने वेळोवेळी प्रसारित केलेल्या सूचनांनुसार, साबणाने हात कमीत कमी २० सेकंद धुणे आवश्यक असताना, सर्वेक्षणातील केवळ २३% व्यक्ती हा नियम पाळतात. साधारण २०% व्यक्ती वेळेचे कुठलेही बंधन पाळत नाहीत, तर उर्वरित व्यक्ती २० सेकंदांपेक्षा कमी वेळेत हात धुतात. सुरक्षिततेचे नियम न पाळणाऱ्या या

व्यक्तींचे प्रमाण कमी दिसत असले, तरी अशा व्यक्तींमुळे कोव्हीड-१९च्या संसर्गाचा धोका निश्चितच मोठा आहे. त्यात, कोव्हीड-१९च्या प्रसाराच्या माध्यमाबाबतदेखील पुरेशी माहिती असल्याचे दिसत नाही. कोव्हीड-१९ चे जिवाणू हवेतून पसरतात का याचे उत्तर 'हो' , 'नाही', आणि 'कदाचित' या पर्यायांमध्ये सारखे विभागले आहे. म्हणजेच याबाबत दोन तृतीयांश व्यक्तींना अचूक माहिती नाही. कोव्हीड-१९चा जिवाणू पाण्याद्वारे पसरत नसला, तरी प्रतिसादकांपैकी सुमारे ४७% लोकांना त्याची माहिती नाही.

सर्वेक्षणात असे दिसून आले की ज्या व्यक्तींना टाळेबंदी शिथिल झालेल्या काळात सार्वजनिक वाहतुकीद्वारे नियमित प्रवास करण्याची आवश्यकता आहे, ते शारीरिक अंतराचे निकष पाळत नाहीत. कोव्हीड-१९च्या दुसऱ्या लाटेची शक्यता वर्तविली जात असताना एकूण प्रतिसादकांपैकी १८.३% व्यक्ती सार्वजनिक ठिकाणी शारीरिक अंतराचे निकष पाळत नसल्याचे समोर आले आहे. सार्वजनिक वाहतुकीमधील अफाट गर्दीमुळे इच्छा असूनही शारीरिक अंतरांचे निकष पाळता येत नाहीत, असे साधारण २९% व्यक्तींचे म्हणणे आहे. ६२.२% व्यक्तींचे असे मत आहे की सार्वजनिक ठिकाणी आजूबाजूला वावरणारे लोक अंतराचे कुठलेही निकष पाळताना दिसत नाहीत. ८९% व्यक्ती मुखपट्टी न वापरणाऱ्या माणसांपासून शारीरिक अंतर राखायचा प्रयत्न करतात. जरी ६३% व्यक्ती शारीरिक अंतर राखण्याबाबत जागरूक असल्याचे सांगतात, तरी सर्वेक्षणातील आकडेवारीवरून असे दिसते की त्यांच्यापैकी बरेच जण शारीरिक अंतराचे निकष तंतोतंत पाळत नाहीत. केवळ २४.७% व्यक्ती स्वत: आणि बिगर-कुटुंबातील सदस्यांमध्ये ६ फूट अंतर राखतात. सुमारे ५७% प्रतिसादक ३ फूट अंतर राखतात. १९% व्यक्ती कोव्हीड-१९ संसर्गाचा धोका पत्करतात कारण ते स्वत: आणि बिगर-कुटुंबातील सदस्यांमध्ये जेमतेम १ फूट अंतर ठेवतात. २४.७% व्यक्ती आजारी असलेल्या माणसांपासूनही सुरक्षित अंतर राखत नाहीत. प्रत्येक वेळी प्रत्यक्ष अंतर मोजले जात नाही किंवा घड्याळ पाहिले जात नाही. प्रत्यक्ष मोजमाप न करता प्राकृतिक अंतर समजण्याची प्रत्येक व्यक्तीची वस्तुनिष्ठ समज भिन्न असते. म्हणून प्रतिसादकांना विचारले गेले की ते या किमान अंतरांचे (६ फूट) मोजमाप कोणत्या पद्धतीने करतात. त्यापैकी जवळजवळ ५५% प्रतिसादक अंदाजे अंतर मोजतात, तर अंतराची कल्पना येण्यासाठी १५% व्यक्ती हाताच्या लांबीचा उपयोग करतात.

सुमारे ६१% व्यक्तींना कोव्हीड-१९ चा जिवाणू पृष्ठभागांवर जिवंत राहू शकतो हे माहिती आहे. परंतु विविध पृष्ठभागांवर हा जिवाणू किती काळ जिवंत राहू शकतो, या प्रश्नाचे ठोस उत्तर मात्र प्रतिसादकांकडे नाही. तक्ता ४ मध्ये या प्रश्नाच्या उत्तरांचा एक गोषवारा देण्यात आला आहे.

**तक्ता ४**

पृष्ठभागांसंदर्भात माहिती आणि जागरूकतेचा स्तर

| **पृष्ठभागाचा प्रकार** | **काही माहिती नसणारे (%)** | **अपुरी किंवा चुकीची माहिती असणारे (%)** | **अचूक माहिती असणारे (%)** |
|---|---|---|---|
| काच | १३.७५ | ४६.२५ | ४० |
| ॲल्युमिनियम | ५० | १७ | ३३ |
| प्लास्टिक | ३३.७५ | ३६.२५ | ३० |
| पाणी | ४३.७५ | ३० | २६.२५ |
| स्टेनलेस स्टील | ३७.५ | ३८.७५ | २३.७५ |
| तांबे धातू | ५५ | २१.२५ | २३.७५ |
| पुठ्ठा | ४८.७५ | ३० | २१.२५ |
| धातू | ३५ | ५० | १५ |
| अन्न | ४३.७५ | ४२.५ | १३.७५ |
| लाकूड | ४३.७५ | ४६.२५ | १० |
| कागद | ३७.५ | ५२.५ | १० |
| सिरॅमिक्स | ५७.५ | ३३.७५ | ८.७५ |
| पादत्राणे | ४० | ५२.५ | ७.५ |
| कापड | ४५ | ५० | ५ |

(माहिती स्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)

वरील तक्त्यावरून असे लक्षात येते की पृष्ठभागांद्वारे होणाऱ्या संसर्गाबाबत बरेचसे लोक अनभिज्ञ आहेत. एकतर त्यांना याबाबत काहीच माहिती नाही किंवा अपुरी आणि चुकीची माहिती आहे. दैनंदिन गरजेच्या वस्तू खरेदी करण्यासाठी किंवा नोकरी-धंद्यासाठी प्रत्येक व्यक्ती घराबाहेर पडत असते. म्हणूनच, सर्वांचा विविध पृष्ठभागांशी संपर्क येत असतो, आणि

त्या अन्वये घरातील पृष्ठभागदेखील संसर्गित होण्याचा धोका संभवतो. याबाबत योग्य माहिती असल्यास, साबण, डिटर्जंट्स आणि अल्कोहोल-मिश्रित जंतुनाशकांनी नियमितपणे पृष्ठभाग स्वच्छ करण्याबद्दल लोक जागरूक राहतील. ही माहिती आणि जागरूकता नसल्यामुळेच सुमारे ४१% व्यक्ती त्यांच्या घरांमधील तसेच कार्यालयातील पृष्ठभागांची साफसफाई नियमितपणे करत नाहीत. मार्गदर्शक सूचनांनुसार, पृष्ठभाग कमीत कमी एक मिनिट स्वच्छ करणे आवश्यक आहे, परंतु याबाबत केवळ १८.३% व्यक्तींनाच माहिती असल्याचे दिसते.

**निष्कर्ष**

गेल्या ११ महिन्यांपासून कोव्हीड-१९ चे संकट अबाधित आहे. टाळेबंदीमुळे निर्माण झालेले आर्थिक प्रश्न - देश स्तरावरील असोत अथवा व्यक्तिस्तरावरील - अत्यंत गंभीर आहेत. त्यामुळे लोकांमध्ये अस्वस्थता आणि अनिश्चितता आहे. बराच काळ न सुधारलेल्या परिस्थितीमुळे लोकांमध्ये हतबलतेची भावना आहे. कदाचित म्हणूनच सर्वेक्षणातील जवळपास ५५% व्यक्तींनी कडक टाळेबंदीच्या काळात सुरक्षिततेचे नियम जसे पाळले जात होते, तसे आता टाळेबंदी शिथिलीकरणाच्या काळात पाळले जात नाहीत, याची कबुली दिली आहे. सुमारे ६६% व्यक्तींना या शारीरिक अंतराच्या नियमांमुळे नातेसंबंध दुरावत चालल्याचे आणि सामाजिक अंतरे वाढत चालल्याचे वाटत आहे. तर बहुतांश व्यक्तींनी मुखपट्टी न वापरणाऱ्या व्यक्तींमुळे सतत भीतीची भावना असल्याचे सांगितले आहे. एकीकडे आर्थिक स्थिती सांभाळण्यासाठी घराबाहेर पडायची सक्ती आहे तर दुसरीकडे आजूबाजूच्या लोकांच्या नियम न पाळण्याच्या वृत्तीमुळे कोव्हीड-१९चा संसर्ग होण्याची टांगती तलवार आहे. यामुळे सतत निर्माण होणारी भीती, चिंता, आणि ताण यामुळे माणसांच्या मानसिक आरोग्यावरही परिणाम होत आहेत. शारीरिक अंतर आणि पृष्ठभाग साफसफाईच्या निकषांचे पालन करण्यास कोणत्या बाबी आपल्याला अडथळा आणतात हे विचारले असता, बहुतेक प्रतिसादकांनी काही समान मते नोंदवली आहेत. घरात नियमित साफसफाई केल्याने वाढलेली सांधेदुखी आणि सतत मुखपट्टी परिधान केल्याने निर्माण होणारी गुदमरल्याची भावना हे यातील महत्त्वाचे अडथळे आहेत. तसेच शारीरिक अंतराचे निकष न पाळणारी प्रचंड गर्दी आणि यामुळे स्वतःला वाटणारी हतबलता आणि संसर्ग होण्याची भीती, तसेच चोवीस तास सतत अंतराच्या नियमांचे आणि पृष्ठभागांची

साफसफाई करण्याचे भान राखण्यामुळे येणारा ताण आणि होणारी चिडचिड या अडथळयांचा उल्लेखदेखील प्रतिसादकर्त्यांनी केला आहे.

जागतिक आरोग्य संघटनेची तसेच भारत सरकारने आणि राज्य शासनाने प्रसारित केलेली मार्गदर्शक तत्त्वे तसेच बृहन्मुंबईच्या उदाहरणाद्वारे लक्षात आलेले कोव्हीड-१९ संसर्गाचे आकृतिबंध यावरून अंतर आणि पृष्ठभाग या दोन भौगोलिक घटकांचे महत्त्व लक्षात येते. परंतु सर्वेक्षणातून समोर आलेले निष्कर्ष या दोन घटकांबाबतच्या जागरूकतेचे निम्न स्तर दर्शवितात आणि यामुळे कोव्हीड-१९च्या संभाव्य दुसऱ्या लाटेचा परिणाम अधिक गंभीर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे नुसते ६ फूट अंतर राखा किंवा पृष्ठभागांची नियमित साफसफाई करा इतके सांगून भागणार नाही, तर ते का करायचे याची वैज्ञानिक माहिती सोप्या पद्धतीने लोकांपर्यंत पोहोचवण्याची गरज आहे. जागरूकतेच्या अभावामुळे आजपर्यंत झालेले नुकसानदेखील माहितीच्या आधारे लोकांपर्यंत कसे पोहोचवता येतील, हे पाहणेदेखील महत्त्वाचे आहे. सुरक्षिततेचे निकष न पाळणारी एक व्यक्ती इतर कितीतरी व्यक्तींचे आरोग्य धोक्यात आणू शकते, ही वस्तुस्थिती लक्षात घेता अशा व्यक्तींची सामाजिक वर्तणूक अधिक सकारात्मक कशी करता येईल, ही शासनाची तसेच प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. ही सामाजिक जबाबदारी आपण कशी पार पाडतो, यावरच येणाऱ्या काळातील कोव्हीड-१९चा धोका आणि गांभीर्य अवलंबून असेल.

**संदर्भ:**


१. एमसीजीएम (२०२०) : 'बृहन्मुंबई कोव्हीड-१९ रिस्पॉन्स वॉर रूम डॅशबोर्ड', ३० नोव्हेंबर २०२०, **http://stopcoronavirus.mcgm.gov.in/** (संकेतस्थळाला भेट १ डिसेंबर २०२०)

२. एमसीजीएम (२०२०) : 'बृहन्मुंबई कोव्हीड-१९ रिस्पॉन्स वॉर रूम डॅशबोर्ड', ३० नोव्हेंबर २०२०, **http://stopcoronavirus.mcgm.gov.in/** (संकेतस्थळाला भेट १ डिसेंबर २०२०)

३. गुप्ता, अमितेश व इतर (२०२०) : 'सिग्निफिकन्स ऑफ जौग्राफिकल फॅक्टर्स टू द कोव्हीड-१९ आऊटब्रेक इन इंडिया', मॉडेलिंग अर्थ सिस्टिम्स अँड एनव्हीरॉन्मेंट, अंक ६, पृ. २६४५-२६५३, पीडीएफ, **https://link.springer.**

com/article/10.1007/s40808-020-00838-2 (संकेतस्थळाला भेट २८ ऑक्टोबर २०२०)

४. गुप्ता, सोनल व इतर (२०२०) : 'इफेक्टस ऑफ वेदर ऑन कोव्हीड-१९ स्प्रेड इन द यूएस: अ प्रेडिक्शन मॉडेल फॉर इंडिया इन २०२०', सायन्स ऑफ द टोटल एनव्हीरॉन्मेंट, अंक ७२८, https://www.sciencedirect.com/science/article/abs/pii/S0048969720323779?via%3Dihub (संकेतस्थळाला भेट ४ जुलै २०२०)

५. घोष, कपिल व इतर (२०२०) : 'इंटर-स्टेट ट्रान्समिशन पोटेन्शिअल अँड व्हलनराबिलिटी ऑफ कोव्हीड-१९ इन इंडिया', प्रोग्रेस इन डिझास्टर सायन्स, अंक ६, https://www.sciencedirect.com/science/article/pii/S259006172030051X (संकेतस्थळाला भेट २८ ऑक्टोबर २०२०)

६. चक्रबर्ती, इंद्रनील व मैती, प्रसेनजीत (२०२०) : 'कोव्हीड-१९ आउटब्रेक: मायग्रेशन, इफेक्ट्स ऑन सोसायटी, ग्लोबल एनव्हीरॉन्मेंट अँड प्रिव्हेन्शन', सायन्स ऑफ द टोटल एनव्हीरॉन्मेंट, अंक ७२८, https://www.sciencedirect.com/science/article/abs/pii/S0048969720323950?via%3Dihub (संकेतस्थळाला भेट ४ जुलै २०२०)

७. झम्ब्रनो-मोन्सरेत, मॅन्युएल व इतर (२०२०) : इन्डायरेक्ट इफेक्ट्स ऑफ कोव्हीड-१९ ऑन द एनव्हीरॉन्मेंट', सायन्स ऑफ द टोटल एनव्हीरॉन्मेंट, अंक ७२८, https://www.sciencedirect.com/science/article/abs/pii/S0048969720323305?via%3Dihub (संकेतस्थळाला भेट ४ जुलै २०२०)

८. डब्ल्यूएचओ (२०२०) : 'कोरोना व्हायरस डिसीज (कोव्हीड-१९) ऍडव्हाइस फॉर द पब्लिक', जागतिक आरोग्य संघटना,

९. https://www.who.int/emergencies/diseases/novel-coronavirus-2019/advice-for-public (संकेतस्थळाला भेट ३ डिसेंबर २०२०)

१०. नझारिओ, ब्रुनाल्ड (२०२०) : 'कोरोना व्हायरस अँड सरफेसेस: हाऊ लॉन्ग ड्झ कोव्हीड-१९ लिव्ह ऑन सरफेसेस?', https://www.webmd.com/lung/how-long-covid-19-lives-on-surfaces (संकेतस्थळाला भेट १ डिसेंबर २०२०)

११. भारताची जनगणना (२०११) : 'डिस्ट्रिक्ट सेन्सस हँडबुक - मुंबई उपनगर', महाराष्ट्र सिरीज २८, भाग १२-अ, डिरेक्टरेट ऑफ सेन्सस ऑपेरेशन्स, मुंबई, https://censusindia.gov.in/2011census/dchb/2722_

PART_B_DCHB_%20MUMBAI%20(SUBURBAN).pdf (संकेतस्थळाला भेट १ डिसेंबर २०२०)

१२. भारताची जनगणना (२०११) : 'डिस्ट्रिक्ट सेन्सस हँडबुक - मुंबई', महाराष्ट्र सिरीज २८, भाग १२-अ, डिरेक्टरेट ऑफ सेन्सस ऑपेरेशन्स, मुंबई, https://censusindia.gov.in/2011census/dchb/2723_PART_B_DCHB_%20MUMBAI.pdf (संकेतस्थळाला भेट १ डिसेंबर २०२०)

१३. भारद्वाज, रजनीश व अग्रवाल, अमित (२०२०) : 'हाऊ कोरोना व्हायरस सर्व्हाइव्हस फॉर डेज ऑन सरफेसेस', फिजिक्स ऑफ फ्लुईड्स, अंक ३२, https://aip.scitation.org/doi/10.1063/5.0033306 (संकेतस्थळाला भेट १ डिसेंबर २०२०)

१४. मुरुगेसन,बाग्यराज व इतर (२०२०) : 'डिस्ट्रिब्युशन अँड ट्रेंड ऍनालिसिस ऑफ कोव्हीड-१९ इन इंडिया: जिओस्पॅशल अप्रोच', जर्नल ऑफ जिऑग्राफिकल स्टडीज, अंक ४ (१), पृ. १-९, पीडीएफ, https://www.researchgate.net/publication/340647774 (संकेतस्थळाला भेट २८ ऑक्टोबर २०२०)

१५. मेयर, जोनाथन व लेव्हीस, नॅन्सी (२०२०) : 'एन इनव्हिटॅबल पॅंडेमिक: जौग्राफिक इन्साईट्स इनटू द कोव्हीड-१९ ग्लोबल हेल्थ इमर्जन्सी', युरेशियन जौग्रफी अँड इकॉनॉमिक्स, पृ. १-९, पीडीएफ, https://www.tandfonline.com/doi/full/10.1080/15387216.2020.1786425 (संकेतस्थळाला भेट २८ ऑक्टोबर २०२०).

१६. मेंडेस, थियागो व कार्व्हालो, लुई (२०२०) : 'शिफ्टिंग जौग्राफीज ऑफ नॉलेज प्रॉडक्शन: द कोरोना व्हायरस इफेक्ट', रॉयल डच जौग्राफिकल सोसायटी, पृ. २०५-२१०, पीडीएफ,https://www.ncbi.nlm.nih.gov/pmc/articles/PMC7323123/ (संकेतस्थळाला भेट २८ ऑक्टोबर २०२०)

१७. मोहिते, मुकेश व सरोदे, आदित्य (२०२०) : 'पॉझिटिव्ह इफेक्ट्स ऑफ कोव्हीड-१९ टू एनव्हीरॉन्मेंट बेस्ड ऑन कोरोबोरेशन अँड स्टॅटिस्टिक्स: अ रिव्ह्यू', इंडियन जर्नल ऑफ एनव्हीरॉन्मेंटल सायन्सेस, अंक २४ (१), पृ. १७-२६, पीडीएफ, http://www.ijesonline.co.in/wp-content/uploads/2020/05/Mohite-Sarode-17-26.pdf (संकेतस्थळाला भेट ४ जुलै २०२०)

१८. शर्मा, शुभम (२०२०) : 'इफेक्ट ऑफ रेस्ट्रीक्टड इमिशन्स ड्युरिंग कोव्हीड-१९ एअर क्वालिटी इन इंडिया', सायन्स ऑफ द टोटल एनव्हीरॉन्मेंट,

संभाषित

अंक ७२८, **https://www.sciencedirect.com/science/article/abs/pii/S0048969720323998?via%3Dihub** (संकेतस्थळाला भेट ४ जुलै २०२०)

१९. सिडीसी (२०२०) : 'हाऊ टू प्रोटेक्ट युअरसेल्फ अँड अदर्स', सेंटर्स फॉर डिसीज कंट्रोल अँड प्रिव्हेन्शन, **https://www.cdc.gov/coronavirus/2019-ncov/prevent-getting-sick/prevention.html#:~:text=Stay** at least 6 feet,risk of getting very sick. (संकेतस्थळाला भेट १ डिसेंबर २०२०)

२०. सिडीसी (२०२०) : 'हाऊ कोव्हीड-१९ स्प्रेड्स', सेंटर्स फॉर डिसीज कंट्रोल अँड प्रिव्हेन्शन, **https://www.cdc.gov/coronavirus/2019-ncov/prevent-getting-sick/how-covid-spreads.html** (संकेतस्थळाला भेट ३ डिसेंबर २०२०)

२१. सिडीसी (२०२०) : 'सोशल डिस्टंसिंग', सेंटर्स फॉर डिसीज कंट्रोल अँड प्रिव्हेन्शन, **https://www.cdc.gov/coronavirus/2019-ncov/prevent-getting-sick/social-distancing.html#:~:text=When going out in public,the spread of COVID-19.** (संकेतस्थळाला भेट ३ डिसेंबर २०२०)

२२. सुमन, राजीव व इतर (२०२०) : 'सस्टेनेबिलिटी ऑफ कोरोना व्हायरस ऑन डिफरंट सरफेसेस', जर्नल ऑफ क्लिनिकल अँड एक्सपेरिमेंटल हेपॅटॉलॉजी, अंक ३०, **https://www.jcehepatology.com/article/S0973-6883(20)30062-1/fulltext** (संकेतस्थळाला भेट १ डिसेंबर २०२०)

# भाष्य

# तरीही पेपर निघत राहिला....

**श्रीकांत बोजेवार**

निवासी संपादक

महाराष्ट्र टाईम्स, मुंबई

Shrikant.bojewar@gmail.com

संभाषित

प्रश्नच पडले नाहीत, तर उत्तरे कशी मिळणार? आणि तशी परिस्थितीच निर्माण झाली नाही तर प्रश्न तरी कसे पडणार? जगात सर्वत्र आणि सर्वकाळ आणीबाणीच्या परिस्थितीनेच माणसाला असंख्य गोष्टी शिकवल्या आहेत. करोनाच्या गेल्या आठ महिन्यांच्या कहराने आपले आर्थिक कंबरडे मोडले, अनेक कंपन्या मोडकळीस आल्या, रोजगार गेले, रस्त्याने शेकडो मैल चालत जात घर-गाव गाठणाऱ्यांचे हाल झाले, नातेसंबंधांमध्ये तणाव निर्माण झाले, शिक्षणव्यवस्था विस्कळीत झाली, ग्रंथव्यवहारांवर गदा आली आणि सेवाभावी संस्थांचे आर्थिक-शारीरिक बळ संपले. नकारात्मक परिणामाचे याहूनही अधिक, असंख्य पैलू आहेत, मात्र या आठ महिन्यांनी आपल्याला 'दिलेल्या' बाबींचीही नोंद करणे आवश्यक आहे. प्रसारमाध्यमांना, विशेषतः छापील माध्यमांना इतरांप्रमाणे आर्थिक संकटांचा, नोकर कपातीचा, वेतन कपातीचा सामना करावा लागलाच, मात्र या निमित्ताने अनेक नव्या गोष्टीही कळल्या. त्यातली सर्वाधिक महत्त्वाची बाब म्हणजे ९० टक्के कर्मचाऱ्यांनी आपापल्या घरून काम केले तरी वृत्तपत्र प्रसिद्ध होऊ शकते, याचा झालेला साक्षात्कार. तो होण्याची प्रक्रिया हा आमच्या सगळयांच्याच आयुष्यातला स्मृतींमध्ये कायमचा गोठवून ठेवावा असा क्षण आहे.

या साक्षात्काराकडे जाताना पहिला प्रश्न स्वतःलाच विचारावा लागेल, तो 'कोविड उर्फ करोना जर दहा-पंधरा वर्षांपूर्वी आला असता तर काय झाले असते?' करोनाच्या आरोग्यविषयक परिणामाकडे पाहिले तर कदाचित आजची स्थिती आणि पंधरा वर्षांपूर्वीची स्थिती यात फार फरक पडल्याचे दिसले नसते, परंतु या फरकाच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक बाजूंकडे पाहिले तर पंधरा वर्ष हा खूप मोठा काळ भासतो. हा फरक घडून आला तो तंत्रज्ञानामुळे, विशेषतः इंटरनेट आधारित संपर्क क्रांतीमुळे. छापील पत्रकारितेच्या बाबतीत 'करोना काळाची कथा' हा त्यामुळेच इतिहासातील एक अत्यंत महत्त्वाचा, निर्णायक टप्पा ठरणार आहे.

सर्वाधिक महत्त्वाची बाब आधी सांगायची तर ती अशी की, इंटरनेट नावाची जादू नसती, या महाजालाची कृपा नसती तर या नऊ-दहा महिन्यांच्या काळात वृत्तपत्रांचे प्रकाशन स्थगितच ठेवावे लागले असते. सकाळी सकाळी तुमच्या-आमच्या दाराच्या कडीला वृत्तपत्र अडकवून बेल वाजवून निघून जाणाऱ्या पावलांचा आवाजच कानी पडला नसता. संप अथवा अशाच काही कारणांमुळे इतिहासात वृत्तपत्रांचे प्रकाशन स्थगित राहिल्याची उदाहरणे जगभर आहेत, परंतु मानवी हतबलतेतून असे पहिल्यांदाच घडले असते, ती

संग्रामित्र

वेळ इंटरनेटने येऊ दिली नाही. गेल्या दहा महिन्यांच्या काळात वृत्तपत्र तयार होण्यात एकही दिवस खंड पडला नाही.

अगदी सुरुवातीचा म्हणजे फेब्रुवारी महिन्याच्या अखेरचा एक आठवडा आम्ही वृत्तपत्राची तयार झालेली पाने छपाईसाठी न पाठवता त्याच्या पीडीएफ वाचकांना उपलब्ध करून दिल्या. त्याही काळात नावापुरती छपाई होत होती, परंतु वितरण शक्य होत नव्हते. तो आठवडा वगळता दररोज कागदाची रिळे फिरत राहिली, यंत्रे धडाडत राहिली आणि ताजे वृत्तपत्र वाचकांच्या हाती पडत राहिले. 'आत्मनिर्भरते'चा हा नवा आविष्कार शक्य झाला तो केवळ आंतरमहाजालावर स्वार होऊन आलेल्या तांत्रिक प्रगतीमुळे आणि वृत्तपत्र तयार करण्याच्या, पोहोचवण्याच्या साखळीत सहभागी असलेल्या आमच्या सर्व जिगरी सहकाऱ्यांमुळे.

करोनाच्या अगदी सुरुवातीच्या काळात एका आघाडीच्या वाहिनीने कोणतीही शहानिशा न करता किंवा कोणत्याही शास्त्रीय सत्याचा आधार न घेताच, 'वृत्तपत्र हाताळल्याने करोनाचा फैलाव होतो' अशी लोणकढी थाप ठोकून दिली होती. या चुकीच्या प्रचाराचा सामना करण्यापासून वृत्तपत्रांना आपली लढाई सुरू करावी लागली. एक साधी गोष्ट होती, आपले चलन कागदी आहे, त्या चलनाशिवाय तर चलनवलन शक्यच नव्हते. सकाळी दूध-ब्रेडची खरेदी करण्यापासून तर दिवसभर किराणा माल, औषधे विकत घेण्यापर्यंत हे कागदी चलन शेकडो हजारो हातांचा प्रवास करत असे. कागद हाताळण्यातून करोनाचा प्रसार झाला असता तर जग आज जवळपास निर्मनुष्य होण्याच्या मार्गावरच दिसले असते. शेकडो हजारो हातांमधून, खिशांमधून, पाकिटांमधून प्रवास करत आलेल्या नोटांना स्पर्श झाला तर काहीच होत नाही, मात्र दहा-पाच हातांच्या स्पर्शांतून घरापर्यंत पोचणारी वृत्तपत्रे घातक आहेत?

या खोटारड्या प्रचाराशी वृत्तपत्रांनी सामना केला तो दोन आयुधांनी. एक म्हणजे जागतिक आरोग्य संघटनेपासून तर राज्यातील डॉक्टरांच्या संघटनांचे अध्यक्ष, सदस्य यांना महाराष्ट्र टाइम्ससह सर्वच वृत्तपत्रांनी लिहिते केले आणि लोकांना याबाबत शहाणे करण्याचे काम प्रयत्नपूर्वक सुरू केले. दुसरे म्हणजे, काही वाहिन्या अनेकदा करोनाच्या भडक, अतिरंजित बातम्या देत होत्या, भीती वाटेल अशा पद्धतीने नाटकी आवाजात जगबुडी आल्यागत देखावा करत होत्या, त्याला छेद देत वास्तवावर आधारित, समतोल बातम्या आणि आकडेवारी वृत्तपत्र सतत देत राहिले. त्यातून वृत्तपत्रांबाबत मुळातच

असलेली आणि क्षणकाळ हरवलेली आपलेपणाची भावना पुन्हा निर्माण झाली. काही काळ थांबलेला वृत्तपत्र वाचनाचा प्रवाह पुन्हा वाहता होऊ लागला. परंतु तरीही संकटे संपलेली नव्हती.

'वृत्तपत्र काढणे' हे एक सांघिक काम आहे, त्यासाठी कामकाजाच्या पद्धतीची थोडी माहिती देणे आवश्यक आहे. वृत्तपत्राच्या वार्ताहरांचा चमू दिवसभर शहरातील घडामोडी गोळा करतो. राज्यभरात, देशभरात, जगभरात घडलेल्या घटनांचा आढावा घेणारी एक यंत्रणा असते. त्यात पीटीआयसारख्या वृत्तसंस्था, जगभरातील इतर वृत्तसंस्था, राज्यभरातील वार्ताहर असे मोठे जाळे असते. त्या सगळ्याचे सुसूत्रीकरण करून उद्याच्या अंकात काय घ्यावे लागेल हे ठरवणारी डेस्क नामक एक यंत्रणा असते. संपादक, निवासी संपादक, साहाय्यक संपादक मंडळी या व्यवस्थेवर नजर ठेवून असतात, मार्गदर्शन करत असतात. मिनिटा-मिनिटाला काहीतरी नवे घडत असते. आधी महत्त्वाची वाटणारी बातमी, त्याहून अधिक मोठी बातमी आली की कमी महत्त्वाची होते. निर्णय सतत बदलावे लागतात. उद्याच्या अंकाची पाने तयार होता होता वृत्तपत्राच्या कार्यालयात प्रचंड हलचल असते. चर्चा, संवाद, विचारविनिमय, प्रत्यक्ष पानावर बातम्यांची रचना करणाऱ्या डिझायनरशी संवाद, बातम्या वाचून वार्ताहरांशी होणाऱ्या चर्चा असे सतत काहीतरी घडत असते. कोणतेही वृत्तपत्र हे पन्नासेक व्यक्तींच्या अशा चैतन्यमय हालचालींमधून साकार होत असते. करोनाच्या काळात आपापल्या घरून काम करताना, लॅपटॉप अथवा मोबाइलच्या स्क्रीनवरून संवाद साधताना हे भारलेले वातावरण कसे मिळणार? प्रत्यक्ष एकमेकांच्या समोर नसतानाही ही सगळी प्रक्रिया नीट पार पडून दुसऱ्या दिवशीचा अंक आकाराला येऊ शकतो याची आम्ही कधी कल्पनाच केली नव्हती. करोना काळाने ती प्रत्यक्षात आणून दाखवली. परिस्थितीच्या अपरिहार्यतेचा रेटाच एवढ्या जलद गतीने परिवर्तन आणू शकतो.

मुंबईची विविध उपनगरे, ठाणे, डोंबिवली, कल्याण, टिटवाळा, वसई, विरार, नवी मुंबई असे औरस चौरस विखुरलेले वृत्तपत्रातील कर्मचारी नेटबंधनाने एकत्र बांधले जाऊन हवेतल्या हवेतच चर्चाबिर्चा करतात. समोरासमोर होणारे प्रत्येक काम अपरोक्ष होते, ते करण्याची, प्रत्यक्षात आणण्याची पद्धत थोडी वेगळी परंतु अंतिम परिणाम मात्र तोच! आमच्या कार्यालयातून प्रत्येकाला एक कळीचा शब्द (पासवर्ड) दिला गेला, संबंधित संकेतस्थळावर तो टाकला की अख्खे ऑफिस लॅपटॉपवर. संपर्कयंत्रणा

कार्यान्वित होते आणि तुमचा लॅपटॉप किंवा डेस्कटॉप आफिसच्या यंत्रणेशी जोडला जातो. मग पुढे सगळे तेच, जे कार्यालयात घडायचे.

कुठले पान लावले जात आहे, कोण डिझायनर आहे, कोण उपसंपादक आहे, ते मी लॅपटॉपवर बघू शकतो. गरज भासल्यास ते पान मोठे करून (झूम करून) बघू शकतो, सूचना देऊ शकतो. उपसंपादक त्या पानाचा ताबा घेऊन मजकूर कमी जास्त करू शकतात. काही चौरस मीटरच्या क्षेत्रात होणारे काम शेकडो मीटर अंतरावरूनही होऊ शकते. हे सगळे प्रत्यक्षात घडले, घडत आहे. रिपोर्टिंग हे प्रत्यक्ष जागेवर, घटनास्थळी जाऊन करायचे काम आहे. संपर्क, लोकसंग्रह आणि सोशल माध्यमे यांतून त्यातले जेवढे काम शक्य झाले तेवढे केले तरी कोविडच्या काळात विविध रुग्णालयांमधील अवस्था, प्रत्यक्ष रस्त्यांवरील वातावरण, सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेची अवस्था अशासारख्या अनेक बाबी होत्या, ज्यासाठी वार्ताहरांना त्या त्या ठिकाणांना प्रत्यक्ष भेटी देणे भाग होते. आमच्या वार्ताहरांनी, छायाचित्रकारांनी जोखीम पत्करून ते केले. याबाबत छापील माध्यमांच्या तुलनेत वाहिन्यांच्या वार्ताहरांना अधिक जोखीम पत्करावी लागली, कारण त्यांना प्रत्यक्ष दृश्येही दाखवावी लागतात.

अर्थात इंटरनेट हे जेवढे मोठे वरदान आहे तेवढेच ते जर नीट काम करत नसेल तर तापदायकही आहे. आपल्या देशात अनेक तांत्रिक यंत्रणांची अवस्था, 'त्या आहेत, परंतु काम करत नाहीत, बंद आहेत, नादुरुस्त आहेत' अशी असते. साधे बँकेत धनादेश जमा करण्याचे मशीनही बहुतांश वेळा आपल्याला 'आज मशीन बंद आहे' अशा स्टिकरसहच पाहावे लागते. ठरावीक वेळेत काम पूर्ण होणे ही वृत्तपत्राची प्राथमिक गरज असते. सततचा संपर्क, सेकंदासेकंदाला एकमेकांना माहिती, फोटो पाठवणे, पाने तयार होत असताना त्यांची 'हेवी फाईल' तयार होते, ती पाठवणे, अशी 'अवजड कामे' नेटद्वारे करावी लागत होती. मोबाइलचे नेटवर्क वापरून एरवी ते कदाचित करता आलेही असते, परंतु मोठ्या प्रमाणात लोक घरून कामे करत असल्याने लोड येऊन सर्वच कंपन्यांचे नेटवर्क त्या भाराने वाकून कूर्मगतीने चालत होते. वायफाय यंत्रणा बसवून घेऊन दहा किंवा अधिक एमबीपीएसचा वेग मिळवणे सर्वांनाच परवडणारे नव्हते. कार्यालयातील 'ताकदवान' इंटरनेट जे काम चुटकीसरशी करते, तेच काम घरी मात्र पंधरा चुटक्या वाजवल्या तरी होत नव्हते. कधी लाईट जाणे, कधी लॅपटॉप अचानक बंद पडणे, कधी लॅपटॉपचे विक्षिप्त वागणे सुरू होते. त्यातून चिडचिड होत होती. वृत्तपत्र

संभाषित

काढण्यासारखे काम करताना चिडचिड नियंत्रणात ठेवणे हे मोठेच आव्हान होते. आपली एखादी चूक उद्या कुणाला तरी मनस्ताप देऊ शकते याचा विचार करावा लागतो. तरी त्यातही कधी कधी चूक राहून जातेच. अशी एखादी जरी गफलत झाली तरी घरी आरामात बसून समाजमाध्यमांवर वृत्तपत्रांची सालटी काढणाऱ्यांच्या फौजा हल्ली तयारच असतात. कशा परिस्थितीत वृत्तपत्रे काढली जात आहेत, अधिकाधिक योग्य असे वार्तांकन करण्याचा प्रयत्न कसा केला जात आहे, यात त्यांना काही रस नसतो. ‘दिसली चूक की कर उद्धार’ असा नेहमीचा खाक्या या काळातही अनुभवायला मिळाला. वृत्तपत्रातील शुद्धलेखनाच्या चुका काढणारी पोस्ट अशुद्ध लिहिलेली असली तरी चालून जाते. वृत्तपत्रातली चूक काढणे जास्त महत्त्वाचे. असो, वृत्तपत्राला ‘घाईतले साहित्य’ म्हटले जाते, सोशल माध्यमातील बरेचसे साहित्य हे डबघाईतले असते. मात्र अशा स्थितीतही आम्ही काम करत होतो. एके दिवशी रात्रीच्या वेळी आमचे काम ऐन भरात असताना एका सहकाऱ्याने मेसेजेसना प्रतिसाद देणे बंद केले. लक्षात आल्यावर सगळ्यांनी धावपळ केली, जवळपास राहणारे मदतीला धावले, फोनाफोनी झाली, परंतु करोनामुळे आमचा एक सहकारी, आम्ही गमावला. त्या रात्री आम्हाला बसलेला धक्का पचवूनही आम्ही अंक मात्र काढला. करोनाच्या काळात आर्थिक कारणांपासून तर भावनिक कारणांपर्यंत अनेक प्रकारे मानसिक आरोग्याचे प्रश्न निर्माण झाले आहेत, मनोविकार तज्ज्ञांकडे  रुग्ण वाढले आहेत, कौटुंबिक हिंसाचाराचे प्रमाण वाढले आहे, अशा बातम्या देत असताना त्या बातम्या देणाऱ्यांना स्वतःच्या, कुटुंबाच्या किंवा सहकाऱ्यांच्या मनःस्थितीचा विचार करायला मात्र वेळ नव्हता.

हळूहळू परिस्थितीशी जुळवून घेत, नवनव्या समस्यांवर नवे तोडगे शोधत आम्ही रोजचा अंक काढत असताना बातम्यांच्या बाबतीतली एक अडचण अशी होती, की इतरांना त्याची कल्पनाच येणार नाही. करोनासंबंधीच्या बातम्या कितीही द्यायच्या म्हटलं तरी सगळी पाने त्या बातम्यांनी थोडीच भरणार आहेत? सगळे सामाजिक, सांस्कृतिक व्यवहार बंद असताना, स्तब्ध असताना, कोणतेही इव्हेन्ट्स होत नसताना रोज तीस-चाळीस बातम्या देण्याचे काम शहरटीम करत होती. एरवी वार्ताहरांपुढे ‘ही बातमी देऊ की ही देऊ’, असा प्रश्न असतो, परंतु जेव्हा अवघा समाज केवळ श्वास घेण्याव्यतिरिक्त इतर काहीही करू इच्छित नव्हता, अशा काळात शोधून शोधून बातम्या तरी काय देणार? मात्र तरीही रोज बातम्या येत होत्या. पाने भरत होती.

संवादिता

पहिल्या पानाची मुख्य बातमी काय करावी, यावर वृत्तपत्र कार्यालयात दररोज खल होत असतो. अनेकदा महत्त्वाचे काही घडले की ती बातमी मुख्य होणार असे कोणी काही न बोलताही ठरून जाते. करोनाच्या काळात मात्र पहिले पान सतत करोनाशी संबंधित बातम्यांनीच भरलेले होते. एखादा विषय सतत सात-आठ महिने पहिल्या पानावर व्यापून रहावा, मुख्य बातमी होऊन रहावा, असे अलीकडल्या काळातले दुसरे उदाहरण मला तरी आठवत नाही. अग्रलेखांसाठी, पुरवण्यांसाठी करोनाव्यतिरिक्त विषय मिळणेही कठीण झाले होते आणि त्याच त्याच विषयांवर रोज नव्याने काय लिहिणार, असा प्रश्न रोज पडत होता. याप्रकारची अनपेक्षित, अपरिचित आणि अकल्पित आव्हाने पेलत आम्ही वृत्तपत्र काढले. अजूनही काढत आहोत.

वृत्तपत्र एकदा तयार झाले, की मग त्याची छपाई आणि वितरण हा त्या पुढला एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा. वृत्तपत्र हाताळण्याविषयी अनेकांच्या मनात भरवली गेलेली भीती, त्यामुळे धास्तावलेली कुटुंबे, गावी निघून गेलेली वृत्तपत्र वाटप करणारी मुले, लोकलसेवा, बससेवा बंद, रिक्षा-टॅक्सी नाहीत. या अवस्थेशी लढा देत छपाई आणि वितरण सेवेतील आमचे सहकारी उपलब्ध मनुष्यबळावर शक्य तेवढ्या प्रभागात वृत्तपत्रे पोचवत होते. काही सोसायट्यांनी असहकार पुकारला होता, काही स्वतःहून पुढे येत होत्या, काहींनी पेपर वाटणाऱ्या मुलांना दरडावून जाब विचारण्यासही कमी केले नाही. काहींनी ‘गेटवर पेपर ठेवून जा, आम्ही नंतर घेऊन जातो’ असे सांगितले, मात्र अशी वृत्तपत्रे त्याचा खरा ‘मालक’ येईस्तोवर जागेवर राहतील का, या प्रश्नाचे भारतीय स्वभाव परंपरेतले उत्तर ‘नाही’ असेच होते. मग पेपर वाटणारी मुले ही जोखीम कशी पत्करतील? त्यामुळे अर्थातच प्रतींची संख्या घटली होती, तरीही आम्ही नेटाने आणि रेट्याने काम करत राहिलो, वृत्तपत्र काढत राहिलो, टिकूनही राहिलो. थोड्याफार फरकाने सर्वच वृत्तपत्रांची स्थिती अशीच होती.

वृत्तपत्राचा एक प्रमुख आधार असतो वाचक तर दुसरा तेवढाच महत्त्वाचा आधार असतो जाहिरातदार. आर्थिक नाड्या आवळल्या जात असताना, ग्राहक नावाचा देव चार भिंतीत कोंडला गेलेला असताना आणि औषध-खाद्यपदार्थ या दोन बाबींव्यतिरिक्त सगळ्या गरजा ग्राहकांनी फडताळात बंद करून ठेवलेल्या असताना, कोण कशाची जाहिरात कशाला करणार? मात्र त्यातूनही मार्ग शोधला गेला. छपाईच्या जोडीला ऑनलाईन कार्यक्रमातून

संपादकीय

काही महसूल मिळवण्याचे प्रयत्न झाले, त्यातून नवे मार्गही सापडले. अल्प प्रमाणात भरपाई केली गेली.

या परिस्थितीचा फटका प्रत्यक्ष वर्तमानपत्राच्या कर्मचाऱ्यांनाही बसलाच. पगार कपात, काही सहकाऱ्यांना अनिच्छेने अपरिहार्य निरोप, पानांची कमी झालेली संख्या असे सतत काहीतरी अस्वस्थ करणारे घडत होतेच. आठ महिने सगळे बंद असताना, 'वृत्तपत्र ही खरेच आपली गरज आहे का' असा विचार अनेकांच्या मनात बळावू लागला होता. त्या विचाराची दिशा बदलवण्याचे प्रयत्न करत, परिस्थितीशी झगडत, आम्ही काम करत राहिलो. हळूहळू 'वृत्तपत्र घरात हवेच' या मनःस्थितीला बरेचसे वाचक पुन्हा पोचले आणि ऑक्टोबर महिना येता येता आकाश बरेच खुले झाले. भडक बातमी, संयत भाषेतील बातमी, अनावश्यक नाट्य घालून केलेली बातमी, यातील फरक कळू लागला, तसे वाचक हळूहळू पुन्हा वृत्तपत्रांकडे परतू लागले आहेत. परंतु या दहा महिन्यांत देशाच्या अर्थव्यवस्थेवरच वाळूत तोंड खुपसण्याची वेळ आली, तिथे तुम्ही-आम्ही तरी किती आणि कसे पुरणार होतो? त्यामुळे खडतर आव्हाने अजून समोर उभी आहेतच. मात्र माणूस हा लढणारा प्राणी आहे, यावर विश्वास ठेवून एका व्हायरसविरुद्धच्या लढाईत आम्ही वृत्तपत्रीय आयुधे घेऊन उतरलो. करोनाकाळाचे धक्के पुढेही बसत राहतील कारण आसमंतावर त्याची छाया अजूनही आहे. परंतु याच भीतीच्या सावलीने, याच बिकट स्थितीने स्वतःमधील क्षमतांची एक नवी ओळखही झाली. अस्मानी संकटाच्या अनेक कथा आपण वाचल्या, ऐकल्या होत्या. पुढील पिढ्यांना सांगण्यासाठी अशीच एक कथा आपल्याही पदरी जमा झाली आहे. मानव जातीवरील एका संकटाचे, त्याविरुद्धच्या लढ्याचे आपण साक्षीदार झालो आहे. माध्यमात काम करताना या संघर्षाचे काही अधिक पैलू आम्हाला अनुभवता आले. करोनाविरुद्धच्या लढ्यात प्रत्यक्ष मैदानात असलेले डॉक्टर, नर्सेस, प्रशासकीय अधिकारी, पोलीस या यंत्रणेतील लोक लिहिते होतील तेव्हा आणखीही काही पैलू बाहेर येतील, यावेत.

छापील वृत्तपत्रे पुढील काळात राहतील की नाही, ती आणखी किती काळ तग धरतील, असे प्रश्न गेल्या दशकापासून चर्चेत आहेतच. परंतु करोना काळात, ताज्या वृत्तपत्राचा स्पर्श, गंध काही महिन्यांच्या विरहानंतर पुन्हा अनुभवल्यावर भावव्याकूळ झालेल्या एखाद्या वाचकाचा फोन येतो, तेव्हा सगळे प्रश्न-शंका निरर्थक ठरतात.

संभाषित

# कोरोना, टाळेबंदी आणि ग्रंथव्यवसाय

**संजय भास्कर जोशी**

लेखक व समीक्षक
sanjaybhaskarj@gmail.com

अपारदर्शकतेचे आपले म्हणून काही फायदे असतात तर काही अतिशय गंभीर दीर्घकालीन परिणाम करणारे तोटेही असतात. विशेषत: एखादी व्यापक आणि जटिल व्यवस्था अपारदर्शकतेचा बुरखा पांघरते तेव्हा तर हे तोटे अधिकच गंभीर होतात आणि ही अपारदर्शकता जेव्हा आपल्याही डोळ्यांवर पट्टी बांधून वावरते तेव्हा तर त्याला आत्मवंचनेचे स्वरूप प्राप्त होते. इतकेच नव्हे तर प्रगती आणि समृद्धीचे मार्ग अरुंद होऊ लागतात. ही अपारदर्शकता व्यवस्थेबाहेरच्या लोकांसाठी तर असतेच; वर पुन्हा ती व्यवस्थेतल्या घटकांमध्येसुद्धा जेव्हा पसरते तेव्हा अनागोंदीचे स्वरूप येऊ लागते. कारण अपारदर्शकतेमुळे दोष आणि अनैतिकता तर झाकली जातेच पण ज्याला खतपाणी घालून वाढवावे असे गुणदेखील झाकले जातात आणि एखाद्या अनपेक्षित बाह्य संकटाने जेव्हा हे अपारदर्शकतेचे बुरखे टराटरा फाडले जातात तेव्हा तो क्षण डोळे दिपवणारा असतो. खरे तर डोळे उघडणारा.

कोरोना आणि त्यानंतर आलेल्या टाळेबंदीने आपल्याकडच्या ग्रंथव्यवसायाचे असेच काहीसे झाले आहे.

लेखक, प्रकाशक, विक्रेते, वाचक या घटकांमध्ये पारदर्शकता आणि व्यवस्थेचे सुनिश्चित नियम यांचा अभाव असलेली आपली ग्रंथव्यवसाय नावाची व्यवस्था कोरोना आणि त्यानंतरची टाळेबंदी या संकटांनी हादरून गेली यात नवल नाही. कोणती पुस्तके किती छापली गेली, किती विकली गेली, कोणती आणि किती पुस्तके वाचली गेली, कुणी नेमके किती पैसे कमावले आणि गमावले अशा सर्व बाबतीत पराकोटीची गुप्तता (पक्षी : अपारदर्शकता) बाळगणारी आपली एकूण ग्रंथव्यवसाय नावाची ही व्यवस्था आहे. एक मोठा उद्योग (इंडस्ट्री) होण्याची क्षमता आणि शक्यता असलेली ही व्यवस्था विखुरलेल्या कौटुंबिक व्यवसायाचे स्वरूप धारण करून अंगभूत क्षमतेमुळे वाढत राहिली आहे. वास्तवात महाराष्ट्राची संस्कृती आणि वाचनप्रेमाचा रेटा इतका जबरदस्त आहे, की ग्रंथव्यवसाय अनेकपटीने वाढू शकेल, इतकेच नव्हे तर त्याला मोठ्या उद्योगाचे स्वरूप प्राप्त होऊ शकेल. पारदर्शकता आणि व्यावसायिकता या दोन चाकांवर ग्रंथव्यवसाय सुसाट वेगाने धावू शकेल. संकटकाळीच व्यवस्थेतले गुणदोष अधिक सुस्पष्ट होतात. त्यामुळे या 'कोरोना'ने लादलेल्या संकटात ग्रंथव्यवसायानेदेखील थोडे आत्मपरीक्षण करून तातडीने काही सुधारणा केल्यास प्रगतीची वाट पकडणे कठीण नाही.

संभाषित

सर्वप्रथम हे तर मान्यच करायला हवे, की कोरोनाने आणि त्यापाठोपाठ आलेल्या प्रदीर्घ टाळेबंदीने प्रकाशक, मुद्रक, वितरक हे घटक मोठ्याच अडचणीत आले. गोदामात किंवा दुकानात पडलेला माल प्रकाशकांना वितरकापर्यंत आणि वितरकांना ग्राहकापर्यंत पोहोचवताच येत नसेल तर ती मोठीच कोंडी ठरते. आधीच कोरोना संसर्गाची भीती आणि त्यात सरकारने लादलेली टाळेबंदी यांच्या परिणामाने सामाजिक हालचालच बंद झाल्याने ही अवस्था आली. प्रत्यक्ष वाचक इच्छा असूनही हतबल झाला. कारण सुमारे दोन महिने तर सगळे व्यवहारच ठप्प झालेले होते आणि मे महिन्याच्या मध्यावर पुस्तकांची दुकाने उघडायला सुरुवात झाली तोवर नागरिकांची भयग्रस्त अवस्था टोकाला पोहोचलेली होती. नंतर दुकाने उघडली तरी (खरे तर अजूनही) समाजाची भयग्रस्त मानसिकता काही हटली नाही. शिवाय लोकांच्या उत्पन्नावर कोरोना आणि टाळेबंदी यांच्यामुळे थेट मर्यादा आल्याने खर्चात मोठी कपात आणि अग्रक्रमात बदल होणे अपरिहार्य होते. तात्पर्य, 'आधीच उल्हास त्यात फाल्गुनमास' असा हा प्रकार होता. आधीच आपल्याकडे अनेक समाज घटकांना वाचनसंस्कृती लयाला गेल्याची निर्णायक आरोळी ठोकण्याची घाईच नव्हे तर छंद जडलेला असतो. ठरावीक अंतराने अशा आरोळ्या ऐकू येत असतात. त्यामागे शास्त्रीय विश्लेषण, संख्याशास्त्रीय विश्लेषण तसेच सामाजिक, मानसिक असे विवेचन आढळत नाही. पण ते असो. सांगायचा मुद्दा इतकाच, की आधीच हळव्या मनाच्या आणि नाजूक चणीच्या झालेल्या वाचनसंस्कृतीला या 'कोरोना' संकटाचा टोला जिव्हारी बसला यात नवल नाही.

ही झाली गेल्या सुमारे वर्षभराची नकारात्मक बाजू. मी एक वाचक, लेखक, समीक्षक आणि सक्रिय ग्रंथविक्रेता असल्याने माझ्या निरीक्षणावर आधारित सकारात्मक बाजूदेखील मांडतो. माझी निरीक्षणे आणि जमल्यास काही उपाययोजना देखील...

१. कोरोनाच्या आधी, कोरोनाच्या काळात आणि नंतरदेखील वाचकांची वाचायची आवड किंवा इच्छा कमी झाली असे मला आढळत नाही. संगणक, मोबाईलपासून ते किंडलपर्यंत अनेक गोष्टी भवतालात असूनही लोक असोशीने वाचताहेत असे मला दिसते. इतकेच नव्हे तर पदरचे पैसे खर्च करून स्वत:ला, आपल्या मुलांना वाचायला पुस्तके खरेदी करतात, असेही मला एक विक्रेता म्हणून दिसते. एक गमतीदार प्रातिनिधिक उदाहरण देतो. परवा

संभाषित

काही ग्रंथ खरेदी करायला राज्य सरकारच्या ग्रंथागारात गेलो होतो. वाचकांनी पुस्तके विकत घेऊच नयेत यासाठी पराकोटीचे प्रयत्न करणारी मंडळी तिथे कार्यरत होती. ही अतिशयोक्ती नाही. पण तरीही तिथे तुरुंगाला असतो तशा जाड लोखंडी दरवाजाच्या सळयांतून हात आत सारून पैसे पुढे करून पुस्तके मागणारे वाचक मला दिसले. सांगायचा मुद्दा असा की, आपल्या व्यवस्था 'वाचनसंस्कृती कशी वाढते तेच बघूया', असा पवित्रा घेऊन काम करीत असूनही वाचणारे असंख्य लोक मला भोवतालात दिसतात. बिगरसरकारी ग्रंथव्यावसायिक इतका पराकोटीचा नकारात्मक प्रयत्न अर्थातच करत नाहीत, पण त्यांच्या सकारात्मक प्रयत्नातल्या उणिवा शोधून काढायला कुणा कॉर्पोरेट मार्केटिंग तज्ज्ञाची गरज नाही. सांगायचा मुद्दा असा की, कोरोनाकाळात काय आणि एरवीही काय, आरोपाची तीन बोटे प्रकाशक आणि विक्रेते यांच्याकडेच आहेत.

२. दुसरा मुद्दा अर्थातच पारदर्शकतेचा. मी आय.सी.डब्ल्यू.ए.ची परीक्षा दिली तेव्हा आम्हाला कॉस्टिंग या प्रमुखविषयात Inter Firm comparison' नावाचा एक भाग होता. तसा प्रकार आपल्या ग्रंथव्यवसायात का नसावा? त्याचबरोबर 'best practices sharing' का नसावे? एखाद्या विक्रेत्याने किंवा एखाद्या प्रकाशकाने एखादी योजना जबरदस्त यशस्वी करून मोठे यश मिळवले तर त्याच्या यशाची परिमाणे म्हणजे विक्रीचे आकडे वगैरे तर गोपनीय असतातच शिवाय ती योजना यशस्वी होण्यामागे काय नियोजन किंवा तयारी केली होती याबाबतदेखील कमालीची गुप्तता पाळली जाते. ग्रंथव्यवसाय हा 'झीरो सम गेम' नाही हे आपल्या लोकांना कधी उमजणार? त्याचबरोबर आर्थिक व्यवहाराबाबतदेखील पारदर्शकतेचा अभावच दिसेल. लेखक-प्रकाशक, प्रकाशक-विक्रेते यांच्यात रीतसर अटी-शर्ती मान्य करून लेखी करार झाल्याची उदाहरणे अपवादानेच आढळतील.

३. तिसरा मुद्दा सेवेच्या गुणवत्तेचा आणि व्यावसायिक संबंधांचा आहे. खरे तर हे नेहमीच करायला हवे पण कोरोनासारख्या संकटकाळात याचे महत्त्व अधिक जाणवते. या काळात

प्रकाशकांनी विक्रेत्यांशी आणि विक्रेत्यांनी प्रत्यक्ष वाचक-ग्राहकाशी अतिशय विचारपूर्वक आणि प्रयत्नपूर्वक संबंध राखणे गरजेचे आहे. त्यासाठी सततचा संवाद, बदलत्या संदर्भातल्या नवीन योजनांबद्दल वैचारिक देवाणघेवाण, सकारात्मक विचारांचे आदानप्रदान या मार्गाने हे करावे लागेल आणि सुदैवाने संपर्क माध्यमांना करोना संसर्ग होत नाही त्यामुळे फोन, मेसेजेस्, ईमेल वगैरे माध्यमांतून हा संवाद सातत्याने कायम ठेवला पाहिजे. अशा गोष्टींचे परिणाम एकास एक असे किंवा त्वरित थेट नफ्यात दिसत नसतात तर याचा लाभ लांब पल्ल्याच्या काळात दिसून येतो. सुधारलेल्या संबंधांमुळे शेवटी व्यवसाय वृद्धी होतेच होते, यावर मात्र ठाम विश्वास हवा. तेच दुकानात येणाऱ्या प्रत्यक्ष वाचक ग्राहकांचे. आज ना उद्या दुकान उघडणारच आहे, तेव्हा आपले नेहमीचे ग्राहक पुन्हा आपल्याच दुकानाकडे वळायला हवे असतील तर आपल्या ग्राहकांशी नियमित संवाद हवा. त्यासाठी प्रत्यक्ष विक्री सोडून इतर अनेक उपक्रम सातत्याने चालू ठेवायला हवेत. त्याकरिता समाजमाध्यमे आणि प्रभावी इलेक्ट्रॉनिक संपर्कमाध्यमे वापरायला हवी.

४. कोरोनाने लादलेल्या लॉकडाऊनच्या काळात दुकान बंद असले तरी विक्रीचे नवनवे मार्ग शोधत राहायला हवे. माझा आवडता बॉस संजीव आगा म्हणत असे, “फुकट विकायला शिका, पण फायदा मात्र व्हायला हवा.” (Learn to sell free, but profitably) सांगायचा मुद्दा असा की, कल्पक विक्रेत्याच्या भन्नाट योजनांना क्षितिज नसते, मर्यादा नसतात. जेव्हा विकणेच अवघड आहे अशा काळात विकणे हे खरे आव्हान आहे हे ध्यानात घ्या. त्यासाठी खालील मार्ग अनुसरता येतील.

- सर्वात महत्त्वाचे म्हणजे या काळात कॉस्टिंगमधले total costingचे तंत्र न वापरता marginal costingचे तंत्र वापरायला हवे, हे चाणाक्ष विक्रेता लगेच ओळखतो. जोवर तुम्ही marginal कॉस्टपेक्षा जास्त किमतीत विकत आहात तोपर्यंत किंमत आणि सवलत यांच्यामध्ये कल्पक रचना करत राहून विक्री वाढवा, हे या काळातले मार्गदर्शक तत्त्व असायला हवे. एकूणच व्यवसाय करायचे जे दोन मार्ग आहेत,

ते म्हणजे High Margin and Low Volume का Low Margin and High Volume यावर मुळातून विचार करायला हवा.

- दुसरा मुद्दा प्रत्यक्ष वितरणाचा आहे. दुकान बंद आहे मग ग्राहक येणार कसे? अशा वेळी पोस्ट, कुरिअर या मार्गाने पुस्तके घरपोच पोहोचवण्यासाठी नवनव्या योजना राबवायला हव्या. त्यासाठी मोफत उपलब्ध असणाऱ्या समाजमाध्यमांचा मुबलक वापर करायला हवा.
- तिसरा मार्ग मोठाल्या सोसायट्या किंवा सार्वजानिक जागी पोलिसयंत्रणांची परवानगी घेऊन आणि सुरक्षेचे सर्व नियम पाळून आणि काळजी घेऊन पुस्तके नेण्याचा आहे. लोकांना घराबाहेर किंवा आपल्या सोसायटीबाहेर पडता येत नसेल तर पुस्तके त्यांच्यापर्यंत नेता येतील का, याचा विचार करायला हवा.
- आपल्या नियमित ग्राहकांना विश्वासात घेऊन आज पैसे भरा आणि दुकान उघडताच नेहमीपेक्षा अधिक सवलतीने (पहिला marginal कॉस्टचा मुद्दा ध्यानात घेऊन) पुस्तके घेऊन जा याप्रकारच्या योजना राबवता येतील. त्यासाठी पुन्हा इलेक्ट्रॉनिक माध्यमे वापरता येतील. अशा योजना प्रकाशकांनादेखील आपल्या विक्रेत्यांबरोबर वापरता येतील.
- मुख्य म्हणजे प्रत्यक्ष विक्री कमी झालेल्या या काळात पुस्तके आणि वाचन याविषयी जागरूकता आणि कुतूहल निर्माण करण्याचे स्वस्त आणि प्रभावी प्रकल्प हाती घेणे गरजेचे आहे. पुस्तक या सुंदर गोष्टीविषयी प्रेम आणि कुतूहल निर्माण व्हावे म्हणून अभिनेते, खेळाडू, नेते आणि समाजमनावर प्रभाव असलेल्या व्यक्तींना हाताशी धरून हे काम जोमाने करायला हवे.
- या सर्व काळात खरे तर प्रत्यक्ष सरकारदेखील अनेक प्रकारे ग्रंथव्यवसायाला मदत करू शकेल. प्रत्येक सरकारात आणि राजकीय पक्षात अनेक ग्रंथप्रेमी असतातच. वाचनसंस्कृतीचे मोल जाणणारेही काहीजण असतात. फक्त या वाचनप्रेमाचे मतात रूपांतर होईल याची शाश्वती नसल्याने हा मुद्दा कधी

त्यांच्या पटलावर नसतो. ग्रंथव्यवसायातील चतुर लोकांनी हे काम चतुराईने करायला हवे आहे आणि तेही खरे तर अशक्य नाही. एकदा का वाचनसंस्कृती आणि मतदार यातले नाते स्पष्ट केले, की सरकार आणि राजकीय पक्ष अनेक प्रकारे आणि अनेकपट प्रभावी पद्धतीने हे काम करू शकतील. यात केवळ आर्थिक सवलतीच नव्हे तर जनजीवनात पुस्तकांना केंद्रस्थानाच्याजवळ आणणे अधिक महत्त्वाचे आहे. ते या माध्यमातून फार वेगाने होऊ शकेल. गमतीने म्हणायचे तर वाचनसंस्कृती वाढवण्यात सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात स्पर्धा लावून द्यायला हवी आहे. खरी गरज ती आहे!

सांगायचा मुद्दा असा की, काळ तर मोठा कठीण आला आहे, हे तर खरेच पण पुस्तकांवर पोसलेला माणूस अधिक टणक आणि सर्जनशील मनाने त्यावर मातदेखील करू शकतोच. मानवी इतिहासात हातपाय गाळून बसलेल्यांना स्थान असेलही पण ते अतिशय अल्प असेल आणि ‘अनंत अमुची ध्येयासक्ती’ म्हणत संकटांवर तुटून पडणाऱ्या धाडसी कर्मवीरांच्या कहाण्यांनी मात्र इतिहास भरलेला आहे. त्यात आणखी काही सोनेरी पाने लिहायची संधी आज मिळाली आहे. त्या संधीचे सोने करायला हवे. त्यासाठी कठोर आत्मपरीक्षण, व्यावसायिक पारदर्शकता आणि व्यवसायवृद्धीचे कल्पक आणि सर्जनशील मार्ग या त्रिसूत्रीचा वापर करायला हवा.

# पुस्तक-व्यवहारावर लॉकडाऊनचे परिणाम काही नकारात्मक, काही सकारात्मकही...

**प्रदीप चंपानेरकर**

संपादक व प्रकाशक
रोहन प्रकाशन, पुणे
pradeep.champanerkar@gmail.com

प्रत्येक व्यवसायाचा स्वतःचा एक पैस असतो व स्वतःची एक गती असते. त्याच्या फैलावाची, विस्ताराची व्याप्ती ठरलेली असते. कितीही प्रयत्न केले, कल्पकता लढवली तरी ठरावीक मर्यादांच्या फार पलीकडे जाता येत नाही. अर्थात, प्रत्येक क्षेत्राविषयी असं म्हणता येणार नाही. काही क्षेत्रांत प्रचंड वेगाने आणि संख्येने विस्तार होऊ शकतो. पण अशा क्षेत्रांचं आयुर्मानही अल्पजीवी असू शकतं. मात्र काही क्षेत्रांविषयी असं निश्चित म्हणता येईल की, त्यांच्या वाढीच्या, विस्ताराच्या गतीला, व्याप्तीला मर्यादा असतील; पण त्या व्यवसायाचं समाजाच्या दृष्टीनं अंगभूत असं महत्त्व असतं त्यामुळे ते क्षेत्र दीर्घायू ठरतं. अशांपैकीच एक क्षेत्र म्हणजे मराठी पुस्तक-प्रकाशन. अर्थात मी हे विधान वाङ्मयीन पुस्तकांविषयी करतो आहे. अधूनमधून होत असलेले चढ-उतार लक्षात घेतले तरी, मराठी पुस्तकांचा प्रसार नेहमीच तसा खूपच मर्यादित राहिला आहे, असं मान्य करावं लागेल.

इतर भारतीय भाषांतील पुस्तकांची स्थितीही काही वेगळी नाही. अर्थात यात काही भाषांमधील पुस्तकांचा अपवाद करावा लागेल. विशेषतः बंगाली आणि दक्षिणेकडील काही भाषांचा. दक्षिणेतील मल्याळम भाषेतील पुस्तकांचा व्यवहार तुलनेने खूपच मोठा आहे. मात्र, या व्यतिरिक्त इतर भाषांतील पुस्तकांच्या तुलनेने मराठी पुस्तक-व्यवहाराची स्थिती पुष्कळच बरी असावी. त्यामधला आणखी एक फरक म्हणजे प्रतिभावान मराठी लेखकांची परंपरा आणि लेखनातील वैविध्य. प्रतिभावान मराठी लेखकांनी आजवर कसदार लेखन केलं आहे, लेखनात विविध प्रयोग केले आहेत आणि उत्साही, जाणकार प्रकाशकांनी त्या लेखनाला साथ देत आजवर मोठ्या संख्येने पुस्तकं प्रकाशित केली आहेत. एवढंच नव्हे, तर मराठी पुस्तक-प्रकाशकांनी प्रयोगशील लेखकांना प्रोत्साहन दिलं आहे. त्याचप्रमाणे निर्मितिमूल्यांबाबतही ते प्रयोगशील राहिले आहेत. पुस्तकाच्या विषयानुरूप आकार, मांडणी, निर्मिती-दर्जा, त्याला कलात्मक जोड याबाबतीतही मराठी प्रकाशन व्यवसाय इतर प्रादेशिक भाषांतील पुस्तकांच्या तुलनेत उजवा ठरतो आहे. विचारपूर्वक राखलेली निर्मितिमूल्यं त्या लेखनाला उठाव देत असतात आणि पुस्तकप्रसारासाठी साहाय्यभूतही ठरत असतात, असा माझा अनुभव आहे. अशा वातावरणात काही मराठी पुस्तकविक्रेतेही कल्पकतेची जोड देत पुस्तकप्रसाराला हातभार लावत असतात. अशी सर्व पार्श्वभूमी, महाराष्ट्रातलं साक्षरतेचं वाढतं प्रमाण, प्रागतिक विचारधारेची परंपरा, उत्तम उद्योग-व्यापार, वातावरण, त्यामुळे जनतेचा उंचावत असलेला आर्थिक स्तर या सर्व गोष्टींची

बेरीज आणि एकंदर मराठी ग्रंथव्यवहार यांचं त्रैराशिक मांडलं तर कमालीचं व्यस्त प्रमाण असलेलं आढळेल. तुलनेने ग्रंथव्यवहार खूपच मर्यादित राहिला आहे.

एकूणातलं हे चित्र असलं तरी, मध्यंतरीचा कालखंड हा मराठी ग्रंथव्यवहारासाठी कमालीचा उत्साहवर्धक ठरला. १९८९ ते २०१३ या साधारण पंचवीस वर्षांत पुस्तक-विक्रीचा आलेख बहुतांश वेळा चढताच राहिला आहे. या सुगीच्या दिवसांना अनेक घटक कारणीभूत झाले असले तरी, १९८९च्या दरम्यान सुरू झालेल्या 'फिरत्या पुस्तक-प्रदर्शनां'नी पुस्तकांच्या व्यापक प्रसारासाठी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. मोठ्या शहरांबरोबर लहान शहरं, निमशहरी भाग, ग्रामीण भाग अशा महाराष्ट्राच्या विविध भागांत शिक्षणाचा प्रसार वाढला होता, माहिती-तंत्रज्ञानाचा प्रसार वाढला होता. माहितीसाठी तरुण पिढीची भूक वाढत होती, जनतेमध्ये जागरूकता वाढत होती. समाजातील मोठ्या घटकाकडे आर्थिक संपन्नता येत होती. त्यात ज्ञानाच्या दृष्टीने, माहितीच्या दृष्टीने, प्रगल्भतेच्या दृष्टीने इतर समाजघटकांच्या बरोबरीने राहण्याची जिद्द सर्वत्र वाढत होती. अशा काळात वर्षभर फिरत्या पुस्तक-प्रदर्शनांचा उगम झाला (याचं श्रेय अशा उपक्रमाचा पायंडा पाडणारे रघुवीर ढवळे यांना द्यावं लागेल). त्यामुळे समाजाच्या विविध स्तरातील वाचकांपर्यंत पुस्तकं पोहोचण्याची शक्यता वाढीला लागली. समाजात पुस्तकांविषयी जिज्ञासा निर्माण होत गेली. प्रदर्शनातील मांडणीमुळे विविध प्रकारची पुस्तकं नजरेसमोर येत असल्याने विविध प्रकारच्या पुस्तकांची ओळख होत राहते, पुस्तकांविषयी जागरूकता वाढीला लागते. त्यामुळेच मला असं वाटतं की, पुस्तक-प्रदर्शनं पुस्तक-प्रसाराच्या दृष्टीने महत्त्वाची आहेत.

मात्र, गेल्या आठ-दहा वर्षांत डिजिटल क्रांती होऊ घातली, अन्ड्रॉइड फोन, आय-फोन असे मोबाइल्स झपाट्याने लोकप्रिय झाले. सामान्यातली सामान्य जनता त्यात रमू लागली. पुस्तकं दुर्लक्षित होऊ लागली. त्यात भर पडली ती लागोपाठच्या दुष्काळांची; आणि प्रदर्शनांना ओहोटी लागायला सुरुवात झाली ती २०१३-२०१५च्या दरम्यान. अशा परिस्थितीत ८ नोव्हेंबर २०१६ रोजी नोटाबंदी जाहीर झाली. सर्व व्यवहार स्थगित झाले आणि सर्वत्र एक प्रकारचं नकारात्मक वातावरण निर्माण झालं. त्यात पुस्तक-प्रदर्शनं भरवणाऱ्यांना मोठा फटका बसला. याचे दूरगामी परिणाम होऊन पुस्तक-

प्रदर्शनं कायमचीच बंद पडली आणि याचा एकंदर परिणाम पुस्तकप्रसारावर निश्चितच झाला आहे.

अशा प्रतिकूल परिस्थितीतही मराठी लेखक-प्रकाशकांनी पुष्कळच धीर धरला. नेटाने ते मार्गक्रमण करत राहिले, त्यामुळे नोटाबंदीनंतर सहा-आठ महिन्यांत नवी पुस्तकं प्रकाशित होऊ लागली. वेळापत्रकं बिघडली आणि पुस्तक-प्रकाशनांचा वेगही थोडा कमी झाला खरा; परंतु पुस्तकांची एकंदर मागणी घटली होती हे वास्तव होतं.

ही सर्व पार्श्वभूमी विस्तृतपणे सांगण्याचं प्रयोजन असं की, लॉकडाऊनपूर्व काळापर्यंत मराठी पुस्तक-प्रकाशन व्यवसायाचं चित्र काय होतं, हे समजावं. नोटाबंदीनंतर निर्माण झालेल्या प्रतिकूल परिस्थितीतून हा व्यवसाय चिकाटीने उभारी घेऊ पाहत होता. झालेलं नुकसान मोठं होतं आणि त्याची भरपाई होईल असं काही वातावरण गेल्या तीन वर्षांत निर्माणही झालं नव्हतं, परंतु स्थिरतेकडे मार्गक्रमण सुरू होतं. अशाच वेळी कोरोना विषाणूचा जगभर प्रसार होत होता आणि फेब्रुवारी २०२० पर्यंत त्याने रुद्र अवतार धारण केला. भारतातही त्याचा शिरकाव झाला आणि मार्चच्या मध्यात त्याच्या तीव्रतेची झळ पोहोचायची चांगलीच लक्षणं दिसू लागली. महाराष्ट्रात लॉकडाऊन जाहीर झाला आणि त्यानंतर पाच दिवसांनी २३ मार्चला देशभरासाठी लॉकडाऊन अमलात आला. सर्व काही थांबलं आणि जवळजवळ सर्व जगच तेव्हा हा अनुभव घेत होतं. पुस्तक-व्यवसाय अर्थातच त्याला अपवाद नव्हता. महिना-दीड महिन्यांत सर्व व्यवहार पूर्वपदावर येण्यास सुरुवात होईल अशी एक वेडी आशा सर्वांना होती. परंतु अल्पावधीतच लक्षात येऊ लागलं की, कोरोनाविरोधातली लढाई मोठ्या काळाकरता चालू राहणार आहे आणि त्याचे दुष्परिणाम इतर व्यवसायांप्रमाणे मराठी प्रकाशनावरही होणार आहेत.

एक गोष्ट किंचितशी अनुकूल होती, तीही ‘बुडत्याला काडीचा आधार’ याच प्रकारची होती; पण होती एवढं खरं. ती म्हणजे लोकांना लॉकडाऊनच्या काळात मोकळा वेळ होता. त्यांतील निदान काही जणांना तरी मोकळा वेळ म्हणजे पुस्तकं वाचण्याची संधी वाटत होती. म्हणून मग ‘ई-बुक्स’साठी विचारणा होऊ लागली. तसंच १ जून २०२० पासून अगदी अंशतः लॉकडाऊन शिथिल करण्यात आला. प्रकाशन संस्थांची कार्यालयं हळूहळू अंशतः सुरू व्हायला लागली. तेव्हा ज्यांची वेबसाइट आहे आणि त्यावर थेट खरेदीची सोय आहे, अशांना पुस्तकांच्या ऑनलाइन मागण्या येऊ लागल्या. ॲमेझॉन, फ्लिपकार्ट, बुकगंगा आणि इतर ऑनलाइन स्टोअर्स

यांवरून लोक पुस्तकं मागवू लागले. एकंदर व्यवहाराच्या तुलनेत ही संख्या नगण्य वाटावी अशीच होती. मात्र, काहीतरी हालचाल होत होती, याचंच समाधान वाटत होतं. भविष्याविषयी अनिश्चितता वाटणाऱ्या कार्यालयातील सहकाऱ्यांनाही यातून काहीसा दिलासा मिळत होता. मात्र अडचण होती, ती पुस्तकं पोहोचविण्याची. पोस्ट खातं नीटपणे सुरू झालं नव्हतं. कुरियर कंपन्या अंशतःच सुरू होत्या, त्यातही बऱ्याच कुरियर कंपन्या बंद होत्या. काहींनी कुरियर स्वीकारलं परंतु ती ग्राहकांकडे पोचत नव्हती. काही परत येत होती, तर काही प्रचंड उशिरा पोचत होती. अशा वेळी सोशिकताच कामाला येणार होती. धीराने या परिस्थितीला तोंड देणं आलं. मुंगीच्या गतीने का होईना, पण हळूहळू व्यवहार वाढत आहेत. मात्र, लोकल ट्रेन्सच्या अभावी मुंबई अजूनही जवळजवळ बंदावस्थेत आहे. तिथे विक्रेत्यांनी दुकानं तर उघडली पण कर्मचारीवर्ग कसा येणार? आणि दूर राहणारा वाचक तरी कसा येणार? मुंबई-पुणे वगळता इतर बाहेरगावचे विक्रेतेही पुस्तकं घ्यायला धजत नाहीत. कारण अगदी दीड-दोन महिन्यांपूर्वीही वेगवेगळया शहरांत, गावांत लॉकडाऊन लागू होत होते, कन्टेनमेंट एरिया वाढत होते. त्यात सर्वसामान्य जनतेलाही आर्थिक विवंचना होत्या. काहींच्या नोकऱ्या गेल्या, काहींच्या पगारात कपात होत आहे, तर काहींना भविष्याबाबतची अनिश्चितता भेडसावत आहे. अशा परिस्थितीत पुस्तकं किती जण घेणार? अगदी ऑनलाइन उपलब्धता असली तरी!

काही प्रकाशकांशी संवाद साधला असता असं कळतं की, काही जणांचा व्यवसाय ऑक्टोबरपर्यंत ३०% होतो आहे, काहींचा ४०%, तर काहींचा ५०%पर्यंत पोचला आहे. परंतु त्यापलीकडे नाही. हे आकडे अर्थातच आधीच्या सहा-सात महिन्यांत झालेलं नुकसान भरून काढण्यासारखे खचितच नाहीत किंवा चालू ५०% व्यवहारातून खर्चही भरून निघत नाही. प्रदर्शनं बंद, विक्रेत्यांकडे वाचकांचा कमी झालेला ओघ आणि वाचनालयं बंद. ती आता सुरू असली, तरी त्यांच्याकडे ना मनुष्यबळ आहे, ना आर्थिक क्रयशक्ती. वाचनालयं बंद असल्याने सभासदांना मासिक वर्गणीही भरणं शक्य होत नाही किंवा बंद काळासाठी वर्गणी भरण्याचं औचित्यही कुणी बाळगणार नाही. लॉकडाऊनमुळे सरकारच्या ग्रॅन्ट्सही वाचनालयांपर्यंत पोहोचत नाही आहेत. त्यामुळे लायब्ररी खरेदी थांबलेली आहे. अशा सर्व गोष्टींचा पुस्तक-प्रकाशन व्यवसायावर खोलवर प्रतिकूल परिणाम झाला नाही, तरच नवल वाटावं.

अडचणींच्या अशा सर्व पार्श्वभूमीवर काही सकारात्मक गोष्टीही घडल्या आहेत, ज्या प्रकाशनविश्वासाठी दूरदृष्टीने अनुकूल ठराव्यात. वास्तविक असं म्हटलं पाहिजे की, प्रतिकूल परिस्थिती नेहमीच चांगल्या बदलांना भविष्यासाठी दरवाजे किलकिले करत असते. मात्र, त्यासाठी निराशा झटकून सतर्कतेने कार्यशील राहायला हवं. प्रकाशनविश्व नेहमीच चढ-उतारांना सामोरं जात आलं आहे. या वेळची लॉकडाऊन परिस्थिती मात्र, 'न भूतो' अशीच होती. या परिस्थितीत काही प्रकाशकांनी 'फेसबुक-लाइव्ह' कार्यक्रम मे महिन्याच्या सुरुवातीला सुरू केले. त्यात विविध लेखकांना ऑनलाइन भेटण्याची संधी वाचकांसाठी उपलब्ध करून दिली. त्याचप्रमाणे आपल्या पुस्तकांची ओळख करून देणारे 'पॉडकास्ट' समाजमाध्यमावर प्रसृत केले. लोकांनाही मोकळा वेळ होता. त्यांना हे उपक्रम दिलासा देणारे, वातावरणातील मळभ कमी करणारे वाटले असावेत. कारण 'फेसबुक-लाइव्ह' कार्यक्रमांना आणि 'पॉडकास्ट'सारख्या उपक्रमांना उत्साही प्रतिसाद मिळत गेला. सर्व काही बंद असताना लोक साहित्य-जगताशी जोडून राहू लागले. वातावरणात काही प्रमाणात का होईना, पण जिवंतपणा येत होता. अशा प्रतिसादामुळे इतर प्रकाशकांनीही याचं अनुकरण केलं आणि साहित्यविश्व, पुस्तकांचा कोपरा यांचं अस्तित्व टिकून राहिलं. याचा परिणाम 'ई-बुक्स'च्या मागणीमध्ये दिसून येऊ लागला. तेव्हा काही प्रकाशक, जे या डिजिटल माध्यमात आधीपासून कार्यशील होते त्यांना चांगला प्रतिसाद मिळू लागला. याची चाहूल लागताच, जे प्रकाशक 'ई-बुक्स 'मध्ये आधीपासून संथ गतीने का होईना, पण कार्यशील होते, त्यांनी त्यात पूर्ण लक्ष घातलं. वेळ होता, मागे इतर कामांचा ससेमिरा नव्हता, ऑनलाइन कामाची उपलब्धी होती, या परिस्थितीचा फायदा करून घेऊन 'ई-बुक्स' तयार करणं सुरू झालं. काही अप्रकाशित साहित्यही प्रथम 'ई-बुक्स' स्वरूपात पेश करण्यात आलं. वाचकांनीही 'ई-बुक्स'शी जवळीक करण्यात पुढाकार घेतला. त्याचप्रमाणे इतर वस्तूंप्रमाणे पुस्तकांच्या ऑनलाइन खरेदीलाही वाचक सामावून घेऊ लागले ही सवय पुढेही टिकून राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे जिथे मराठी पुस्तकांची उपलब्धता नाही अशा ठिकाणी पुस्तकं पोहोचण्याचं प्रमाण भविष्यात वाढावं.

पुस्तकविश्वापुरतं बोलायचं झालं आणि एकंदर परिस्थितीचा आढावा घ्यायचा म्हटलं तर, असं म्हणावं लागेल की, 'कोरोना आणि लॉकडाऊन'चे नकारात्मक आणि सकारात्मक दोन्ही परिणाम झाले आहेत. नकारात्मक

परिणाम कोणते? तर, गेल्या सहा-आठ महिन्यांत पुस्तकविक्रीवर मोठा परिणाम झाला आहे. कर्मचाऱ्यांचं वेतन, ऑफिस-खर्च हे कायम राहिले. त्यामुळे प्रकाशनसंस्थेच्या आकारमानाप्रमाणे दर महिन्याला झालेलं आणि होत असलेलं नुकसान काही लाखांतलं आहे. आधीच अडचणीत आलेल्या या व्यवसायाला अशा मोठ्या नुकसानाचा भार पेलणं कठीण आहे. भविष्यही फार उज्ज्वल आहे असं प्राप्त परिस्थितीवरून म्हणता येणार नाही. मात्र प्रयत्न करत राहणं, मार्गक्रमण करत राहणं हे क्रमप्राप्त आहे. दुसरं असं की, या सगळ्या परिस्थितीमुळे फेब्रुवारी-मार्च २०२०मध्ये प्रकाशित झालेली पुस्तकं प्रकाशकांच्या कार्यालयांत, विक्रेत्यांच्या दुकानांत बंदिस्त राहिली. या दीर्घ खंडानंतर वाचकांचं लक्ष या पुस्तकांकडे वेधणं कठीण आहे. ज्या पुस्तकांची कामं चालू होती, त्यांचं प्रकाशन रखडलं आहे. नव्या पुस्तकांना लगेच हात घालण्याबाबत प्रकाशक साशंकच राहणार, सावधता बाळगणार. एकंदरीत नव्या पुस्तकप्रकाशनांचा वेग मंदावणार, सर्व वेळापत्रकं बिघडणार. या परिस्थितीमुळे लेखकांचंही मोठं नुकसान होत आहे. नवी पुस्तकं प्रकाशित झाली तरी, त्यांच्या आवृत्त्या (प्रतींची संख्या) आक्रसल्या आहेत. काही प्रकाशक ४००/५०० प्रतींच्या आवृत्तीवर उतरले आहेत. याचा प्रतिकूल परिणाम प्रकाशन व्यवसायाशी थेटरीत्या संलग्न असलेल्या अक्षरजुळणी, मुद्रितशोधन, मुद्रण या सेवा देणाऱ्यांवरही होत आहे. त्याचप्रमाणे मुखपृष्ठ, रेखाचित्र साकारणाऱ्या चित्रकारांवरही होत आहे. काही हस्तलिखितं प्रकाशनाची दीर्घ काळ वाट पाहिल्यानंतरही लेखकांना परत केली जात आहेत. हे सर्व वास्तवही होतकरू लेखकांच्या उत्साहावर प्रतिकूल परिणाम करणारं ठरू शकेल.

आता या लॉकडाऊनच्या सकारात्मक परिणामांच्या बाजूकडे पाहायचं म्हटलं तर प्रथम असं म्हणावं लागेल की, प्रकाशक-लेखकांना जुन्या वाटेवरचं मार्गक्रमण चालू ठेवताना नव्या डिजिटल व्यवहाराची कास धरण्याचं महत्त्व लॉकडाऊनच्या काळात पटलं असावं. किमान त्या बाजूने प्रयत्न करणं बहुतेकांना क्रमप्राप्त झालं आहे. पुस्तकांच्या प्रसारासाठी समाजमाध्यमांचा वापर कल्पकतेने करायला हवा, याचंही भान त्यांना आलं आहे. काही समविचारी प्रकाशक एकत्र आल्यास एकंदर पुस्तक-व्यवहाराला चालना मिळू शकेल, असं चित्रही डोळ्यासमोर येत आहे. पुस्तकांकडे वाचकवर्गाचं लक्ष वेधून घेण्याच्या दृष्टीने तसंच पुस्तकविक्रेत्यांना आलेली मरगळ जाऊन उत्साहवर्धक वातावरण निर्माण व्हावं, तुटलेलं वळण पुन्हा लागावं या दृष्टीने

संपादकीय

दहा नामवंत प्रकाशक एकत्र आले आहेत. या वाचन-जागर अभियानात निवडक पुस्तकं वाचकांना सवलतीत उपलब्ध होणार आहेत. यापुढेही या अभियानात काही उपक्रम राबवले जाणार आहेत.

पुस्तकांची ऑनलाइन विक्री होत आहे, वाढत आहे, ही गोष्ट निश्चितच चांगली आहे. परंतु पुस्तकांच्या दुकानांचं अस्तित्व टिकायला हवं. त्याचप्रमाणे करोनाची भीती एकदा सरली की, ग्रंथप्रदर्शनंही सुरू व्हावीत. या दोन्ही गोष्टींचा परिणाम वाचक अधिक प्रमाणात पुस्तकांशी जोडला जाण्यात होणार आहे. ऑनलाइन खरेदीत सोय आहे, ज्या ठिकाणी मराठी पुस्तकांची दुकानं नाहीत त्या ठिकाणी पुस्तकं निश्चितच पोहोचतात. परंतु त्यामुळे ग्रंथप्रसाराला मर्यादाही येतात. वेगळी पुस्तकं नजरेत येत नाहीत, हाताळली जाऊ शकत नाहीत.

कोरोना विषाणूचा सर्वत्र फैलाव, त्यामुळे लॉकडाऊन, त्यामुळे सर्व व्यवहार स्थगित. अशा या परिस्थितीचे दुष्परिणाम अर्थातच ग्रंथव्यवहारावर झाले आणि होणार. परंतु या पूर्वीच्या संकटकाळी प्रकाशन व्यवसाय गाफील राहिला का? नव्या तंत्रज्ञानाशी जोडून घेण्यात हयगय केली गेली का? असे प्रश्न मनात आल्याशिवाय राहत नाहीत. आताची प्रतिकूल परिस्थिती ही संधी मानून नेटाने काम करावे लागेल. भविष्याचा वेध घेणं अपरिहार्य आहे. वर उल्लेखलेल्या सकारात्मक बाजूंची पुढेही चिकाटीने कास धरली तर ग्रंथव्यवहारातल्या लेखक, प्रकाशक, विक्रेते व वाचक अशा सर्वच घटकांसाठी आश्वासक वातावरण भविष्यात निर्माण होईल.


# पुस्तक परीक्षण

संभाषित

# ब्लॉगच्या आरशापल्याड :
# समकालाला थेटपणे भिडणाऱ्या कथा

**सुजाता औटी**

व्याख्याता
के.सी.कनिष्ठ महाविद्यालय, मुंबई
sujatarane31may@gmail.com




(परीक्षित पुस्तक : ब्लॉगच्या आरशापल्याड, लेखक : मनस्विनी लता रवीन्द्र, प्रकाशक : शब्द पब्लिकेशन, दुसरी आवृत्ती : जानेवारी २०१७, पृष्ठे : १३६, मूल्य : रु. २००)

मनस्विनी लता रवीन्द्र हे नाव प्रायोगिक रंगभूमीवरील अभिव्यक्तीच्या नव्या वाटा धुंडाळणाऱ्या नाटककार, मालिकांच्या पटकथा-संवादलेखिका म्हणून सुपरिचित आहे. २०११ ते २०१४ या कालावधीत विविध दिवाळी अंक व नियतकालिक यांमधून प्रकाशित झालेल्या त्यांच्या बारा कथा *ब्लॉगच्या आरशापल्याड* या कथासंग्रहातून वाचकांच्या भेटीला येतात. *ब्लॉगच्या आरशापल्याड* हा त्यांचा पहिलाच कथासंग्रह. प्रामुख्याने तरुण पात्रे आणि त्यांच्याशी संबंधित कालावकाशात घडणाऱ्या या कथा आजच्या तरुणाईचे मनोगत आणि त्यांच्यासमोरील अस्तित्वविषयक विविध पेच प्रकट करताना दिसतात. विजय तेंडुलकर, जयंत पवार यांच्यानंतर मराठीमधील आणखी एका महत्त्वाच्या नाटककाराला कथनात्म साहित्यात अभिव्यक्त व्हावेसे वाटणे हा योगायोग निश्चितच नाही. समकालाला थेटपणे भिडण्यासाठी, वरवर भूतकाळाची मोडणी स्वीकारणाऱ्या परंतु वर्तमानाला सन्मुख असणाऱ्या लघुकथेसारख्या साहित्यप्रकाराची निवड लेखिकेने अत्यंत जाणतेपणाने केली आहे.

बदलते स्त्री-पुरुषसंबंध, महानगरी जीवनातील माणसाचे एकटेपण, माध्यमांचे महाजाल, पुरुषसत्ताकव्यवस्था-जातिव्यवस्था-विवाहसंस्था यांच्या योगे सूक्ष्म आणि अधिकाधिक छुपा होत जाणारा सत्तासंघर्ष; आर्थिक-राजकीय-सामाजिक क्षेत्रांतील भोवंडून टाकणारे वेगवान बदल आणि यात सहभागी होण्याची अपरिहार्यता वा सक्ती; या सर्वांमध्ये संवेदनशील व्यक्तीची होणारी कुचंबणा हे या कथासंग्रहाचे प्रधान आशयसूत्र आहे असे म्हणता येईल.

आजच्या बाजारव्यवस्थेत भुलवणारी, उत्तेजित करणारी, संभ्रमित करणारी, भयाकुल करणारी नानाविध संभाषिते माध्यमक्रांतीमुळे अत्यंत वेगाने माणसावर आदळत आहेत. या भूलभुलैयात सापडलेली विविध पात्रे या कथांमधून येतात. अशा परिस्थितीत होणारी मनाची दोलायमान अवस्था प्रकट करण्यासाठी लेखिकेने स्वप्नदृश्ये आणि संज्ञाप्रवाह या अभिव्यक्तितंत्रांचा उपयोग केला आहे.

बारा कथांपैकी नऊ कथांमध्ये कथांतर्गत पात्रमुखी निवेदनतंत्राचा अवलंब करून लेखिकेने व्यक्तिमनातील विविध आंदोलनांचा वेध पात्रांच्या माध्यमातून घेण्याचा प्रयत्न केला आहे. बऱ्याच कथांमधील पात्रांचा उल्लेख विशेषनामाऐवजी सर्वनामाने करण्यामधून वाचनानुभवाला कलात्मक अलिप्ततेचे परिमाण देतानाच कथेची अवाजवी सुगमता टाळली आहे.

प्रस्तुत कथासंग्रहात चित्रित झालेली पुरुषपात्रे व स्त्रीपात्रे यांचे स्वभावविशेष व समाजव्यवस्थेतील त्यांचे स्थान, व्यवस्थेने त्यांच्याकडून ठेवलेल्या अपेक्षा, त्यांना ते देत असलेले प्रतिसाद वा प्रतिक्रिया यातूनही स्त्री-पुरुष या द्वंद्वामागील सत्ताकारण, राजकारण लेखिकेने कधी सुप्तपणे तर कधी उघडपणे दाखवून दिले आहे. 'हातात सुकाणू घेऊन भुर्रर्र' या कथेमध्ये सुरुवातीला मुक्त पत्रकारिता करणारे, तोट्यात जाणारा प्रिंटिंगप्रेस आणि साहित्यविषयक नियतकालिक नेटाने चालवणारे काका पुढे आडनावाच्या बळावर यशस्वी वृत्तपत्राचे संपादक होतात आणि विविध शासकीय समित्यांमध्येही वर्णी लावून घेतात. असे एकीकडे स्वार्थासाठी व्यवस्थेचा उपयोग करून घेण्याची मानसिकता असणारे पुरुषपात्र येते तर दुसरीकडे 'माझ्या जन्माची गोष्ट' या कथेत शेवटी बाळाच्या जन्माच्या वेळी गैरहजर असण्याची परंपरा मोडणारा बाबा; असे परंपरा मोडणारे पुरुषपात्र तीन पिढ्यांचा इतिहास असणाऱ्या कथानकात येते.

लेखिकेने पात्रांसाठी निवडलेल्या कृतीही लक्षात घेण्याजोग्या आहेत. ‘बाईकबिना हिरो’ या कथेत आपल्या बहिणीच्या बॉयफ्रेंडला मारणाऱ्या, धमकावणाऱ्या संस्कृतिसंरक्षक पुरुषपात्रांच्या कृती पुनरावृत्त होताना दिसतात.

‘आणि तो नायक ठरला’ कथेच्या शेवटी पांढरपांडेच्या मुलीने आईचा हात धरून त्याच्या होर्डिंगकडे पाठ करून दूर दूर चालत जाण्याची केलेली कृती - त्यांनी घेतलेल्या अर्थपूर्ण निर्णयाची दिशा सूचित करते. ‘ओझ्याविना’ आणि ‘ब्लॉगच्या आरशापल्याड’ या कथांमधून शिक्षण अथवा नोकरीनिमित्त, कुटुंबापासून दूर नव्या शहरात राहण्याचा निर्णय घेणाऱ्या स्त्रीपात्रांची योजना आहे. एका कथालेखिकेचे लेखन यादृष्टीने विचारात घेतल्यास संदर्भित पात्र स्त्री असो वा पुरुष, कथेमधील विविध दृष्टिकोनांचा अंतिम लेखकीय न्याय अत्यंत स्पष्टपणे स्त्रीकेंद्री आहे.

मनस्विनी लता रवीन्द्र यांच्या कथा अनेक अर्थांनी राजकीय आहेत. उदाहरणार्थ, ‘हातात सुकाणू घेऊन भूर्ररर’, ‘आणि तो नायक ठरला’, ‘ओझ्याविना’, काळ्याकुट्ट वेळी’ या कथांमधून पुरुषसत्ता, वर्णवर्चस्व, जातिभेद, सार्वजनिक जीवनातील ढोंग यांचे अत्यंत उघड संदर्भ येतात. व्यक्ती आणि व्यवस्था यांच्यातील ताण आणि पात्रांनी घेतलेले निर्णय या सर्वांमधून लेखिकेची सुस्पष्ट अशी राजकीय निवड दिसते. या कथांमधून लेखिका विविध द्वंद्वांना सामोरी जात आहे. मराठी साहित्यपरंपरा आणि मराठीतील कथावाङ्मय यांना सन्मुख होताना आशय आणि अभिव्यक्ती, भाषाशैली, पात्रचित्रण यासंदर्भात घेतलेल्या निर्णयांच्या माध्यमातून साहित्यप्रकाराच्या नव्या शक्यतांचा धांडोळा घेतला आहे. सभोवतालच्या वास्तवाने उभ्या केलेल्या आव्हानाला लेखक म्हणून सामोरे जात असताना फॅन्टसी, स्वप्नदृश्ये, संज्ञाप्रवाह, व्यक्तिमनातील विचारशृंखला यांसारख्या अभिव्यक्तितंत्रांच्या इतकेच नव्हे तर पॉप्युलर हिंदी सिनेमाच्या (त्यातील डायलॉग, अतार्किक योगायोग, लोकप्रिय नायक-नायिका, सर्वसामान्य माणसांच्या मनातील त्यांच्याबद्दलचे सुप्त आकर्षण इत्यादी सूत्रांच्या) साहाय्याने या वास्तवाला कल्पिताचा शह दिल्याचे जाणवते.

१९९० नंतरच्या बदलत्या वास्तवाचा वेध घेताना जुन्या मध्यमवर्गाचे वेगवेगळ्या पातळ्यांवर होणारे स्थित्यंतर (त्याने घेतलेल्या विविध निर्णयांच्या संदर्भात) कथांमध्ये आनुषंगिकरीत्या आले आहे. या कथा घटनाप्रधान नसून पात्रप्रधान आहेत. कथेच्या मर्यादित कालावकाशात त्यांच्यात विचारांच्या पातळीवर बदल होताना दिसतो

पात्रांच्या आजूबाजूचे बदलते जग दर्शवताना कथेचा सेंद्रिय भाग म्हणून हे बदल येतात. या कथासंग्रहात कथांतर्गत आणि कथाबाह्य अशा दोन्ही प्रकारच्या कथनशैलीचा अत्यंत प्रभावी वापर केला आहे. विविध घटना प्रसंगांमधून पार पडल्यानंतर या कथांमधील मध्यवर्ती पात्रांना माणसांविषयी आणि व्यवस्थेविषयी होणारे साक्षात्कार लेखिकेने स्वप्नदृश्ये आणि संज्ञाप्रवाह या दोन तंत्रांमधून चित्रित केले आहेत. या चित्रांमध्ये लेखकीय दृष्टिकोनाचा आणि आणि लेखककृत भाष्यांचा होणारा शिरकाव सहज स्वाभाविक वाटणाऱ्या भाषिक रूपांमधून समोर येतो. उदाहरणार्थ -

"...असंच सगळ्यांना वाटतं. आपणच चालवतोय बोट आणि आपणच याचे सूत्रधार...पण नाही बोट कुणीतरी दुसराच चालवत असतो आणि तो दुसराही ठरलेला असतो... त्याचा रंग, त्याचा वर्ण, त्याचं लिंग सगळं ठरलेलं आहे... वाटेत येणारे पडाव आणि संकटंही ठरलेली आहेत... व्हिडिओगेमसारखी, एक लेव्हल पार केली की दुसरी लेव्हल... आणि ती पार नाही केली तर परत पहिल्यापासून खेळणे ... आपण आपले नियम लावू शकत नाही... नियमही ठरलेले... बलवान असेल तोच तगेल, जिंकेल... डार्विनचा सिद्धांत, बाकीच्यांनी मरून जावं... नामशेष व्हावं... तुम्ही बलवान नाही आणि आम्ही तुम्हाला बलवान होऊही देणार नाही... आम्हीच जगू... आम्हीच जिंकू." ('हातात सुकाणू घेऊन भुर्रर', पृ. ४०)

समाजातील विविध व्यवस्था आणि त्यापासून लाभान्वित होऊ पाहणारे संधीसाधू लोक, पारंपरिक मूल्यांच्या ओझ्याखाली जगणारी माणसे, कलाविषयक-जीवनविषयक भाबड्या कल्पना, तरुणाईचे मागच्या पिढीबरोबरचे मतभेद, ढोंगी माणसांचा किंवा व्यवस्थेचा दंभस्फोट ही सूत्रे अत्यंत टोकदारपणे काही भारित वाक्यांमधून फ्लॅश होताना दिसतात. उदाहरणार्थ, "मेलोड्रॅमॅटिक फिल्म मधले सीन्स बघून वाढलेल्या पिढीला जसं आलंकारिक बोलणं अकृत्रिम वाटतं तसंच आहे हे." ('आणि तो नायक ठरला', पृ. ४५) किंवा "साड्यापैंजणजोडवीकुंकूमंगळसूत्र घालून झोपणाऱ्या स्त्रिया होत्या." ('ओझ्याविना', पृ. ६०)

या कथासंग्रहात प्रवासाचा बंधही लेखिकेने वेधकरीत्या योजला आहे. एका ठिकाणाकडून दुसऱ्या ठिकाणाकडे, गावाकडून शहराकडे, एका देशापासून दुसऱ्या देशापर्यंत असा हा बाह्य पातळीवरील प्रवास आहे त्याचप्रमाणे पात्रांच्या विचारांत, आकलनात झालेले स्थित्यंतर असा आंतरिक पातळीवरीलही आहे.

जगण्याच्या अपरिहार्यतेतून माणसांना करावे लागणारे स्थलांतर, त्यांचे होणारे विस्थापन यांनाही सामावून घेऊन कथा व्यक्तीच्या या भोवतालाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनावरच भर देताना दिसत आहेत. उदाहरणार्थ, 'मळक्या पायांची मुलगी', 'माझ्या जन्माची गोष्ट', 'बाईकबिना हिरो' आदी कथा. जागतिक पटावर धर्म, देश, वंश, लिंग यांच्या आडव्यातिडव्या ताण्याबाण्यांमुळे या स्थलांतरितांचे/ विस्थापितांचे आयडेंटिटी क्रायसिस सोडवण्यासाठी ती पात्रे कशी धडपडत आहेत हे कॅमेराने जसे झूम, लाँग शॉर्ट, पॅनोरमा अशा विविध अँगलने तपशीलवार दाखवावे तसे दाखवले आहे.

इंटरनेट, लॅपटॉप, मोबाईल या साधनांमुळे आणि व्हाट्सअॅप, फेसबुक इत्यादी आभासी प्लॅटफॉर्म्समुळे संवाद- संपर्काची जलदता हे आजच्या काळाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. समकालीन तरुणाईचं प्रतिनिधित्व करणारी या कथासंग्रहातील पात्रे 'वसुधैव कुटुम्बकम्' या मूल्याने परस्परांशी जोडले जाण्यासाठी, अनुभवांच्या अभिव्यक्तीसाठी या आभासी अवकाशांचा वरचेवर वापर करताना दिसतात. नव्वदोत्तर काळात भारतीय समाजात घडून आलेली प्रसारमाध्यमक्रांती- टीव्हीची चौकट, संगणकाची चौकट, मोबाईलची चौकट यांपैकी कुठल्यातरी चौकटीत समाजाला अडकवून ठेवत आहे. प्राप्त परिस्थितीत मानसिक स्वसंरक्षणयंत्रणा म्हणून पात्रे या आभासी जगाचा सहजपणे अंगीकारही करताना दिसतात. प्रस्तुत कथासंग्रहातील संवेदनशील तरुणाई काही ठिकाणी या चौकटींच्याही पलीकडे जाऊन वास्तवाला भिडत आहे.

या कथासंग्रहातही ब्लॉगरच्या भूमिकेतूनच जणू प्रत्येक कथेतील महत्त्वाच्या पात्राची योजना केली आहे. एखादी व्यक्ती, घटना-प्रसंग, अनुभव यांविषयी 'मला' काय वाटतं अशा व्यक्तिसापेक्ष अभिव्यक्तीला महत्त्व देणाऱ्या 'ब्लॉग' या डिजिटल प्लॅटफॉर्मवरील आधुनिक काळातील, आभासी जगातील अभिव्यक्तिप्रकाराचा वापर उल्लेखनीय ठरतो. 'ब्लॉगच्या आरश्यापल्याड' या शीर्षककथेने या कथासंग्रहाचा शेवट होतो. भोवताल, त्यातील घडामोडी यांपासून ते आपल्या अंतर्मनातील घडामोडी यांचे सूक्ष्म निरीक्षण करून कथासंग्रहात आफ्रिकी-अमेरिकन ब्लॉगर आदालिया ऑस्टिनच्या आपण 'अस्तित्वात' आहोत याचे समाधान मानणाऱ्या कवितेच्या ओळी देऊन लेखिका शेवटच्या कथेची सांगता करते. आदालिया ऑस्टिनसोबत जुळलेली आपली नाळ लेखिकेने अतिशय कलात्मकतेने या शेवटच्या कथेत उलगडून दाखवली आहे. जगभरातील निर्मितीक्षम व्यक्तींच्या

व्यक्त होण्याच्या संवेदना एकाच प्रतलावर स्थिर होऊ शकतात याचा प्रत्यय ही कथा देते. कथेच्या शेवटी नव्या घराच्या खिडकीतून येणारा मोकळा वारा हा जणू नव्या चौकटीकडे मोकळ्या अपेक्षेने सामोरे जाणे सुचवतो.


ब्लॉगची चौकट आणि आरशाची चौकट या दोन्ही अंतर्बाह्य झगझगीत दर्शन घडवणाऱ्या चौकटींना मोडून त्याच्याही पलीकडून नवनिर्मितीच्या आविष्काराची लेखिकेला असलेली ओढ कथासंग्रहातून व्यक्त होत राहते. मराठी कथालेखनाच्या कक्षा विस्तारणारी, विशेषत: महानगरी तरुण पिढीचे प्रतिनिधित्व करणारी आजची कथा मनस्विनी लता रवींद्र यांच्या *ब्लॉगच्या आरशापल्याड* या कथासंग्रहातून वाचकांच्या भेटीला येते.

संशोधन

# थेरीगाथा-स्त्रीमुक्ती, समाज आणि तत्त्वज्ञान: स्त्रीमुक्तीच्या प्राचीन तत्त्वज्ञानाचे उत्खनन

**सोमनाथ कदम**

साहाय्यक प्राध्यापक
इतिहास विभाग
कणकवली महाविद्यालय, कणकवली, जि. सिंधुदुर्ग
kadamsomnath78@gmail.com




(परीक्षित पुस्तक : थेरीगाथा - स्त्रीमुक्ती, समाज आणि तत्त्वज्ञान, लेखक : सुनील हेतकर, प्रकाशक: सुगावा प्रकाशन,पुणे, २०१७, पृष्ठे : १९२, मूल्य : रु. २००)

भारतीय समाजात आणि जगभरात स्त्री-पुरुष विषमता खोलवर रुजलेली आहे. त्याचे पडसाद आजही सामाजिक, धार्मिक पातळीवर अनेक संदर्भाने उमटताना दिसतात. पारंपरिक मानसिकता आणि धर्मव्यवस्थेच्या जाचक रूढींखाली स्त्रियांना जगावे लागते. अशा रूढी-परंपरा व मानसिकता नाकारणे, जीवनात सम्यक विचार व सम्यक आचार यांची सांगड घातली जाणे ही काळाची गरज आहे. त्यादृष्टीने बुद्धतत्त्वज्ञान दिशादर्शक ठरू शकते. बुद्धकालीन थेरींनी बुद्धतत्त्वज्ञानाची काव्यरूपात केलेली मांडणी स्त्रीमुक्तीच्या विचारांची होती. समाजचौकटीने लादलेल्या स्त्रीभावापासून स्वत:ला मुक्त करणाऱ्या थेरींचे अडीच हजार वर्षांपूर्वीचे हे विचार *थेरीगाथा* म्हणून प्रसिद्ध आहेत. *थेरीगाथे*चे हे स्वरूप व स्त्रीमुक्तीचा विचार पुढे यावा या मूलहेतूने लेखक सुनील हेतकर यांनी *थेरीगाथा: स्त्रीमुक्ती, समाज आणि तत्त्वज्ञान* या ग्रंथाची निर्मिती केलेली आहे.

संभाषित

*त्रिपिटक* या बुद्धतत्त्वज्ञानाच्या तात्त्विक ग्रंथमालेतील एक ग्रंथ म्हणजे *थेरीगाथा* होय. *सुत्तपिटक, विनयपिटक* आणि *अभिधम्मपिटक* या तीन पिटकांपैकी *सुत्तपिटका*तील ग्रंथ अन्य पाच गटांत विभागलेले आहेत. त्यात *दीघ निकाय, मज्झिम निकाय, अंगुत्तर निकाय, संयुक्त निकाय* आणि *खुद्दक निकाय* यांचा समावेश होतो. *खुद्दक निकाया*तील एकूण १५ उपसंग्रहांपैकी नवव्या संग्रहात *थेरीगाथां*चा समावेश आहे आणि तेराव्या उपसंग्रहात (*अपदान*) थेरींच्या जीवनगाथांचा समावेश आहे. थेर म्हणजे वयाने जाणता, अनुभवी, ज्ञानसंपन्न असा भिक्षू, ज्याने प्रव्रज्जा घेऊन स्वप्रयत्नाने अर्हतपद मिळवले आहे आणि थेरी म्हणजे अनुभवी व ज्ञानी भिक्षुणी जी प्रव्रज्जा घेऊन स्वतःच्या साधनेच्या बळावर अर्हत बनलेली आहे. अशा या अनुभवसंपन्न भिक्षुणींनी लिहिलेली कविता म्हणजे *थेरीगाथा* आणि भिक्खूंनी लिहिलेल्या कविता म्हणजे *थेरगाथा* होत.

*थेरगाथा* आणि *थेरीगाथा* यांच्यावर भाष्यपर लेखन मराठी भाषेत अत्यल्प आहे. अशावेळी सुनील हेतकर यांचा *थेरीगाथा: स्त्रीमुक्ती, समाज आणि तत्त्वज्ञान'* हा संदर्भमूल्य असणारा भाष्यग्रंथ विशेष महत्त्वाचा आहे. सुनील हेतकर हे मूलत: कवी असले तरी त्यांचे सामाजिक, धार्मिक, वाङ्मयीन आणि चळवळींच्या पातळीवरील चिंतन वाखाणण्यासारखे आहे. बौद्धधर्म आणि तत्त्वज्ञान हा त्यांच्या अभ्यासाचा आणि चिंतनाचा विषय आहे. *थेरीगाथा* या ग्रंथाच्या माध्यमातून काहीसा जटिल आणि तत्त्वज्ञानावरचा भाग सुनील हेतकरांनी साध्या, सोप्या भाषेत मांडलेला आहे.

गौतम बुद्धांचा धम्मविचार माणसाच्या दुःखामागील मूळ कारणांचा, प्रवृत्तीचा शोध घेणारा आणि दुःखाला मानवी जीवनातून हद्दपार करणारा आहे. बुद्धविचारात समाजातील स्त्री-पुरुषांच्या सम्यक व्यक्तिमत्त्वाला महत्त्व आहेच, पण तो विचार सामाजिक बांधिलकी व बंधुत्वाशी निगडित आहे. बुद्धकालीन समाजातील निरनिराळ्या जनसमूहातील थेरींनी या धम्माच्या आधारे स्वत:चे उन्नयन कसे घडवून आणले याचा वेध सुनील हेतकर यांनी घेतलेला आहे. थेरींनी व्यक्त केलेला जीवनानुभव आणि त्यातील तत्त्वज्ञानाची सांगोपांग चर्चा करण्यात ते यशस्वी झालेले आहेत.

*थेरीगाथे*चे आकलन आणि तत्त्वज्ञान मांडताना प्रस्तुत ग्रंथात लेखकाने दोन भाग केले आहेत. पहिल्या भागात थेरीगाथेचा इतिहास आणि गौतम बुद्धांचा स्त्रीविचार, बौद्धवाङ्मयातील माराचे स्थान व थेरींच्या संघर्षाची चिकित्सा, थेरीगाथेतून अभिव्यक्त होणारे दुःख आणि दुःखनिरोध तसेच

थेरीगाथेतून व्यक्त होणारे स्त्रीजीवनाचे दर्शन असे विषय चर्चिले आहेत. दुसऱ्या भागात स्त्रीमुक्ती चळवळीला स्त्रीसंतांच्या कृतिउक्तींचे योगदान कितपत आहे याची थेरींच्या तुलनेत मांडणी केली आहे. तसेच आधुनिक स्त्रीवादी चळवळ आणि थेरीगाथा यांच्यातील अनुबंध स्पष्ट करत त्यावरही लेखकाने भाष्य केले आहे.

'थेरीगाथांचा इतिहास व गौतम बुद्धांचा स्त्रीविचार' या पहिल्या प्रकरणात थेरींच्या गाथांची निर्मितिप्रक्रिया उलगडून दाखवल्याने त्याद्वारे मानवमुक्ती व स्त्रीमुक्तीचा विचार सर्वप्रथम मांडणाऱ्या या थेरीगाथेचे महत्त्व अधोरेखित होत जाते. यासंदर्भात लेखकाने 'बौद्धधर्म हा धर्म आणि नीती यांची सुरेख सांगड घालून देणारा, धर्मतत्त्वांना व्यावहारिक रूप देणारा, उदारमतवादी व अर्वाचीन शास्त्रीय कसोटीस पूर्णपणे उतरणारा असा हा पहिलाच धर्म आहे...' (हेतकर २०१७ : २९), असे वा. गो. आपटे यांचे मतही नोंदवले आहे.

या थेरी एकमेकींना भगिनी समजत व स्वतःस बुद्धाच्या कन्या मानत असत. 'थेर व थेरी हे पद बुद्धाच्या धम्माचा प्रचार आणि प्रसार करणाऱ्या संघातील विशेष भिक्षू व भिक्षुणींना प्राप्त होई. जी भिक्षुणी दहा वर्षं सातत्याने नियमित नेमधर्म निष्कलंक पाळत होती, त्या भिक्षुणीला थेरी हे बहुमानाचे पद प्राप्त होई' (हेतकर २०१७ :३२). या सर्व थेरी भिन्नभिन्न सामाजिक वर्गांमधून आलेल्या होत्या. काही सधन कुटुंबांतून, राजघराण्यांतून, उच्च समजल्या जाणाऱ्या कुळांतून आलेल्या तर काही अगदी सामान्य पार्श्वभूमी असणाऱ्या, गरीब कुटुंबांमधून, खालच्या समजल्या जाणाऱ्या कुळांतून आलेल्या होत्या. तथागत बुद्धांनी स्त्रियांना संघात प्रवेश दिल्यानंतर पुरुषांच्या संघाबरोबर स्त्रीसंघदेखील हळूहळू वाढला. या थेरींनी बुद्ध तत्त्वज्ञानाच्या आधारे मानसिक विकास घडवून आणला व वस्तुनिष्ठ पद्धतीने आपला जीवनानुभव काव्यातून व्यक्त केला. हा काव्यमय जीवनानुभव म्हणजेच गाथा आहेत.

'बौद्धधर्मात माराचे स्थान व थेरी यांचा संघर्ष' हे या ग्रंथातील दुसरे प्रकरण आहे. बौद्ध वाङ्मयात मनाला विशेष महत्त्व आहे. मनात निर्माण होणाऱ्या अकुशल विचारांचे 'मार' या प्रतिमेच्या स्वरूपात देहीकरण करण्यात आले आहे. वास्तविक मार ही कोणी व्यक्ती नसून ती एक अकुशल विचारांचे प्रतिनिधित्व करणारी मानसिक प्रवृत्ती आहे. थेरी या मारासोबत संघर्ष करत मनातील अकुशल विचारांवर मात करतात. मारासोबतचे हे युद्ध म्हणजे कुशल-अकुशल विचारांचा संघर्ष असल्याचे विवेचन सुनील हेतकर

करतात. या मनसंगरात विजयी ठरलेल्या थेरींच्या काव्यरचना व त्यांच्या संक्षिप्त कहाण्या या विभागात आलेल्या आहेत.

सदाचाराच्या समर्थक असणाऱ्या या थेरींच्या साधनामार्गात मार रूढी, परंपरा, अंधश्रद्धा यांचा आधार घेत अनेक अडथळे आणण्याचा प्रयत्न करतो. मात्र कोणत्याही परिस्थितीत थेरी स्वत:चा वैचारिक गोंधळ होऊ देत नाहीत. उलट बुद्धविचारांच्या अधिष्ठानावर माराला खंबीर उत्तर देत त्याला बलहीन करतात. मारासोबतच्या नाट्यपूर्ण संवादांचे चित्रण करत हेतकर यांनी थेरींना निर्भयतेकडे नेणारा हा बुद्धविचार स्त्रीमुक्तीचा आणि मानवमुक्तीचा असल्याचे ठळकपणे समोर आणले आहे.

थेरीगाथेतून व्यक्त होणारे दु:ख व दु:खनिरोधाची चिकित्सा करताना तथागत बुद्धांनी दाखवलेला दु:खक्षालनाचा मार्ग कोणता, याचे सोदाहरण विवेचन केले आहे. पुत्रवियोगाचे दु:ख आळवणारी किसा गौतमी, संसारातील मृत्यूसाखळीच्या दु:खाने वेडीपिशी झालेली पटाचारा अशा अनेक थेरींच्या व्यथा व बुद्धांच्या उपदेशाच्या चिंतनाने त्यांचा झालेला दु:खनिरोध याविषयीच्या कहाण्या अंतर्मुख करणाऱ्या आहेत. उदाहरणार्थ, पटाचारा म्हणते -

पादे पक्खालयित्वान,उदकेसु करोमहं।
पादोदकञ्च दिस्वान, थलतो निन्नमागतं।।

मी माझी पावले पाण्यात धुतली, पावलांवरून ओघळलेले पाणी वरून खाली वाहत आले. (तत्रैव, पृ. ८४). त्याचा मथितार्थ असा की पटाचाराने आपल्या पायावर पाणी ओतले. ते पाणी काही अंतरापर्यंत गेले. तिने दुसऱ्यांदा पाणी ओतले ते पाणी त्याहून अधिक अंतरापर्यंत गेले, तिसऱ्यांदा पाणी ओतले तेव्हा ते पाणी पावलापर्यंत येऊन पोहोचले. या क्रियेचा संबंध तिने मृत्यूशी जोडला. मृत्यूच्या बाबतीतही असेच असते याचा उलगडा पटाचाराला झाला. काही माणसे अल्पवयात मरतात, काही मध्यम वयात तर काही काही अंतिम वयात (वार्धक्याने) मरतात. मृत्यू हा अनिवार्य आहे, असे तिचे मत बनते. अशाप्रकारे तथागत बुद्धाचा मार्ग हा व्यावहारिक दु:खमुक्तीचा होता म्हणून थेरींनी त्यांच्या मार्गदात्यांच्या विचारांशी संग करून आचारधर्माने आपले स्त्रीजीवन सार्थक केलेले दिसते.

उब्बिरी, सोना, मुक्ता, अड्डकाशी व पुर्णिका, ऋषीदासी, बोधी, शुभा, नंदा, सुमेधा अशा काही थेरींच्या दु:खव्याप्त जीवनाचे चित्रणही येथे घडवले आहे. थेरी उब्बिरी मुलीच्या मृत्यूमुळे दु:खी होते. सोणा वार्धक्याने जर्जर होऊन,

सत्ता आणि संपत्तीचे वाटप मुलांमध्ये केल्यावर मुलांनी तिच्याकडे केलेल्या दुर्लक्षामुळे प्रव्रज्जा घेते. अड्डकाशी अतिसंपत्तीमुळे संपत्तीचा तिरस्कार करायला लागते. अशा या सर्व थेरींच्या गाथा दु:खदर्शन घडवणाऱ्या प्रव्रज्जा धारण केल्यानंतर बदललेल्या आयुष्याविषयी बोलणाऱ्या, बदललेल्या जीवनदृष्टीविषयीच्या आहेत. जीवनाचे अनित्यरूप लक्षात आल्यावर या थेरी बुद्धांनी सांगितलेल्या धम्मपथाच्या आधारे दु:खविमुक्त होत निब्बाण पदास पोहोचताना दिसतात.

स्त्रीमुक्ती चळवळीला स्त्रीसंतांचे योगदान कोणते आणि कसे राहिले आहे याचा धांडोळा पाचव्या प्रकरणात घेतला आहे. आधुनिक काळातील स्त्रीवादी चळवळीच्या भारतीय परंपरेतल्या मूळ स्त्रोतांचा असा शोध घेत असताना जोतिराव फुले यांची शिष्या मुक्ता साळवेंचा उल्लेख यायलाच हवा होता, असे वाटत राहते. कारण मुक्ता ही महाराष्ट्रातील नव्हे तर भारतातील पहिली बहिष्कृत विद्यार्थिनी, निबंधकार असून तिने धर्मव्यवस्थेला सामाजिक व धार्मिक हक्क मागताना 'आमचा धर्म कोणता?' (कदम २०१९ : १६) हा मूलभूत प्रश्न विचारला होता आणि व्यवस्थेविरोधात सक्षमपणे बंडखोरी केली होती.

आज भारतातील स्त्रीमुक्तीच्या विचारधारेचा प्रवास बुद्ध ते आंबेडकरांच्या मानवतेच्या अंगाने पुढे सरकताना दिसला तरी सामाजिक स्तरावर स्त्रीशोषणासंदर्भात आमूलाग्र परिवर्तनाची गरज संपलेली नाहीच. विषमताधिष्ठित मूल्यांचा पुरस्कार करत समाज बुरसटलेल्या प्रथांचे व परंपरांचे जोखड वागवत आहे. त्यामुळे स्त्रियांच्या गुलामीची पाळेमुळे उखडली जात नाहीत. या सामाजिक वास्तवाची दखल घेत सुनील हेतकर बुद्ध विचारांकडे समाजमानसिकता बदलण्यासाठी प्रभावी पर्याय म्हणून पाहतात, असे लक्षात येते. पारंपरिक मानसिकता बदलण्याची आवश्यकता नमूद करून तथागत बुद्धांचा धम्म हा सत्याचा आणि प्रज्ञायुक्त धर्म आहे. त्यामुळे या विचारधारेचे भान स्त्रीवर्गाला येईल आणि भारतात खरा स्त्रीवाद रुजेल हा त्यांचा आशावाद महत्त्वाचा वाटतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे म्हणाले होते की, 'स्त्रीचा उद्धार केवळ बाह्य परिवेशातील बदलाने, भौतिक संपन्नतेने होणार नाही तर तो मानसिक विकासातूनच होईल.' (मून १९९८ : ५७) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या विचारांचा व एकूण धम्मविषयक विचारांचा प्रभाव या ग्रंथावर जाणवतो.

अंतिमत: भारतीय स्त्रीच्या दुःखमुक्तीची, व्यवस्थापरिवर्तनाची चळवळ समजून घेण्यासाठी *थेरीगाथा - स्त्रीमुक्ती, समाज आणि तत्त्वज्ञान* हा ग्रंथ महत्त्वाचा टप्पा आहे, असे नोंदवावेसे वाटते. सुप्रसिद्ध सुगावा (पुणे) प्रकाशनाने हा ग्रंथ प्रकाशित केला आहे. वाचकांना, अभ्यासकांना स्त्रीमुक्तीच्या नव्या दिशा समजून घेण्यासाठी दिशादर्शक ठरेल असा हा मूल्ययुक्त ग्रंथ सर्वांनी आवर्जून वाचला पाहिजे.

**संदर्भ**

१. कदम, डॉ. सोमनाथ (२०२०) : मुक्ता साळवे जीवन आणि चरित्र, संवाद प्रकाशन, कोल्हापूर.

२. मून, वसंत (१९९८) : डॉ. बाबासाहेब आंबेडकर, नॅशनल बुक ट्रस्ट, नवी दिल्ली.

३. हेतकर, सुनील (२०१७) : थेरीगाथा - स्त्रीमुक्ती, समाज आणि तत्त्वज्ञान, सुगावा प्रकाशन, पुणे.

संभाषित

# बंजर धरती के बीज : मुक्ती आणि सामर्थ्याची दिशा ठरवणारी कविता

**अरविंद सुरवाडे**

लेखक व समीक्षक

satdhamma@gmail.com

# समीक्षा




(परीक्षित पुस्तक : बंजर धरती के बीज (कवितासंग्रह), कवी : असंगघोष, प्रकाशक : रश्मि प्रकाशन, लखनौ, २०१९, पृष्ठे : १०४, मूल्य: रु. १५०)

आंबेडकरी प्रेरणेचे जे काही साहित्य हिंदीमध्ये लिहिले जात आहे ते अजूनही ‘दलित’ याच संकल्पनेच्या परिघात गुरफटलेले आहे. ‘आंबेडकरवादी’ ही संकल्पना अजूनही हिंदीत फारशी रूळलेली नाही. डॉ. तेजसिंह यांच्यासारख्या साहित्यिकांनी ‘आंबेडकरवादी साहित्य’ ही संकल्पना रुजवण्याचा प्रयत्न केला, तो हळूहळू का होईना पण रुजतोय हे महत्त्वाचे आहे. आंबेडकरी प्रेरणेच्या हिंदी साहित्यिकांची नवी पिढी ही मागील शतकाच्या नव्वदीपासून लक्षणीय ठरत आहे. ही पिढी मागील पिढ्यांपेक्षा अनेक बाबींनी भिन्न आहे. यातील अनेक जणांना सामाजिक, राजकीय चळवळींची पार्श्वभूमी आहे. त्या चळवळीचे फायदेसुद्धा त्यांना मिळालेले आहेत. जातिव्यवस्थेच्या पारंपरिक क्रौर्याची आणि आताचा लढा हा शारीरिकतेबरोबरच मानसिकसुद्धा असल्याची त्यांना जाणीव आहे. जातिव्यवस्थेच्या क्रौर्याच्या स्मृतींनी त्यांच्या अंतर्मनात तसेच समाजमनात कायमचे घर केलेले आहे. पोथीनिष्ठांना पडद्याआड पाठवून वर्चस्वाचे नवनवीन चेहरे रंगमंचावर अवतरू लागलेले आहेत. नवे शोषणतंत्र अगोदरच प्रादेशिक

स्तरावरून राष्ट्रीय स्तरापर्यंत पोहोचलेले आहे. आता त्याचे स्वरूप वैश्विक होऊ पाहत आहे. उत्तर भारतात जमीनदारांची जागा कायम ठेवत नवे राजकीय सरंजामदार आणि माफियांचा उदय झालेला आहे. समाजपरिवर्तनाच्या चळवळीत शिथिलता आलेली आहे. त्याजागी नव्या जातीयवादी संघटना आकार घेऊ लागलेल्या आहेत. साधनविहीनतेमुळे, आर्थिक संसाधनांच्या कमतरतेमुळे, अनेक अस्मितावादी संघटना उग्र रूप धारण करू लागलेल्या आहेत. नव्या शक्यता या एखाद्या 'व्हिजन'ने परीचालित न होता 'टार्गेट'ने संचालित होऊ लागल्या. समाजवादी, हिंदुत्ववादी, मार्क्सवादी विचारधारांच्या परिघात राहून अस्मितावादी संघटना फोफावण्याचा हाच काळ आहे. उत्तर भारतात ब्राह्मो-मार्क्सवादाला शत्रुत्वाच्या ठायी पाहण्याची वृत्तीही (राजकीय) दलित कार्यकर्ते आणि लेखकांमध्ये याच काळात विशेषत्वाने रुजलेली आहे. देशभरात मानवाधिकारांसाठीच्या लढ्याला गती मिळालेली असली तरी अस्मितावादी आग्रहांमुळे त्याची वैश्विकता खंडित झालेली आहे. सांस्कृतिक अस्मितांची आकांक्षा आणि कार्यपद्धती समजून घेण्यात मार्क्सवादी, समाजवादी आणि एकूणच पुरोगामी विचारवंत, कार्यकर्ते केवळ चुकलेच नाहीत तर त्यांनी याकडे किंचित उपहासानेच बघण्याचे धोरण अवलंबले आहे. परिणामतः दोघांमधील दरी ही हिंदीतच नव्हे तर सर्वच भाषिक समूहांमध्ये तसेच सर्व भाषिक लेखकांमध्ये अधिकच रुंदावलेली आहे.

या पार्श्वभूमीवर समकालीन हिंदी आंबेडकरी प्रेरणेची कविता, साहित्य आणि सामाजिक चळवळ समजून घेण्यासाठी असंगघोष यांची कविता अतिशय महत्त्वपूर्ण आहे. आंबेडकरी प्रेरणेच्या हिंदी कवितेतील पहिल्या पिढीच्या कवितेत विलाप आणि आक्रंदनाचा जो तीव्र स्वर दृष्टीस पडत होता, तो नव्वदनंतरच्या पिढीतील कवितेत कमी झाल्याचे दिसते. *बंजर धरती के बीज* या संग्रहातील कवितासुद्धा विलाप आणि आक्रोश, आकांत यापासून खूप पुढे जात विद्रोह आणि नवनिर्माणाकडे वाटचाल करणारी आहे. या संग्रहातील पहिलीच कविता 'समय का तकजा' या कवितेत कवी शत्रूंवर चाल करून जाण्यापेक्षा शत्रूने आखलेले षड्यंत्र ओळखून स्वतः संघटित होण्याचे आव्हान अधिक महत्त्वपूर्ण असल्याचे सांगतो. शोषक शक्तीला कमजोर करण्याच्या भानगडीत पडण्यापेक्षा स्वतःला संघटित आणि मजबूत करण्यावर भर देतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संघटित होण्याचा जो मंत्र सामान्य जनतेला दिलेला आहे त्याची एक प्रकारे कवी आठवण करून देतो.

‘संगठीत हो जाओ
ताकी तुम्हारे संगठीत होने के भय से
थरथराकर काँपते
कटे पेड़ की तरह धारशाही होते उन्हें
तुम देख सको.’ (पृ. ११)

स्वातंत्र्यानंतर भारतातील दलित, शोषित, पीडित जनतेत आधुनिक शिक्षणामुळे स्वत्वाची जाणीव निर्माण झाली. बाबासाहेब आंबेडकरांच्या ‘शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा’ या नाऱ्यामुळे समाजात चेतना निर्माण झाली. त्यामुळे इथला पारंपरिक जात्यांध समाज भयग्रस्त झाला आणि होत आहे. कवीच्याच शब्दात सांगायचे झाल्यास-

‘भयग्रस्त हैं वे
वे वाकई ग्रस्त है भय से
उन्हे अपने खूँखार हिन्दुत्व के
बिखर जाने का जबरदस्त भय है
भय है उन्हें
कि वे अल्पसंख्यक हो जाएंगे......’ (पृ. १५)

वंचित समाजाला समता या संवैधानिक तत्त्वापासून भरकटवण्याचे एक मोठे षड्यंत्र समरसता या नावाने गेल्या काही वर्षांपासून आखलेले दिसत आहे. समरसता या शब्दामागील राजकारणही कवी उघडे पाडतो.

‘हमारी समता की माँग के सामने
तुम्हारे धर्मग्रंथ, और
तुम्हारा धर्म अडिग खड़ा है,
समता से विमुख हो
तुम समानता की नहीं
समरसतामूलक समाज की बातें करते हो
हम सब जानते हैं
क्या है यह समरसतामूलक समाज!
वही ना
जो जहाँ है!
जैसा है!!
वैसा ही चतुर्वणों में बँटा रह

हिन्दुत्व का पैरोकार हो
आपस में मिलजुलकर रहे!!!' ( पृ. २२)

असंगघोष यांच्या या संग्रहातील कवितांचे वैशिष्ट्य म्हणजे या कविता वर्तमानाची घट्ट सोबत करणाऱ्या असून त्यांची नजर ही भविष्याकडे रोखलेली आहे. शोषकतत्त्वांची नेमकी ओळख आणि त्यांच्या विरुद्ध अविरत संघर्ष करण्याची लढाऊ वृत्ती निर्माण करण्याचे काम असंगघोष यांची कविता करताना दिसते.

कवीची सामाजिक संवेदनशीलता आणि सत्याच्या प्रती असलेली बांधिलकी प्रस्तुत संग्रहातील प्रत्येक कवितेमधून दृष्टीस पडते. परिवर्तनाचे साधन म्हणून कवी असंगघोष आपल्या कवितेचा शस्त्रासारखा वापर करतात.

शिवनाथ चौधरी 'आलम' यांनी अतिशय समर्पक शब्दात असंगघोष यांच्या कवितेचे मर्म उलगडून दाखवलेले आहे. ते म्हणतात - "यह व्यक्तिगत पीड़ा नहीं है कि सूरज की सारी धूप से इजारेदारी करके चेतना के बीज को अंकुरित होने से रोका गया है लेकिन क्या सूरज की किरणों की वास्तव में हदबंदी या घेराबंदी की जा सकती है? जिन्होंने ऐसी कोशिश की, वे विराट सच को नहीं देख सके। उनके द्वारा थोपी गयी वर्जनाओं और रचे गये झंझावातों को झेलकर भी बीज इसी शोषण की धरती में अंकुरित हो, पुष्पित और पल्लवित हो, फल देने लगा है। यह सदियों से कुचली हुई अस्मिता का सतत संघर्ष है कि अपने हिस्से की धूप वर्चस्ववादियों से वापस छीन लेने में उसने सफलता पायी है। कवि असंगघोष इसकी सम्मिलित सुरक्षा का आव्हान करते हैं" (चौधरी २०१९: ७).

सामाजिक समता, बंधुत्व आणि न्याय ही संवैधानिक मूल्ये अजूनही म्हणावी तशी या भूमीत रुजलेली दिसत नाहीत. एका अर्थाने ही वैश्विक मूल्ये रुजण्यासाठी ही धरती, ही भारतभूमी अजूनही बंजर, नापीकच असल्याचे वारंवार सिद्ध झालेले असताना कवीला मात्र आज नाही तर उद्या या बंजर जमिनीत एकतेचे, समतेचे, बंधुत्वाचे, न्यायाचे, मानवी मुक्तीचे आणि आत्मसन्मानाचे बीज अंकुरेल हा एक अदम्य विश्वास आहे. हा विश्वास खालील शब्दांमधून कवीने व्यक्त केलेला आहे-

'मैंने
इस बंजर धरती में
एक बीज बो दिया है
इसे मेरे खून-पसीने की

नमी पा
तुझसे अपने हिस्से की
धूप छीन
अंकुरना है,
तुम्हारे रचे हुए
सारे झंझावातों को झेल
पल्लवित और पुष्पित होना है
फिर झरना है
हज़ार-हज़ार बीजा।' (पृ.८९)

आणि म्हणूनच असंगघोष यांच्या या प्रस्तुत कवितासंग्रहातील कविता ही केवळ वेदना आणि आक्रोश व्यक्त करणारी कविता नसून ती माणसांच्या मुक्तीची आणि सामर्थ्याची दिशा ठरवणारी कविता आहे, असे म्हणता येते.

**संदर्भ**


१. असंगघोष (२०१९) : *बंजर धरती के गीत,* रश्मि प्रकाशन, लखनौ.

२. चौधरी, शिवनाथ (२०१९) : 'आमुख', *बंजर धरती के गीत*, असंगघोष (कवी), रश्मि प्रकाशन, लखनौ.

# आदरांजली

# शाहिरीचा झंजावात - शाहीर अमरशेख

**प्रकाश खांडगे**

समन्वयक, शाहीर अमरशेख अध्यासन
माजी प्राध्यापक व प्रमुख, लोककला अकादमी
मुंबई विद्यापीठ.
prakash.khandge@gmail.com

संग्रामित



साम्यवादी विचारसरणीचा मोठा प्रभाव असणाऱ्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, शाहीर गव्हाणकर आणि शाहीर अमरशेख यांनी लालबावटा कलापथकाद्वारे वर्गविग्रहाचे तत्त्वज्ञान मांडले. भारतीय स्वातंत्र्याच्या संग्रामातील, गोवा मुक्तिसंग्रामातील आणि संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील त्यांचे योगदान मोलाचे होते. शेतकरी आणि कामगार यांची वंचना, उपेक्षा आणि शोषण यांविरुद्ध सातत्याने आवाज उठविण्याचे काम या शाहिरांनी केले. बार्शीचे महबूब हुसेन पटेल म्हणजेच शाहीर अमरशेख. अमरशेख म्हणजे क्रांतिकारक शाहिरीचे जणू जनक! शाहीर अमरशेख कवी होते, गीतकार होते, पोवाडेकार होते आणि गात्या गळ्याचे बुलंद आवाजाचे शाहीर होते. त्यांचे काव्य हे सर्वसामान्यांच्या अस्मितेचा हुंकार होते. त्यांच्या काव्यातील, पोवाड्यातील शब्दांची जातकुळी संत तुकारामाच्या अभंगांच्या जातकुळीशी अगदी मिळतीजुळती होती. राष्ट्रप्रेमाचा उद्घोष करताना, तसेच अन्यायाविरुद्ध लढताना त्यांच्या शब्दांचा अंगार व्हायचा. अमरशेखांनी गायलेल्या एका गीतातूनच त्याची कल्पना येते.

“बर्फ पेटला हिमालयावर विझवायाला चला चला
फक्त रक्त द्या, वृद्ध तरुण या द्या रे साद हाकेला॥
घडु नये ते आजला घडते
स्वातंत्र्याचे बाळ रांगते
स्वतंत्र विहराया धावते
बंधू चिनी सुरा घेउनी काळ होउनी आला –
रक्ताचे खत मिळता थोडे
सीमेवरची झुडपे झाडे

देशरक्षण्या बनतील वेडे
तृणपर्णांना मिळेल शक्ती -
तेच रोखतील हल्ला
रक्त हिमगिरीवर चढू द्या
जनसागर सीमेला भिडू द्या
शिरकमले अग्नीत पडू द्या

शाहीर अमरशेखांवर आचार्य डॉ. माधवराव पोतदार यांनी *अमरशेखांची कविता, तांबडं फुटलं, अमरशेख व्यक्ती आणि वाङ्मय, संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यातील शाहिरांचे योगदान, अमरशेखांच्या कवितेतील तत्त्वचिंतन, मानवतेचा अमरदीप* अशी पुस्तके लिहिली आहेत. *मानवतेचा अमरदीप* या शाहीर अमरशेखांवरील ग्रंथात आचार्य डॉ. माधवराव पोतदार यांनी अमरशेखांच्या शाहिरीची समीक्षा करताना म्हटले आहे – "मानवता कलंकित करणाऱ्या करंट्यांच्या विरोधात आग ओकणारा व खराखुरा ज्वालाग्रही बनणारा असा हा कवी होता. मराठीतल्या असंख्य कवींपेक्षा प्रकृतीने आणि कृतीने पूर्ण वेगळा असलेला. 'आग ओकणे मजला प्यार' म्हणणारा. वाईट तेवढे जाळणारा पण चांगले तेवढे मात्र ठेवणारा असा हा कवी धुरंधर. रसरसलेल्या क्रांतीचा, परिवर्तनाच्या भुकेचा आणि भव्यदिव्य काही घडावे या अभिलाषेचा. मानवशत्रूंचा कर्दनकाळ वाटावा अशा प्रकृतीचा असूनही तो लोकजागृतीकार शाहीर होता. मानवतेचा ग्रास घेऊ पाहणाऱ्यांविरुद्ध हिमतीने उभा राहून डफावर थाप देऊन लोकांत चेतना निर्माण करणारा आणि लोकमत घडवणारा हा शाहीर वेगळ्याच प्रकृतीचा होता. इतर शाहीर इतिहासाचा वेध घेऊन प्रबोधन करीत होते, पण अमरशेख प्रबोधनाबरोबरच नवा इतिहासही निर्माण करीत होता, मानवतेची काळजी वाहत होता आणि मानवतेच्याच स्वप्नात दंग आणि धुंद होत होता. त्याचा कडाडणारा डफ हा मानवतेच्या भल्यासाठीच नेहमी कडकडत राहिला आहे. त्यामागे अमरभाईच्या हृदयाची तडफड होती."

शाहीर अमरशेख यांच्या संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील मंतरलेल्या दिवसांची आठवण सांगताना कॉम्रेड रोझा देशपांडे यांनी *गर्जा महाराष्ट्र माझा* या शाहीर अमरशेख अध्यासन, लोककला अकादमी, मुंबई विद्यापीठ यांनी प्रकाशित केलेल्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत म्हटले आहे –

"अमरशेखांचे व्यक्तिमत्त्व, त्यांचा पहाडी आवाज व त्या आवाजातील कणखरपणा व मार्दव यांचे मिश्रण असे की त्यांच्या आवाजाशिवाय सभा सुरू

होऊच शकत नव्हती. आतापावेतो कम्युनिस्ट पक्षाच्या सभेच्या सुरुवातीस गाणे म्हणणाऱ्या शाहीर अमरशेखांशिवाय समितीची सभा सुरू होऊ शकत नव्हती. शाहीर अमरशेख उभे राहिले की, 'मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे' ही घोषणा सभेतील जनता करीत असे. डॉ. सुधीर फडके यांचे –

जनतेच्या सत्तेची ज्योत जागती।
गर्जा संयुक्त महाराष्ट्र भारती।।

हे सभेच्या सुरुवातीचे काव्य म्हणजे घनघोर लढाईची गर्जना असे. तर अमर शेखांचे-

हिंदी संघराज्याच्या आत्म्या घेई प्रणाम।
पराधीन जगताच्या नेत्या घेई प्रणाम।।

असे त्यांच्या बुलंद आवाजातले गाणे किंवा गाणी लोक मंत्रमुग्ध होऊन ऐकत. तर कधी

रात्र आहे वैऱ्याची, जागा रहा जागा रहा।

हे गाणे गिरणभागातील तरुणांना खरोखरच गस्त घालण्याची स्फूर्ती देई. गाण्यातूनदेखील हे शाहीर जनतेला मार्गदर्शन करीत होते.

कामगार-शेतकऱ्यांच्या एकजुटीचे अमरशेखांचे गाणे फारच लोकप्रिय झाले होते –

शेतकऱ्यांनो या रे, घ्या एकीची हाती मशाल।
कामगार या सारे उधळा वरती रक्त गुलाल।।

अमरशेखांचे हे गाणे संयुक्त महाराष्ट्राबद्दल आहे.

जय महाराष्ट्र संयुक्त महाराष्ट्राच्या गाऊ गाना।
गाऊ उंचावुनी माना। घेऊ तानावर ताना।।

पुढे मराठी भाषा, महाराष्ट्राची भौगोलिक घडण, इतिहास सांगत ते केवळ संयुक्त महाराष्ट्र मागत नाहीत तर,

स्वातंत्र्य शांतता स्थापू। अवघे जग त्याने व्यापू।
फडकवू ध्वज समानतेचा । पर्वा न जिवाची करता।...

हे उत्तुंग ध्येय संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीमध्ये अंतर्भूत असल्याची ते ग्वाही देतात." रोझा देशपांडे पुढे लिहितात, " आम्ही दिल्लीच्या सत्याग्रहास गेलो. महाराष्ट्रातून हजारो लोक या सत्याग्रहात सामील झाले होते. सत्याग्रहींची संख्या एवढी प्रचंड होती की सत्याग्रह, अटक, सुटका याचे गणित तिथेच अनुत्तरित राहिले. शाहीर अमरशेख हातात डफ घेऊन गात होते. अमरशेखांनी दिल्लीकरांची झोप उडवली. भाषा समजो वा न समजो, सारे

दिल्लीकर दुतर्फा उभे राहून अमरशेखांना उत्तेजन देत होते, टाळया वाजवत होते. त्यांचा उत्साह पाहण्यासारखा होता. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीला दिल्लीकरांची ही मानवंदनाच होती.'' सुप्रसिद्ध प्रकाशक आणि अमरशेखांचे मित्र वामनराव भट त्यांना 'बहुजनांचा बालगंधर्व' म्हणत.

अमरशेखांच्या काव्यात एका बाजूला जसा कणखरपणा होता, तशीच मृदुताही होती. कवी यशवंत, बालकवी यांचेच काव्य असावे असा समज निर्माण करणारे त्यांनी केलेले बार्शीच्या पुष्पावती नदीचे आणि पुष्पावतीच्या काठाचे वर्णन नितांत सुंदर आहे.

अमरशेखांनी *धरतीमाता, कलश, अमरशेखांचे पोवाडे* ही पुस्तके तर *पहिला बळी* हे नाटक अशी साहित्यसंपदा निर्माण केली. *समाजवादी शिवाजी* हा त्यांचा पोवाडा त्यांच्या क्रांतिकारक सामाजिक दृष्टीचे भान देणारा आहे

*कलश* या अमरशेखांच्या काव्यसंग्रहाला प्रस्तावना देताना आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांनी त्यांची प्रशंसा केली. आचार्य अत्रे लिहितात - ''अमरशेख हे कवी आहेत हे सांगण्याची जरुरी नाही. त्यांना पाहिले की, ते कवीच असले पाहिजेत ह्याची अगदी खात्री होते. अष्टौप्रहर त्यांच्या डोक्यात अन् डोळयांत काव्याची धुंदी चढलेली असते. त्यांना 'शुद्धी' वर मी कधी पाहिलेच नाही. एखाद्या कारखान्याच्या धुरांड्यातून धूर अन् ठिणग्या यांचा लोट जसा उफाळत असतो, त्याप्रमाणे काव्याचा अंगार सदैव त्यांच्या शरीरातून आणि वृत्तींमधून धुमसत असतो.

स्वत:च्या काव्याबद्दलही त्यांनी तेच सांगितले आहे.

होय, तोच आहे अंगार
आग ओकणे मजला प्यार
बाग आगीची फुलवावी
सर्व चांगले ठेवावे
सगळे वाईट जाळावे
आता नाही हा मरणार
जीवन प्यालेला अंगार
येईल काळ कराया वार
वारावरती करीन वार
होय तोच आहे अंगार
नाही तो आता विझणार!

आचार्य अत्रे म्हणतात त्याप्रमाणे अमरशेख यांच्या शब्दाशब्दांत सोव्हिएत क्रांतीचा उद्गाता मायकोव्हस्की याच्या काव्यातील स्फोट आणि गडगडाट ऐकू येतो. 'त्यांची एकेक ओळ म्हणजे बंदुकीची फैर आहे. तोफेच्या तोंडातून बाहेर पडणाऱ्या लाल रसरशीत गोळयासारखे त्यांचे जळजळीत शब्द एकामागून एक बाहेर पडत असतात. मग ते गाणे मातृभूमीच्या अभिमानाचे असो, नाहीतर साम्राज्यवाद्यांना दिलेल्या आव्हानाचे असो. आपल्या लढाऊ बाण्याचा त्यांना कधीही विसर पडत नाही."

अमरशेखांना दोन कन्या. एक ज्येष्ठ कवयित्री मल्लिका अमरशेख आणि दुसऱ्या प्रेरणा बर्वे. नामदेव ढसाळ आणि अनिल बर्वे हे त्यांचे जावई. मल्लिका अमरशेख यांनीही मुलाखतीत आपल्या वडिलांच्या आठवणी जाग्या केल्या आहेत. त्या म्हणतात "महाराष्ट्रातून अनेक ठिकाणी भाईंचे खेडोपाडी कार्यक्रम व्हायचे. लोक त्यांचा कार्यक्रम पाहायला आवर्जून यायचे. जर माईक बंद पडला, तर शेवटच्या माणसापर्यंत विदाउट माईक त्यांचा आवाज पोहोचायचा, इतका पहाडी आवाज असायचा. कार्यक्रम सुरू असताना मध्यंतर झाल्यानंतर ते डफ फिरवायचे. त्या डफात लोक ५ रु., १०रु., ५०रु. जे काही असेल ते टाकायचे. तो डफ पूर्ण भरून जायचा आणि तो भरलेला डफ आयोजकांच्या समोर नेऊन द्यायचे आणि म्हणायचे की "तुमच्या शाळेला हा निधी, याच लोकांकडून आलेला, तेवढा तो घ्या आणि माझा डफ मला परत द्या." ते रियाज कसा करायचे, तर दऱ्याखोऱ्यात जाऊन मोठमोठ्याने उंच स्वरात गाणी म्हणायचे आणि त्यामुळे त्यांचा आवाज खूप तयार होत गेला. कऱ्हाडकरांनी त्यांना कम्युनिस्ट पक्षाच्या विचारसरणीची संथा दिली. कोल्हापूरच्या मंडळींनी माझ्या वडिलांना अमरशेख हे नाव दिलं आणि ते कायम झालं. त्यांना असं वाटायचं की हा तळागाळातला लाखोंचा समाज आहे, त्यांचे जे प्रश्न आहेत याच्यासाठी मी कम्युनिस्ट पार्टीत काम करीत आहे. आणि या तळागाळातल्या लोकांसाठी मला गाणं म्हणायचं आहे. त्यांचं प्रबोधन करायचं आहे. त्यांच्यासाठी मी आहे आणि हे फिल्ममध्ये राहून साध्य होणार नाही तर याच्यासाठी मला त्यांच्यापर्यंतच गेलं पाहिजे. त्यांनी समाधान आणि लोकांच्या प्रेमाशिवाय काही मिळवलं नाही, पण त्यांनी जे मिळवलं ते पिढ्यानपिढ्या पुरेल असं आहे. आणि मला नेहमीच अभिमान वाटतो की मी इतक्या मोठ्या आणि समर्थ माणसाची मुलगी आहे."

कला ही जीवनापासून वेगळी करता येत नाही आणि जगणं सतत कलात्मक असेलच असे नाही. संघर्ष हा मानवी जीवनाचा; त्यातल्या

त्यात कष्टकरी समाजाच्या जीवनाचा अविभाज्य भाग असतो, हे विचारसूत्र स्वीकारून तसेच मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचा स्वीकार करून अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्यातून जगण्यातील संघर्षाचा आणि वर्गविग्रहाच्या तत्त्वज्ञानाचा आलेख मांडला. शाहीर अमरशेख, अण्णा भाऊ साठे आणि गवाणकर ही त्रिमूर्ती म्हणजे महाराष्ट्राच्या कष्टकऱ्यांच्या अस्मितेचा हुंकार होती, हेच खरे!

# लेखक परिचय

**साधना शिलेदार**

साधना शिलेदार वसंतराव नाईक शासकीय कला व समाज विज्ञान संस्था, नागपूर येथे सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्या नागपूर विद्यापीठात संगीत विभागाच्या संशोधक मार्गदर्शक म्हणूनही काम पाहतात. त्या शास्त्रीय व उपशास्त्रीय संगीताच्या गायिका आहेत. ख्याल, निर्गुणी भजने, नाट्यसंगीत अशा विविध संगीतप्रकारांचे गायन त्यांनी केले आहे. आचार्य विवेक गोखले, पं. मनोहरराव कासलीकर, पं. चंद्रशेखर रेळे व विदुषी आरती अंकलीकर यांच्या त्या शिष्या आहेत. 'सूरमणी' या सुरसिंगार संसद मुंबईतर्फे दिल्या जाणाऱ्या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने तसेच बालगंधर्व रसिक मंडळ, पुणे यांच्यातर्फे देण्यात येणाऱ्या 'नाट्याचार्य काकासाहेब खाडिलकर' पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. त्यांची *सॉन्टर ॲट सनसेट* ही सायंकालीन रागांची सीडी तसेच *गुंजन* ही शास्त्रीय संगीताची सीडी प्रकाशित झाली आहे. चाळीस वैदर्भीय बंदिशकार आणि त्यांच्या दोनशेहून अधिक बंदिशीच्या संकलनाचे *कहत गुनिजन* हे त्यांचे संपादित पुस्तक व सीडी प्रकाशित आहे. आकाशवाणीच्या मान्यताप्राप्त गायिका म्हणून त्यांची ओळख आहे. देशभरातील विविध संगीत महोत्सवांमधून त्यांनी गायन केले आहे. विविध संगीत नियतकालिकांमधून संगीतविषयक लेखन तसेच *नवराष्ट्र* व *महाराष्ट्र टाइम्स* या दैनिकांमधून त्यांची साप्ताहिक सदरेही प्रकाशित झाली आहेत.

**स्नेहा देऊस्कर**

स्नेहा देऊस्कर या सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख म्हणून रामनिरंजन झुनझुनवाला (स्वायत्त) महाविद्यालय, घाटकोपर (प.), मुंबई येथे कार्यरत आहेत. त्या गेली २५वर्षे अध्यापनाच्या क्षेत्रात कार्यरत असून मुंबई विद्यापीठ व इतर संलग्न महाविद्यालयांमध्ये २००२पासून अभ्यागत व्याख्याता म्हणून त्यांनी अध्यापन केले आहे. शैक्षणिक वर्ष २०१०-२०११मध्ये मुंबई विद्यापीठाच्या आणि शैक्षणिक वर्ष २०१७-२०१८ मध्ये मिठीबाई महाविद्यालयातील मराठी अभ्यास मंडळाच्या सदस्य होत्या. शैक्षणिक वर्ष २०१८पासून त्या रामनिरंजन झुनझुनवाला (स्वायत्त) महाविद्यालयात मराठी अभ्यास मंडळाच्या अध्यक्ष आहेत. त्यांनी 'श्री.दा. पानवलकर यांचे कथालेखन: एक चिकित्सक अभ्यास' या विषयावर २००५ साली मुंबई विद्यापीठातून विद्यावाचस्पती पदवी (पीएच.डी) मिळवली आहे. त्यांनी २००६ साली विद्यापीठ अनुदान आयोग पुरस्कृत 'श्री.दा. पानवलकर यांचे ललित लेखन' या विषयावर लघु संशोधन प्रकल्प सादर केला. *नव अनुष्टुभ, ललित* या वाङ्मयीन नियतकालिकांमध्ये त्यांचे शोधनिबंध प्रकाशित झाले असून मुंबई विद्यापीठ, मराठी विभागाने प्रकाशित केलेल्या ग्रंथांमध्येही त्यांचे लेखन समाविष्ट आहे. विविध राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय व राज्यस्तरीय चर्चासत्रांमध्ये (मराठी व हिंदी) शोधनिबंध सादर केले आहेत. *महाराष्ट्र टाईम्स, दिव्य मराठी* आदी वृत्तपत्रांमधून ललित, वैचारिक लेखन प्रसिद्ध झाले आहे. त्यांनी 'आकाशवाणी मुंबई'च्या मराठी विभागासाठी अनेक वाङ्मयीन कार्यक्रमांचे लेखन व सादरीकरणही केले आहे.

संमाहित

**दीपेश करमरकर**

दीपेश करमरकर यांनी मुंबई विद्यापीठाच्या भूगोल विभागातून अधिस्नातक (१९९६) आणि विद्यावाचस्पती (२००५) या पदव्या प्राप्त केल्या आहेत. १९९६पासून ते विविध महाविद्यालयांमध्ये भूगोल विषयाचे अध्यापन करीत आहेत. ते २०१०पासून उल्हासनगर येथील श्रीमती चांदीबाई हिमतमल मनसुखानी महाविद्यालयातील भूगोल विभागात साहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. मानवी भूगोलाच्या ऐतिहासिक भूगोल या शाखेत त्यांचे विशेष प्रावीण्य असून नागरी ऐतिहासिक भूगोल, ऐतिहासिक नकाशाशास्त्र आणि स्थलनामांचा भूगोल हे त्यांच्या विशेष अभ्यासाचे प्रांत आहेत. जागतिकीकरणाच्या काळातील विकासाचा भूगोल आणि सांस्कृतिक भूगोल या विषयांमध्येदेखील त्यांना विशेष रस आहे. जर्मनीच्या लॅम्बर्ट प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या *फिशी स्पेसेस: ग्लोबलायझेशन अँड लाइव्हलीहूड ऑफ इंडीजिनस फिशरमेन* या पुस्तकाचे ते लेखक आहेत. या व्यतिरिक्त राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शोधपत्रिकांमध्ये १३ शोधनिबंध तसेच मुंबई विद्यापीठाच्या भूगोल पदवी अभ्यासक्रमावर आधारित १२ शैक्षणिक पुस्तकांचे लेखन त्यांनी केले आहे. त्यांनी विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदा तसेच चर्चासत्रांमध्ये वीसहून अधिक शोधनिबंध सादर केले आहेत. विद्यापीठ, राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरील परिसंवाद, चर्चासत्रे आणि कार्यशाळांमध्ये चाळीसहून अधिक व्याख्याने त्यांनी दिली आहेत. लंडनच्या एल्सेव्हियरने प्रकाशित केलेल्या *जर्नल ऑफ हिस्टोरिकल जौग्रफी* या आंतरराष्ट्रीय शोधपत्रिकेसाठी त्यांनी पंच (रेफरी) म्हणून काम पाहिले आहे. महाराष्ट्र राज्य शासनाच्या मराठी विश्वकोशामध्ये त्यांनी लिहिलेल्या भूगोलविषयक नोंदी प्रकाशित झाल्या आहेत. स्वप्ना बॅनर्जी गुहा यांच्या छंदेर *अलिंदे बिद्रोह : महाराष्ट्रेर दलित कोबीता* या बंगाली अनुवादित संग्रहासाठी, तर प्रा. विद्याधर अमृते यांनी केलेल्या चं. धु. देशपांडे यांच्या *सिटीज* या पुस्तकाच्या काही भागाच्या अनुवादासाठी डॉ. करमरकर यांनी साहाय्य केले आहे. *आपला परम मित्र, विकल्पवेध, सुवार्ता, आंदोलन, दै. सकाळ, दै. लोकसत्ता, दै. प्रहार* अशा मराठी नियतकालिकांमधून विविध विषयांवर संशोधनपर लेखन केले आहे. डॉ. करमरकर ‘हिस्टोरिकल जिओग्राफी रिसर्च ग्रुप-रॉयल जिओग्राफिकल सोसायटी’, ‘इंडियन हिस्ट्री कॉंग्रेस’, ‘प्लेस नेम्स सोसायटी ऑफ इंडिया’, ‘नॅशनल असोसिएशन ऑफ जिओग्राफर्स इंडिया’, ‘बॉम्बे जिओग्राफिकल असोसिएशन’ आणि ‘कोकण जिओग्राफर्स असोसिएशन’ यांसारख्या आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि प्रादेशिक संस्थांचे सदस्य आहेत. तसेच त्यांनी मुंबई विद्यापीठाच्या भूगोल अभ्यास मंडळामध्ये कुलगुरू-नियुक्त सभासद म्हणून काम पाहिले आहे.

**श्रीकांत बोजेवार**

श्रीकांत बोजेवार हे ज्येष्ठ पत्रकार, लेखक, पटकथा लेखक, प्रहसनकार असून ते गेली आठ वर्षे *महाराष्ट्र टाइम्स*च्या मुंबई आवृत्तीचे निवासी संपादक आहेत. तत्पूर्वी ते

काही काळ *सकाळ* तसेच दीर्घकाळ *लोकसत्ता* या वृत्तपत्रात कार्यरत होते. 'तंबी दुराई' या नावाने विनोदी स्तंभलेखन करतात. या लेखनाचे संकलन पाच भागात प्रकाशित झाले आहेत. त्यांची *पावणे दोन पायांचा माणूस* ही कादंबरी आणि *तीन गुप्तहेर* या लघुकादंबऱ्यांचा संचही प्रकाशित झाला आहे. *क्ष क्षुल्लकची गोष्ट* हा त्यांचा कथासंग्रह आणि *शुक्रवार उजाडण्यापूर्वी* हा निवडक चित्रपट परीक्षणांचा संग्रहही प्रकाशित झाला आहे. याशिवाय ते विविध दिवाळी अंकांमधूनही सातत्याने लेखन करतात. *एक हजाराची नोट* या राष्ट्रीय तसेच राज्य चित्रपट पुरस्कारविजेत्या चित्रपटासह एकूण सात चित्रपटांच्या पटकथा त्यांनी लिहिलेल्या आहेत.

**संजय भास्कर जोशी**

संजय भास्कर जोशी यांचा जन्म पुण्यात १४ मे १९६३ला झाला. त्यांनी पुण्यातच शिक्षण पूर्ण केले. वाणिज्य शाखेच्या पदवी व पदव्युत्तर परीक्षेत विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत त्यांनी विशेष प्रावीण्य मिळविले आहे. तसेच त्यांनी ICWA या परीक्षेत भारतात नववा क्रमांक प्राप्त केला आहे. त्यानंतर अनेक कंपन्यांमध्ये फायनान्स तसेच कस्टमर केअर विभागात उच्चपदावर काम केले आहे. २००६ साली वयाच्या ४३व्या वर्षी केवळ लेखन आणि वाचन करता यावे म्हणून 'आयडीया सेल्युलर' या कंपनीतील Asst. Vice President या पदावरून निवृत्ती घेतली. *नचिकेताचे उपाख्यान, रेणुका-मृणालची उपाख्याने, श्रावणसोहळा* या त्यांच्या कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. पैकी *नचिकेताचे उपाख्यान* आणि *श्रावणसोहळा* यांना राज्य सरकारच्या पुरस्कारांच्याबरोबरीने इतर अनेक पुरस्कारही मिळाले आहेत. *स्वप्नस्थ* आणि *काळजातील खोल घाव* या कथासंग्रहांचे लेखन त्यांनी केले आहे. *आहे कॉर्पोरेट तरी...* हे त्यांचे आत्मचरित्रपर पुस्तक विशेष गाजले. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी त्यांनी अनेक विषयांवर व्याख्याने दिली आहेत. तसेच *महाराष्ट्र टाईम्स, लोकसत्ता, अंतर्नाद, साधना, ललित, अनुभव* आदी नियतकालिकांमध्ये त्यांनी शेकडो समीक्षालेख लिहिले आहेत. *साधना, ललित, अनुभव, लोकसत्ता, दिव्य मराठी* आदी नियतकालिकांमध्ये त्यांनी लिहिलेली सदरे विशेष लोकप्रिय झाली. सध्या ते पुण्यात श्री. वैशंपायन यांच्याबरोबर 'पुस्तक पेठ' हे पुस्तकाचे दुकान चालवतात.

**प्रदीप चंपानेरकर**

प्रदीप चंपानेरकर हे गेली सदतीस वर्षं पुस्तक प्रकाशनव्यवसायात कार्यरत आहेत. ते *रोहन प्रकाशन* या नामांकित प्रकाशन संस्थेचे प्रकाशक व संचालक आहेत आणि *रोहन साहित्य मैफल* या नियतकालिकाचे संपादक आहेत. त्यांनी 'जे. जे. स्कूल ऑफ आर्टस्' या कला महाविद्यालयातून प्रिंटींग टेक्नोलॉजी व कमर्शिअल आर्टचे शिक्षण घेतले आहे. पुस्तकांची विचारपूर्वक मांडणी व रचना करणे आणि त्याला आवश्यक तेवढीच

कलात्मकतेची जोड देणे, उत्तम निर्मितीमूल्य राखणे ही त्यांची वैशिष्ट्ये आहेत. *यांनी घडवलं सहस्रक - १००० ते २०००, असा घडला भारत - १९४७ -२०१२* अशा काही ग्रंथांच्या त्यांनी साकारलेल्या संकल्पना सर्वसामान्यांसाठी आणि अभ्यासकांसाठी मोलाच्या ठरल्या आहेत. *आधुनिक भारताचे विचारस्तंभ, लोककवी साहिर लुधियानवी* अशा काही महत्त्वपूर्ण ग्रंथांचे संपादनही त्यांनी केले आहे. अलीकडच्या काळात त्यांनी ललित लेखनही केले आहे.

**सुजाता शैलेश औटी**

सुजाता शैलेश औटी या मुंबईच्या के. सी. कनिष्ठ महाविद्यालयात गेली वीस वर्षे मराठी विषयाचे अध्यापन करत आहेत. त्यांचे पदवी व पदव्युत्तर शिक्षण मुंबई विद्यापीठातून पूर्ण झाले आले. त्या एम. ए. पदवी परीक्षेत 'मराठी साहित्य' या विषयात सर्वप्रथम आल्या असून त्यांना मुंबई विद्यापीठाचे 'नरसिंह चिंतामण केळकर सुवर्णपदक' प्राप्त झाले आहे 'कादंबरीतील पात्रचित्रण : शांता गोखले यांच्या रीटा वेलिणकर या कादंबरीच्या संदर्भात' या विषयावर एम. फिल. पदवीकरिता संशोधनकार्य केले आहे. त्यांचे पुस्तकपरीक्षणपर लेखन विविध वर्तमानपत्रांमधून प्रसिद्ध झाले आहे. मुंबई आणि महाराष्ट्रातील विविध शिक्षणविषयक व साहित्यविषयक चर्चासत्रांमध्ये त्यांनी सहभाग घेतला आहे. कनिष्ठ महाविद्यालयीन पातळीवरील कार्यशाळेत 'युवकभारती' या मराठीच्या पाठ्यपुस्तकावरील परीक्षणपर लेख त्यांनी सादर केला आहे. महानगरी संवेदनशीलतेचा मराठी साहित्यावर असलेला प्रभाव समजून घेणे तसेच चित्रपट आणि नाट्यकलेचे स्वरूप समजून घेणे या विषयांत त्यांना विशेष रस आहे.

**सोमनाथ दत्तात्रय कदम**

सोमनाथ दत्तात्रय कदम हे कणकवली महाविद्यालय, कणकवली येथे इतिहास विभागाचे प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. त्यांचे *प्रबोधनाचे वारसदार (२०१३), मातंग समाजाचा इतिहास (२०१५), विसाव्या शतकातील मातंग समाज (२०१८), आंबेडकरी चळवळीतील मातंग समाज (२०१९)* आदी ग्रंथ प्रकाशित असून त्यांनी *सर्वव्यापी अण्णा भाऊ ( २०२०), मुक्ता साळवे: जीवन व कार्य (२०२०)* या ग्रंथाचे संपादनही केले आहे. ते विविध नियतकालिकांमधून, मासिकांमधून सातत्याने लेखन करत असतात. सध्या त्यांचे 'फेरफटका' हे सदरलेखन दै. *लोकमत*मध्ये (सिंधुदुर्ग आवृत्ती) सुरू आहे. त्यांच्या *मातंग समाजाचा इतिहास* या ग्रंथाला कोकण मराठी साहित्य परिषदेचा 'उत्कृष्ट वैचारिक साहित्य पुरस्कार' प्राप्त झाला आहे.

संपादित

**अरविंद सुरवाडे**

अरविंद सुरवाडे हे आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते, लेखक व अनुवादक असून ते भारतीय भाषांतील आंबेडकरी साहित्याचे अभ्यासक आहेत. अनेक वृत्तपत्रे आणि वाङ्मयीन नियतकालिकांमधून त्यांचे लेखन प्रसिद्ध झालेले आहे. *धम्मचक्र प्रवर्तन : फलश्रुती आणि आव्हाने (२००७), बुद्धाचे अर्थशास्त्र (२०११) आणि समकालीन भारतीय आंबेडकरवादी कथा (२०१५)* ही त्यांची पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. ते भारत सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाच्या दिव्यांगजन विभागांतर्गत 'अलीयावर जंग राष्ट्रीय वाचा आणि श्रवण दिव्यांगजन संस्थान', मुंबई येथे कार्यरत आहेत.

**प्रकाश सहदेव खांडगे**

प्रकाश सहदेव खांडगे मुंबई विद्यापीठातील 'शाहीर अमरशेख अध्यासना'चे समन्वयक आहेत. ते 'लोककला अकादमी', मुंबई विद्यापीठ येथे २०१७ पर्यंत प्राध्यापक व प्रमुख म्हणून कार्यरत होते. लोकसाहित्य, लोककला अभ्यासशाखेतील गेल्या ४२ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव त्यांच्या गाठीशी आहे. मुंबई विद्यापीठातील मराठी विभागातून 'जागरण: एक विधिनाट्य इतिहास, वाङ्मय, प्रयोग' या विषयात त्यांनी पीएच.डी. प्राप्त केली आहे. सदर प्रबंधासाठी उत्कृष्ट प्रबंधाचे कै. डॉ. अ. का. प्रियोळकर स्मृती पारितोषिक त्यांना मिळाले आहे. त्यांच्या *खंडोबाचे जागरण* या ग्रंथाला उत्कृष्ट संशोधन ग्रंथ म्हणून 'माडखोलकर पुरस्कारा'ने गौरविले आहे. लोककला क्षेत्रातील कार्याबद्दल महाराष्ट्र शासनाचा सास्कृंतिक क्षेत्रातील 'कलादान पुरस्कार' आणि भारत सरकारच्या 'संगीत नाटक अकादमी'चा पुरस्कार त्यांना लाभलेला आहे. प्रा. डॉ. प्रकाश खांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहा विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पदवी प्राप्त केलेली आहे. त्यांचे पाच ग्रंथ प्रकाशित झाले असून दोन पुस्तकांचे संपादन त्यांनी केले आहे. साधारण पाच आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये ते सहभागी झाले आहेत.

# संदर्भ देण्याविषयीच्या मार्गदर्शक सूचना

'संभाषण' मासिकासाठी शोधनिबंध लिहिताना शोधनिबंधकाराने **In Text parenthetical Author-Date citation** या संदर्भ पद्धतीचा अवलंब करणे अनिवार्य आहे.

**In Text parenthetical Author-Date Citation** ही संदर्भ देण्याची अधिक सुटसुटीत पद्धत आहे. या पद्धतीनुसार प्रत्यक्ष लेखातील मजकुरामध्ये वा विवेचनामध्ये संदर्भांचे आधार देणे अभिप्रेत असते. या पद्धतीने संदर्भ देताना लेखकाचे आडनाव, संदर्भग्रंथाचे प्रकाशनवर्ष आणि उद्धृत संदर्भाचा पृष्ठ क्रमांक नोंदविणे आवश्यक असते.
उदाहरणार्थ,
(रेगे २००४ : ७५)
सदर संदर्भग्रंथाविषयीचे अन्य तपशील लेखाच्या शेवटी जोडलेल्या संदर्भांच्या यादीमध्ये समाविष्ट केले जातात.
उदाहरणार्थ,
रेगे, मे. पुं. (२००४) **:** *विवेकवाद, विज्ञान आणि श्रद्धा,* लोकवाङ्मय गृह**,** मुंबई.

शोधनिबंधाच्या शेवटी संदर्भसाधने नमूद करताना मराठी आणि इंग्रजी भाषेतील संदर्भांची स्वतंत्र नोंद करावी. तसेच ही माहिती देताना ग्रंथ (स्वतंत्र, संपादित इत्यादी), नियतकालिक, वर्तमानपत्र, अप्रकाशित प्रबंध, प्रबंधिका, संकेतस्थळ आणि समाजमाध्यम हा क्रम पाळावा.

**संदर्भ देताना ग्रंथकाराच्या,/संपादकाच्या आडनावाने प्रारंभ करून आडनावानुक्रमे नोंद करणे आवश्यक आहे.**
उदाहरणार्थ,
मतकरी, रत्नाकर (१९८३) : *स्पर्श अमृताचा*, मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई.
मनोहर, श्याम (१९८३) : *हे ईश्वरराव...हे पुरुषोत्तमराव...*, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

**एकाच लेखकाच्या एकाहून अधिक पुस्तकांचे संदर्भ येत असतील तर वर्षानुक्रम पाळावा.**
उदाहरणार्थ,
नेमाडे, भालचंद्र (१९८७) : *साहित्याची भाषा*, साकेत प्रकाशन, औरंगाबाद .
नेमाडे, भालचंद्र (१९९०) : *टीकास्वयंवर*, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.

**एका लेखकाच्या एकाच वर्षातील एकाहून अधिक ग्रंथांचा, लेखांचा संदर्भ येत असेल तर पुढीलप्रमाणे लिहावे.**

उदाहरणार्थ,

पाटील, गंगाधर (१९९१ अ) : 'चिन्हमीमांसा', *अनुष्टुभ*, मार्च –एप्रिल, पृ. ३-६.

पाटील, गंगाधर (१९९१ आ) : 'कथनमीमांसा', *अनुष्टुभ*, दिवाळी अंक, पृ. ८६ -१२७.

एकाच साधनाचा संदर्भ लागोपाठ येतो तेव्हा 'तत्रैव' शब्द वापरून पृष्ठ क्रमांक द्यावा. उदाहरणार्थ, लेखात एखाद्या पुस्तकाचा संदर्भ पहिल्यांदा येत असेल तर तो (मुक्तिबोध १९९७ : ३१) अशा पद्धतीने नोंदवावा. हाच संदर्भ सलग आल्यास (तत्रैव, पृ. ४९) असे लिहावे.

**लेखाच्या शेवटी देण्यात येणाऱ्या विविध प्रकारच्या संदर्भसाधनांच्या नोंदींची प्रातिनिधिक उदाहरणे पुढीलप्रमाणे आहेत. ही उदाहरणे देत असताना IN-TEXT-CITATION पद्धतीनुसार प्रत्यक्ष विवेचनात संदर्भ कसे द्यायचे यासंबंधीचे नमुनेही देण्यात आले आहेत.**

ग्रंथ (book)

**एक लेखक**

रेगे, मे. पुं. (२००४) : *विवेकवाद, विज्ञान आणि श्रद्धा,* लोकवाङ्मय गृह, मुंबई.

**IN- TEXT-CITATION**

(रेगे २००४ : २५)

**दोन लेखक**

मालशे, मिलिंद व जोशी अशोक (२००७) : *आधुनिक समीक्षा सिद्धांत*, मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ व मौज प्रकाशन गृह, मुंबई.

**IN- TEXT-CITATION**

(मालशे व जोशी २००७ : ७८)

संग्राहित

**संपादक (एक)**

जोशी, महादेवशास्त्री (संपा.) (१९६२) : *भारतीय संस्कृतिकोश- खंड १*, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे.

**IN-TEXT-**CITATION

(जोशी १९६२ : ६०)

**संपादक (दोन)**

भोळे, भा. ल. व बेडकिहाळ किशोर (संपा.) (२००३) : *बदलता महाराष्ट्र*, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी, सातारा.

**IN-TEXT-**CITATION

(भोळे व बेडकिहाळ २००३ : ३६)

**संपादक (दोनापेक्षा अधिक असल्यास)**

नाईक, राजीव व इतर (संपा.) (१९८८) : *रंङ्गनायक,* आविष्कार प्रकाशन, मुंबई.

IN-TEXT-**CITATION**

(नाईक व इतर १९८८ : ५९)

**संपादित ग्रंथातील लेखाचा संदर्भ**

केळकर, अशोक (१९८१) : 'भाषावैज्ञानिक संशोधनाच्या नव्या दिशा', *भाषा व साहित्य : संशोधन,* वसंत जोशी (संपा.) , महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, पृ. ४७-६८.

IN-TEXT-**CITATION**

(केळकर १९८१ : ५०)

**अनुवादित**

आंबेडकर, बाबासाहेब (२००५) : दु. आ., *जातिव्यवस्थेचे विध्वंसन*, गौतम शिंदे (अनु.), सुगावा प्रकाशन, पुणे.

IN-TEXT-**CITATION**

(आंबेडकर २००५ : ३८)

संभाषित

**संपादित आणि अनुवादित ग्रंथ**

बापट, पु. वि. (संपा.) (२००१) : *धम्मपद,* पु. मं. लाड (अनु.), महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

IN-TEXT-**CITATION**

(बापट २००१ : १५)

नियतकालिकातील लेख

चौसाळकर, अशोक (२०१९) : 'चिनी क्रांतीची ७० वर्षे', *समाज प्रबोधन पत्रिका,* ऑक्टोबर-डिसेंबर, पृ. ३-११.

पळशीकर, सुहास (२०२०) : 'नागरिकत्वविषयक दुरुस्तीचे वास्तव', *परिवर्तनाचा वाटसरू*, १६ ते २९ फेब्रुवारी, पृ. १८ -२४.

महाजालावरून (इंटरनेट) संदर्भ घेतला असेल तर संकेतस्थळाचे (वेबसाईट) नाव.

IN-TEXT-**CITATION**

(चौसाळकर २०१९ : ७)

(पळशीकर २०२० : २१)

**वर्तमानपत्रातील लेख**

नाडकर्णी, कमलाकर (२०२०) : 'होय, बालरंगभूमीही 'प्रायोगिक' होती!', *लोकसत्ता*, २४ मे, पृ. १२.

महाजालावरून (इंटरनेट) संदर्भ घेतला असेल तर संकेतस्थळाचे (वेबसाईट) नाव.

IN-TEXT-**CITATION**

(नाडकर्णी २०२० : १२)

**ग्रंथपरिचय**

फडके, अनंत (२०२०) : 'विकासनीतीची कठोर चिकित्सा (पूर्वार्ध)' अच्युत गोडबोले यांच्या *अन्वर्थ -विकासनीती : सर्वनाशाच्या उंबरठ्यावर?* या पुस्तकाचे परीक्षण, *परिवर्तनाचा वाटसरू*, १६ ते २९ फेब्रुवारी, पृ. ४६-४९.

महाजालावरून (इंटरनेट) संदर्भ घेतला असेल तर संकेतस्थळाचे (वेबसाईट) नाव.

IN-TEXT-**CITATION**

(फडके २०२० : ४८)

**मुलाखत**

केतकर, कुमार (२०१७) : 'मार्क्स : प्रभाव आणि परिणाम' शेखर देशमुख (मुलाखतकार), *साधना*, मे, पृ. २२-२३.

महाजालावरून (इंटरनेट) संदर्भ घेतला असेल तर संकेतस्थळाचे (वेबसाईट) नाव.

IN-TEXT-**CITATION**

(केतकर २०१७ : २२)

**भाषण**

दरेकर, प्रविण (२०१४) : 'चांगल्या शैक्षणिक धोरणाची राज्याला आवश्यकता आहे!', *विधिमंडळातील राजगर्जना,* नवता प्रकाशन, मुंबई, पृ. ५४-५७.

महाजालावरून (इंटरनेट) संदर्भ घेतला असेल तर संकेतस्थळाचे (वेबसाईट) नाव.

IN-TEXT-**CITATION**

(दरेकर २०१४ : ५५)

**अप्रकाशित प्रबंध आणि प्रबंधिका**

नाईक, कृष्णा बाबली (२०१६) : 'रत्नाकर मतकरींच्या गूढकथा : स्वरूप आणि अभ्यास', अप्रकाशित प्रबंध, मुंबई विद्यापीठ.

महाजालावरून (इंटरनेट) संदर्भ घेतला असेल तर संकेतस्थळाचे (वेबसाईट) नाव.

IN-TEXT-**CITATION**

(नाईक २०१६ : ८७)

## वेबसाईट संदर्भ

**संकेतस्थळावरील परीक्षण**

आळवेकर, एकनाथ (२०१८) : 'रिंगाण : उत्क्रांतीची नवी दिशा देणारी कादंबरी', पीडीएफ.

http://vivekresearchjournal.org/current_issue.html

(संकेतस्थळाला भेट २७ फेब्रुवारी २०१९)

IN-TEXT-**CITATION**

(आळवेकर २०१८)

**संकेतस्थळावरील लेख**

कुलकर्णी, हेरंब (२०२०) : 'शिक्षणाची कक्षा आणि कक्षेचे शिक्षण'

http://herambkulkarniarticles.blogspot.com/2020/01/blog-post_4html?m=1

(संकेतस्थळाला भेट २८ मे २०२०)

IN-TEXT-**CITATION**

(कुलकर्णी २०२०)

**संकेतस्थळावरील पुस्तक**

मनोहर, यशवंत (२०१२) : *विचारसत्ता*, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर.

http://yashwantmanohar.com/pdf/Bauddha%20Sanskruti%20Ani%20Sah

itya.pdf

(संकेतस्थळाला भेट १५ मे २०२०)

IN-TEXT-**CITATION**

(मनोहर २०१२)

**संकेतस्थळावरील वर्तमानपत्र**

हेमाडे, श्रीनिवास (२०२०) : 'परीक्षा - विद्यार्थ्यांची आणि अस्तित्वाची'

**https://** www.esakal.com/sampadakiy/shrinivas-hemade-article-about-student-299349

(संकेतस्थळाला भेट ३० मे २०२०)

IN-TEXT-**CITATION**

(हेमाडे २०२०)

**समाजमाध्यम**

बोरगावे, दीपक (२०२०) : 'रोमान याकोबसन आणि भाषांतर अभ्यास'

http://www.facebook.com/story.php?story_fbid=18731

संभाषित

अधिष्ठाता, मानव्यविद्याशाखा यांचे कार्यालय,
मुंबई विद्यापीठ, आंबेडकर भवन, कलिना कॅम्पस,
विद्यानगरी, मुंबई – ४०००९८.

**© 'संभाषित' या तज्ज्ञपरीक्षित संशोधन-पत्रिकेतील (Peer-Reviewed Research Journal) कोणत्याही मजकुराचे पुनर्मुद्रण पूर्वपरवानगीशिवाय करता येणार नाही.**

**लेख पुढील ई-पत्त्यावर (Email) पाठवावेत.**
**editorinchief.sambhashit@mu.ac.in** with a cc to
**editor.sambhashit@mu.ac.in**